# संपादकीय

**शीला राव**

दर वर्षीप्रमाणे डिसेंबर, उजाडला आणि आम्ही आपल्यापुढे संघाचा वार्षिक अहवाल सादर करीत आहोत.

अत्यंत कठीण परिस्थितीत शतकापूर्वी पूज्य कमलाताईंनी सीताबर्डी सूतिकागृहाची मुहूर्तमेढ रोवली. आणि त्याचा आता खरोखरच वटवृक्ष झाला आहे. बारा शाखा आणि आणि बारा पेक्षाही जास्त असे प्रकल्प आणि प्रवृत्ति समाजासाठी अत्यंत उपयोगी असे कार्य करीत आहेत. त्या सर्वांचा संक्षिप्त अहवाल सादर आहे ह्या अंकात. त्यावरून मातृ-सेवा-संघातील एकंदर कार्याची कल्पना आपल्याला येईल. त्यासाठी स्तंभ आणि तालिका यांचा उपयोग केलेला आहे. आता सीताबर्डी सूतिकागृह ह्या नावाने सुरू केलेली संस्था अनेक वर्षांपासून मातृ-सेवा-संघ ह्या नावाने बहुमूल्य कार्य करीत आहे हे आपणास माहित आहेच.

संस्थेमध्ये चिकित्सेसाठी नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग केला जातो. आणि आधुनिक उपकरणेही वापरण्यात येतात.

संस्थेला नेहमीच आपले सहकार्य मिळत राहील आणि संस्था आपले कार्य अखंडपणे उत्तम कार्य करीत राहील हीच मनीषा!

**प्राणिमात्र हा जगती व्हावा,**
**सर्वसुखी अन् निरोगिही।**
**शुभ व्हावे सर्वांचे देवा,**
**दुःख नसावे कुणासही ।।**

सर्व वाचकांना, सभासदांना, मातृसेवासंघ हितचिंतकांना नववर्षाच्या शुभेच्छा!

# मातृसेवासंघ, सीताबर्डी, नागपूर




# मातृसेवा संघाचे आधारवड



पद्मश्री कमलाताई होस्पेट श्रीमती सावित्रीबाई मटंगे श्रीमती वेणूताई नेने

# मातृसेवासंघ, सीताबर्डी, नागपूर
# वार्षिक अहवाल २०२१-२०२२

मातृसेवासंघाच्या माध्यमातून जीवनाच्या विविध क्षेत्रात १०२ वर्षापासून समाजोपयोगी कार्य केले जात आहे. आरोग्य शिक्षण बालसंगोपन वृद्धसेवा आणि इतर अनेक सेवा समाजातील सर्व घटकांना पुरविण्याचे कार्य संस्था सतत करीत आहे.

सुमारे शंभर वर्षापूर्वी पद्मश्री कै. कमलाताई व कै. वेणूताई या तरुण विधवांनी परिचारिकेचे प्रशिक्षण घेतले. त्यावेळची समाजस्थिती अशा कामासाठी अनुकूल नव्हती. परिचारिकेच्या पेशाला त्याकाळी सामाजिक प्रतिष्ठा नव्हती, याची जाणीव असूनही केवळ समाजातील सर्व स्त्रियांना उत्तम वैद्यकीय उपचारांबरोबरच घरघुती वातावरणात प्रसूतिची सोय उपलब्ध व्हावी याकरिता कमलाताईंनी १९२१ मध्ये सीताबर्डी सूतिकागृहाची स्थापना केली. पुढे सूतिकागृहाच्या कामाचे स्वरूप विस्तारल्यावर त्याचे मातृसेवासंघ असे नामकरण करण्यात आले. दि.२०/१/१९६२ रोजी संस्थेला रितसर धर्मदाय आयुक्तालयांतर्गत मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणीकृत करण्यात आली.

सूतिकागृहाच्या शाखाबरोबरच संस्थेच्या कामाची व्याप्ती वाढत गेली. एका कार्यातून दुसरे कार्य आपोआप सुरू होत गेले. प्रसूती रुग्णालयापासून मतिमंद/ दिव्यांग मुलांसाठी शाळा, वृद्धांसाठी निवारा, दत्तक सेवा कार्यरत महिलांकरिता वसतीगृह, कौटुंबिक सल्ला केद्र इत्यादी अनेक प्रकल्पांबरोबर समाजसेवेची प्रशिक्षण देणारी संस्था देखील चालविण्यात येते. संस्थेमध्ये महिलांच्या प्रसूतीबरोबरच त्यांच्या आरोग्यासाठी संध्यादीप प्रकल्प, निर्माण फर्टिलिटी केद्र, मॅमोग्राफी सेंटर तसेच नवजात बालकांची देखरेख करण्याकरिता नवीन तंत्रज्ञानाने सज्ज चिकित्सा अत्यंत अल्प दरात उपलब्ध आहे. अलिकडच्या काळाची गरज ओळखून संस्थेने कोविड समर्पित रुग्णालय आणि कोविड लसीकरण केंद्रही सुरू केले आहे.

मातृसेवासंघाच्या आजपर्यंतच्या यशस्वी वाटचालींमागे अनेकांची मेहनत योगदान व सहकार्य आहे. संस्थेच्या सर्व शाखा व प्रकल्प प्रवृत्तीमध्ये सेवाकार्य करणाऱ्या प्रत्येकाच्या परिश्रमाचा आदरयुक्त उल्लेख करीत सन २०२२-२०२३ चा अहवाल सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

## संस्थेचे भूषण म्हणजे संस्थेच्या शाखा
## संस्थेच्या एकूण १२ शाखा आहेत.

अ) मातृसेवासंघाच्या महाराष्ट्र, मध्य प्रदेश व छत्तीसगढ मिळून १२ शाखा खालील प्रमाणे आहेत.

| शाखा | अध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| १. महाल | सौ. कांचन गडकरी | श्रीमती वैदेही भाटे |
| २. वर्धा | सौ. पुष्पमाला देशमुख | श्रीमती वनिता देशपांडे |
| ३. आर्वी | ॲड.सौ. अरुणा देशपांडे | सौ. ज्योती भट |
| ४. भंडारा | सौ. लतिका मोहोकर | सौ. रेखा तुमसरे |
| ५. जबलपूर | श्रीमती सुमेधा पोळ | डॉ. शुभांगी गुप्ता |
| ६. हिंगणघाट | श्रीमती पद्‌माताई पेंढरकर | श्रीमती राधाताई भिमनवार |
| ७. बिलासपूर | श्रीमती मंगला बुरंगे | डॉ. गीता व्ही. दीक्षित |
| ८. ब्रम्हपुरी | श्रीमती कमल वैद्य | श्रीमती विद्या बरडे |
| ९. वरोरा | सौ. सुवर्णरेखा पाटील | सौ. शुभदा म. भावे |
| १०. चांदूररेल्वे | --- | सौ. अनिता भुयार |
| ११. अकोला | सौ. आशा तारे | श्रीमती आकांक्षा देशमुख |
| १२. अमरावती | सौ. ज्योती केवले | श्रीमती विद्या देशपांडे |

| मातृसेवासंघ संस्थेच्या प्रकल्प व प्रवृत्ती | कार्यप्रमुख |
|---|---|
| १. सीताबर्डी सूतिकागृह (धर्मदाय रुग्णालय ) | : डॉ. पुष्पा भावे |
| अ)सुधारित सहाय्यक परिचारिका प्रसविका प्रशिक्षण केंद्र | : श्रीमती कांचन बांते |
| २. समाजकार्य संस्था, बजाज नगर, नागपूर | : डॉ. केशव वाळके(५/६/२३ पर्यत) |
| ३. नंदनवन दुर्बल मनस्क मुलांची शाळा | : भावना नंदनवार(३१/१२/२२ पर्यंत) सौ. यश:श्री वाघ(१/१/२३ पासून) |
| ४. नंदनवन संरक्षित कार्यशाळा | : सौ. रंजना सुखदेवे |
| ५. पंचवटी वृद्धाश्रम उमरेड रोड, नागपूर | : श्रीमती विभावरी टिकेकर |
| ६. 'स्नेहांगण' विकलांग मुलांची निवासी शाळा | : श्रीमती मृणाली देशमुख |
| ७. विकलांग मुलांचे पुनर्वसन प्रकल्प | : श्रीमती चित्रा तत्त्ववादी |
| ८. शिशुगृह, मेडिकल कॉलेज परिसर, नागपूर | : मेधा पुंडलिक(३१/३/२३ पासून बंद) |
| ९. कौटुंबिक सल्ला केन्द्र, बजाज नगर | : श्रीमती सुनीला थेरगांवकर |
| १०. कर्मचारी महिला वसतीगृह बजाज नगर, नागपूर | : सौ. रूपा जुनघरे |
| ११. कर्मचारी महिला वसतीगृह, सीताबर्डी, नागपूर | : सौ. ममता चिंचवडकर |
| १२. मातृसेवा मासिक | : श्रीमती शीला राव |
| १२. सन्मित्र कॅन्टीन | : डॉ.लता देशमुख(३१/३/२३ पासून बंद) |
| १३. कुसुम विहार | : डॉ. पुष्पा भावे |

## मातृ सेवा संघ, सीताबर्डी, नागपूर कार्यकारिणी : २०२१-२०२४


डॉ. अरुणा बाभुळकर


डॉ.लता देशमुख


सौ.रश्मी भावे


डॉ. वृषाली देशपांडे


सौ. ममता चिंचवडकर


सौ. रुपा जुनघरे


डॉ. स्नेहा देशपांडे


डॉ. रत्ना शेखावत


डॉ.सीमा पांडे


श्रीमती सुनिला थेरगांवकर


सौ. सुवर्णरेखा पाटील


सौ. पुष्पमाला देशमुख


ॲड.सौ.अरुणा देशपांडे


डॉ. पुष्पा भावे


डॉ. केशव वाळके


कु. भावना नंदनवार


श्रीमती विभावरी टिकेकर


मोनिका नाहर

## विशेष उल्लेखनीय

**१. खाजगी बाह्य रुग्ण विभाग :-** दि. १ जुलै २०२२ रोजी 'डॉक्टर्स डे' चे औचित्य साधून मातृ सेवा संघ, सीताबर्डी सूतिकागृह येथे 'खाजगी बाह्य रुग्ण विभाग' सुरू करण्यात आला. मातृ सेवा संघाच्या अध्यक्षा डॉ. अरुणा बाभुळकर यांच्या शुभ हस्ते या विभागाचे उद्घाटन करण्यात आले. स्त्रियांच्या सोयीसाठी व रुग्णांना विविध उपचारांचा लाभ एका छताखाली, माफक दरात मिळावा म्हणून प्रायव्हेट मल्टीस्पेशालीटी बाह्य रुग्ण विभागात दुपारी २ ते ४ या वेळात सर्व प्रकारच्या तपासणीची सोय करण्यात आली आहे.

**२. मेमोग्राफी केंद्र :-** अमेरीकेतील मैना फाउंडेशन चे अध्यक्ष डॉ. अल्का श्रीखंडे यांनी दिलेल्या देणगीतून सी.आर. सिस्टम लावून मेमोग्राफी मशीन डिजीटलाइज करण्यात आली. तसेच एसबीआय कडून मिळालेल्या देणगीतून सोनोमेमोग्राफीसाठी लिनीयर प्रोब घेण्यात आले.

**३. स्नेहांगण दिव्यांग मुलांची शाळा :** दि. २१ जानेवारी २०२३ रोजी ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथे घेण्यात आलेल्या खासदार क्रीडा महोत्सव स्पर्धेत स्नेहांगण शाळेच्या विद्यार्थ्यांनी ४ सुवर्ण पदक व ४ रजत पदक मिळविले. १०० मीटर धावणे, पावर लिफ्टिंग, गोळा फेक, कॅरम या क्रीडा प्रकाराकरिता त्यांनी प्रथम, द्वितीय

क्रमांक प्राप्त केले. त्यांना प्रमाणपत्रे मिळाली. केन्द्रिय मंत्री मा. श्री. नितीनजी गडकरी ह्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले.

**४. पंचवटी वृद्धाश्रम :–** महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांच्या तर्फे ज्येष्ठ नागरीक व ज्येष्ठ नागरिकांसाठी काम करणाऱ्या नागपूर जिल्ह्यातील पंचवटी वृद्धाश्रम, उमरेड रोड, नागपूर या संस्थेनी विशेष उल्लेखनिय व मोलाचे कार्य केल्याबद्दल दि.१ ऑक्टोबर जागतिक ज्येष्ठ नागरीक दिनाच्या निमित्त्याने सन्मानपर प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

**५. सिद्धी ग्रामीण आरोग्य केंद्र, धामणा :–** सुधारित सहाय्यक परिचारिका प्रसविका प्रशिक्षण केंद्राकरिता डॉ. सुधीर बाभुळकर, सिनीयर ऑर्थोपिडीक सर्जन, सुश्रुत हॉस्पीटल, रामदासपेठ, नागपूर यांची धामणा येथील आरोग्य केंद्राची जागा त्यांनी वापरण्याकरिता दिली. केन्द्राला मातृ सेवा संघ, सीताबर्डी, नागपूर सिद्धी ग्रामीण आरोग्य केंद्र नाव देण्यात आले आहे. केंद्रात सुधारित सहाय्यक परिचारिका प्रशिक्षण केंद्राच्या मुलींचे शिक्षण प्रशिक्षणाचे कार्य घेण्यात येत आहे.

## महितीचा अधिकार कार्यशाळा

माहितीचा अधिकार कायदा २००५ अंतर्गत कार्यशाळेचे आयोजन दि.३/४/२०२२ रोजी सेंटेनरी ब्लॉक, तळमजला येथे करण्यात आले होते. श्री. नवीन महेशकुमार अग्रवाल, प्रबंधक, दादा रामचंद्र बाखरू सिंधु महाविद्यालय यांना आमंत्रित करण्यात आले होते. सर्वप्रथम संस्थेच्या संस्थापिका कै.कमलाताई होस्पेट यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

श्री. नवीन अग्रवाल यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि मातृ सेवा संघाची स्मरणिका देऊन सत्कार करण्यात आला. श्री. नवीन अग्रवाल यांनी माहितीचा अधिकार कायदा तसेच या कायद्यांतर्गत असलेले नागरिकांचे हक्क व कर्तव्य याबाबत अतिशय महत्त्वपूर्ण माहिती दिली. ते म्हणाले की माहितीचा अधिकार कायदा २००५ अंतर्गत सर्वांना आपल्या दैनंदिन जीवनात कामात येणाऱ्या किंवा आपल्या कार्याशी निगडीत असलेल्या प्रत्येक बाबीची माहिती घेण्याचा अधिकार असतो. या अधिकाराचा उपयोग आपण करावा असे त्यांनी सांगीतले. तसेच या कायद्यांर्तगत येणाऱ्या सर्व आस्थापनांची माहिती सांगितली. कोण कोण व कशाप्रकारे या कायद्याचा लाभ घेऊ शकतात याबाबत त्यांनी माहिती दिली. डॉ. अरुणा बाभुळकर, अध्यक्ष, मातृ सेवा संघ, डॉ. लता देशमुख, सचिव, मातृ सेवा संघ, डॉ. पुष्पा भावे, वैद्यकीय अधीक्षिका, सीताबर्डी सूतिकागृह, मातृ सेवा संघाच्या प्रकल्प/प्रवृत्तींचे प्रमुख, मातृ सेवा संघातील सर्व कर्मचारी कार्यक्रमाला उपस्थित होते.



सौ. यश:श्री वाघ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.



**महितीचा अधिकार कार्यशाळेत मार्गदर्शन करताना श्री. नवीन महेशकुमार अग्रवाल**

## मातृ सेवा संघाचा वर्धापन दिन

मातृ सेवा संघाचा १०१ वा वर्धापनदिन दि. ३ मे २०२२, अक्षय तृतीयेच्या दिवशी रंजन सभागृह, मातृ सेवा संघ, सीताबर्डी येथे उत्साहाने साजरा केला गेला. श्रीमती आर. विमला, जिल्हाधिकारी, नागपूर सोहळ्याचे प्रमुख अतिथी म्हणून लाभल्या होत्या. तसेच जेष्ठ समाजसेविका श्रीमती लीलाताई चितळे यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. अतिशय सुरेख चैत्रगौर सजवून सभागृहात मंगलमय वातावरणाची निर्मिती केली गेली. चैत्रगौरीचे पूजन करून स्वागतगीताच्या साथीने दीपप्रज्वलनाद्वारे कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.

संस्थेच्या सचिव डॉ. लता देशमुख यांनी जिल्हाधिकारी श्रीमती आर. विमला व श्रद्धेय लीलाताईंचे शाल, श्रीफळ व स्मारक चिन्ह देऊन स्वागत केले. डॉ. लता देशमुख यांनी त्यांच्या प्रास्ताविकात मातृ सेवा संघाचे प्रकल्प आणि प्रवृत्ती तसेच सूतिकागृहाच्या शाखांविषयी तसेच सीताबर्डी सूतिकागृहाच्या १०१ वर्षाच्या प्रवासाविषयी माहिती दिली.

आपल्या व्यस्ततम व्यवसायातून वेळ काढून मातृ सेवा संघाच्या विविध उपक्रम व प्रकल्पांना वेळोवेळी भरघोस सहकार्य दिलेल्या मान्यवरांचा श्रीमती आर. विमला यांच्या हस्ते गौरवचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या सत्कारमूर्तीमधे खालील मान्यवरांचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १) डॉ. उदय माहोरकर | २) डॉ. शैलेन्द्र मुंधडा | ३) डॉ. सुश्रुत बाभुळकर |
| ४) श्री. अनिरूद्ध शेणवई | ५) डॉ. उज्वल परीख | ६) श्री. शिव राव |

कोविड महामारीच्या काळात मातृ सेवा संघ, डेडिकेटेड कोविड रुग्णालयात अतिशय निष्ठेने सेवाकार्य करणाऱ्या डॉक्टर्स, परिचारिका व अन्य कर्मचाऱ्यांचे श्रीमती आर. विमला यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र देऊन अभिनंदन करण्यात आले. या कोविड योद्धयांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

**डॉक्टर्स –** डॉ. उज्वल परीख, डॉ. रेश्मा गिरीपुंजे, डॉ. कामिनी नाकाडे, डॉ. रिषी लोडाया, डॉ. अमी रहातेकर, डॉ. तृप्ती परीख, डॉ. प्रिती पटेल

**परिचारिका –** श्रीमती शौली भद्र – मेट्रन, श्रीमती भारती धोत्रे, श्रीमती प्रीती वैद्य, श्रीमती अनामिका गणवीर, श्रीमती शारदा मंचलवार, कु. योगीता गमे, श्रीमती सुनीता पाटील, श्रीमती कांचन तल्हार, श्रीमती शोभा झाडे

**वार्ड कुली –** श्रीमती मोना नकवाल, श्रीमती सविता नागदवणे, श्रीमती बेला खोब्रागडे

दरवर्षी प्रमाणे सुधारित सहाय्यक परिचारिका प्रसविका प्रशिक्षण केंद्राच्या गुणवत्ताप्राप्त व इतर प्रशिक्षणार्थीना संस्थेतर्फे दरवर्षी देण्यात येणाऱ्या विविध पारितोषिकांचे वितरण श्रीमती लीलाताई चितळे यांच्या हस्ते करण्यात आले. शताब्दी वर्षाच्या विविध कार्यक्रमाचे संकलन असलेले पुस्तक **'शताब्दी महोत्सव संस्मरणीय क्षण २०१९ ते २०२१'** या पुस्तकाचे व मातृ सेवा संघाच्या विविध शाखांची माहिती असलेला माहितीपट 'मातृ सेवा संघ चित्रफित भाग–२' चे विमोचन मान्यवर अतिथींच्या हस्ते संपन्न झाले.



जिल्हाधिकारी श्रीमती आर. विमला आपल्या मनोगतात म्हणाल्या की, महिलांच्या सशक्तीकरणात अग्रेसर मातृ सेवा संघ येणाऱ्या पीढीसाठी आदर्शव्रत असून, महिलांद्वारे चालविण्यात येणाऱ्या व शताब्दी वर्ष साजरे करण्याकरिता संस्थेद्वारे आतापर्यंत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले आहेत. ही संस्था म्हणजे नागपूर नगरीचे भूषण आहे. संस्थेच्या कुठल्याही कार्यात मदत करायला मी तत्पर असेन असे त्यांचे अतिशय समर्पक मनोगत झाले.

श्रीमती लीलाताई चितळे यांनी बहुमूल्य मार्गदर्शनात मातृसेवासंघातील पू. कमलाताई होस्पेटच्या सेवावृत्तीचे वर्णन करून प्रत्येकामध्ये ही सेवावृत्ती रूजावी असे प्रतिपादन केले.






मातृ सेवा संघाच्या १०१ व्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात उपस्थित प्रमुख अतिथी श्रीमती आर. विमला, जिल्हाधिकारी, नागपूर, ज्येष्ठ मार्गदर्शिका श्रद्धेय श्रीमती लीलाताई चितळे, डॉ. लता देशमुख, सचिव, मातृ सेवा संघ, सीताबर्डी, डॉ. वृषाली देशपांडे, कोषाध्यक्ष, सौ. ममता चिंचवडकर, सहसचिव तसेच मान्यवर ''शताब्दी महोत्सव–संस्मरणीय क्षण २०१९ ते २०२१'' पुस्तकाचे प्रकाशन करताना मान्यवर, मान्यवर व सत्कारमुर्ती

सौ. ममता चिंचवडकर ह्यांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्रीमती यश:श्री वाघ यांनी तर पसायदान श्रीमती स्वप्ना कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नियुक्त विभिन्न समित्या, कर्मचारी वृंदांनी आपली सेवा अर्पण केली.

## कै. कमलाताई होस्पेट यांची १२६ वी जयंती

मातृ सेवा संघाच्या संस्थापिका पद्मश्री कै. कमलाताई होस्पेट यांची १२६ वी जयंती नृसिंह जयंतीच्या दिवशी दि. १४ मे २०२२ रोजी सेंटेनरी ब्लॉक सभागृह येथे साजरी करण्यात आली. मातृ सेवा संघ महाल शाखेच्या कोषाध्यक्ष श्रीमती इरावती दाणी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी लाभल्या होत्या व महाल शाखेच्या सचिव श्रीमती वैदेही भाटे प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या.

पद्मश्री कमलाताई होस्पेट यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती इरावती दाणी आणि प्रमुख वक्त्या श्रीमती वैदेही भाटे यांचा शाल, श्रीफळ, रोपटे आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

मातृ सेवा संघाच्या उपाध्यक्षा सौ. रश्मी भावे यांनी आपल्या प्रास्ताविकात पद्मश्री कै. कमलाताई होस्पेट यांच्या बालपणापासून ते वैधव्यापर्यंतचा खडतर प्रवास व त्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्थापन केलेल्या संस्थेचा इतिहास सांगत त्यांच्या संपूर्ण जीवनप्रवासावर प्रकाश टाकला.

मातृ सेवा संघासाठी सामाजिक बांधिलकीच्या नात्याने केलेले कार्य तसेच संस्थेसाठी दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल डॉ. अतुल डाखोरे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

कोरोना महामारीच्या संकटकाळात मातृसेवासंघातील सर्व कर्मचाऱ्यांनी अतिशय निष्ठेने सेवाकार्य केले. सीताबर्डी सूतिकागृहातील सर्व डॉक्टर्स, परिचारिका, इतर कर्मचारी व कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

कोरोना महामारीच्या काळात श्री. सत्यभान मुडाहा, मेस ठेकेदार यांनी त्यांच्या मेसची सेवा निरंतर सुरू ठेवून संस्थेच्या सेवाकार्यात मोलाची भर टाकली. त्यांच्या या सेवाकार्यासाठी त्यांना प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

कोविड महामारीच्या काळात मातृ सेवा संघ, डेडिकेटेड कोविड रुग्णालयात अतिशय निष्ठेने सेवाकार्य केल्याबद्दल डॉ. रेश्मा गिरीपुंजे, डॉ. अमि रहातेकर यांचा मान्यवरांच्या हस्ते मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

यामध्ये डॉ. पुष्पा भावे, डॉ. रत्ना शेखावत, डॉ. वैशाली वराडकर, डॉ. स्मिता जैन, डॉ. सीमा देशमुख, डॉ. प्रतिभा लांजेवार, डॉ. शोआ खान, डॉ. सरिता जैस्वाल, डॉ. शिजु नायर, डॉ. पंकज अग्रवाल, डॉ. वैशाली गोमासे, डॉ. अल्फीया खान या डॉक्टरांचा तसेच सूतिकागृहातील सर्व परिचारिका, वार्ड कुली, सफाई कर्मचारी, स्वयंपाकी आणि कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

मातृसेवासंघाच्या सचिव डॉ. लता देशमुख यांचा कोरोना काळातील त्यांच्या अविश्रांत कार्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यकमाच्या प्रमुख वक्त्या श्रीमती वैदेही भाटे यांनी आपल्या भाषणातून सांगितले की ज्याप्रमाणे भक्त प्रल्हादाच्या प्रार्थनेला साद देऊन श्रीनृसिंह भगवानांनी हिरण्यकश्यपूच्या त्रासातून सर्वांची सुटका केली अगदी त्याचप्रमाणे कमलाताई यांनी देखील अनेक मातांचे दुःख जाणून त्यांना होणाऱ्या त्रासातून त्यांची सुटका करण्याकरिता नृसिंहाप्रमाणे त्यांचे रक्षण केले. म्हणूनच भावी परिचारीकांना कमलाताईंचा आदर्श डोळयापुढे ठेवून आपल्या कार्यात सेवाभाव ठेवून कार्य करावे असे सांगितले.

श्रीमती इरावती दाणी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मातृ सेवा संघ सीताबर्डी च्या व तेथील पदाधिकाऱ्यांच्या कार्याचे कौतुक आणि अभिनंदन केले. कमलाताईच्या प्रेरणेमुळेच मातृ सेवा संघाच्या सर्व शाखा दिवसेंदिवस प्रगती करीत आहेत असे त्या म्हणाल्या. संस्थेच्या सचिव डॉ. लता देशमुख ज्याप्रमाणे समर्पण भावनेने कार्य करीत आहेत ती आंतरिक प्रेरणा देखील कमलाताईचीच आहे असे म्हणत त्यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला.

कार्यकमाचे सूत्र संचालन श्रीमती मृणाली देशमुख यांनी व आभार प्रदर्शन डॉ. वृषाली देशपांडे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.




पद्मश्री कै. कमलाताई होस्पेट यांची १२६ वी जयंती निमित्य उपस्थित कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती इरावती दाणी, प्रमुख वक्त्या श्रीमती वैदेही भाटे, मातृसेवासंघाच्या सचिव डॉ. लता देशमुख, उपाध्यक्षा सौ. रश्मी भावे, कोषाध्यक्षा डॉ. वृषाली देशपांडे, तसेच प्रशस्तिपत्र स्वीकारताना डॉ. पुष्पा भावे, डॉ. रत्ना शेखावत, डॉ. स्मिता जैन

## मातृसेवासंघ, सीताबर्डी सौरऊर्जा प्रकल्प

मातृ सेवा संघ, सीताबर्डीला पर्सिस्टंट फाऊंडेशन यांच्या सौजन्याने सीएसआर मार्फत ३० केव्हीचे सौरऊर्जा प्रकल्प ''**सौरऊर्जा प्रकल्प लक्ष्य अक्षय ऊर्जा निर्मितीचे**'' देणगीदाखल प्राप्त झाले. प्रकल्पाचा उद्घाटन सोहळा दि. २९ जुलै २०२२ रोजी साजरा करण्यात आला. पर्सिसटेन्टचे मुख्य मा. श्री. समीर बेंद्रे यांच्या हस्ते मातृ सेवा संघ, सीताबर्डी च्या इमारतीचा छतावर सौर पॅनल जवळ श्रीफळ फोडून उद्घाटन सोहळ्याला सुरुवात करण्यात आली.

पर्सिसटेंट तर्फे श्री. राजीव सेठीया, श्री. रोहित भार्गव, केंद्र प्रमुख, नागपूर, श्रीमती योगिता आपटे तसेच मातृ सेवा संघाच्या अध्यक्षा डॉ. अरूणा बाभुळकर, सचिव डॉ. लता देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. वृषाली देशपांडे, सहसचिव सौ. रूपा जुनघरे, सीताबर्डी सूतिकागृहाच्या

वैद्यकीय अधीक्षिका डॉ. पुष्पा भावे, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. रत्ना शेखावत उपस्थित होते.

त्यांनतर रंजन सभागृहात पद्मश्री कै. कमलाताई होस्पेट व कै. वेणूताई नेने यांच्या फोटोला आदरांजली वाहून मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

मातृ सेवा संघाच्या सचिव डॉ. लता देशमुख यांनी प्रास्ताविक केले. सर्वप्रथम त्यांनी मातृ सेवा संघाला सौरऊर्जा प्रकल्प प्राप्त करून दिल्याबद्दल पर्सिस्टंट फाऊंडेशन आणि पर्सिस्टंट सिस्टमच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. पद्मश्री कै. कमलाताई होस्पेट यांनी सुरू केलेल्या सूतिकागृहाच्या आजपर्यंतच्या प्रवासाचा उलगडा करित मातृ सेवा संघाच्या इतरही समाजोपयोगी प्रकल्प आणि प्रवृत्तींबाबत माहिती दिली. १०१ वर्षापूर्वी सुरू झालेले मातृ सेवा संघाचे कार्य फक्त सूतिका आणि बालकांच्या सेवेपुरतेच मर्यादित नसून स्त्रीयांना वयाच्या विशिष्ट टप्यात उद्भवणाऱ्या समस्यांचे निदान आणि उपचार, संध्यादीप प्रकल्पा अंतर्गत होणाऱ्या सर्व तपासणीची सुविधा, कॉल्पोस्कोपी, मॅमोग्राफी, वंधत्व निवारणाकरिता निर्माण क्लिनिक, डेंटल युनिट अशा विविध प्रकारच्या मातृ सेवा संघात उपलब्ध असलेल्या सुविधांबाबत माहिती दिली. सौरऊर्जा प्रकल्पामुळे सूतिकागृहाचा विजेच्या बिलाचा भार कमी होईल त्यामुळे संस्थेची आर्थिक बचत होईल. पर्सिस्टंट फाऊंडेशन मातृ सेवा संघाला नेहमीच मदत करित असतात. अविरत आर्थिक मदत केल्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले.

सीताबर्डी सूतिकागृहाच्या वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. अमी रहातेकर यांनी डॉक्टरांच्या दृष्टीकोनातून सौरऊर्जा प्रकल्पाचे महत्त्व सांगीतले. त्यांनी सांगीतले की सौरऊर्जा प्रकल्प हे प्रदुषण मुक्त आहे. या प्रकल्पामुळे संस्थेची आर्थिक बचत होईलच त्याचबरोबर सूतिकागृहाच्या प्रत्येक विभागात ऊर्जेचा अविरत पुरवठा करण्यास सहाय्य होईल.

त्यानंतर मा. श्री. समीर बेंद्रे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की मातृ सेवा संघ आणि पर्सिस्टंट यांचा फार जुना संबंध आहे आणि आतापर्यत हे नाते कायम आहे. सध्याच्या महागाईच्या काळात कमी दरात रुग्णालय चालविणे अत्यंत अवघड आहे. प्रत्येक उपकरणे, महाग झालेली आहेत. त्यामध्ये विजेचा खर्च हा एक मोठा खर्च आहे. सौरऊर्जा प्रकल्पाच्या रूपाने आम्ही आपल्या खर्चाचा खारीचा वाटा उचलू शकलो याचे समाधान वाटते असे ते म्हणाले. ते पुढे म्हणाले की मातृ सेवा संघ गेली १०१ वर्षांपासून समाजकार्य करित आहे याचा खूप अभिमान आहे. आपल्या या कार्यात पर्सिस्टंट ला आपण सामील करून घेतले यासाठी त्यांनी आभार मानले व संस्थेसाठी आपले योगदान देण्याचे सदैव प्रयत्न राहील असेही ते म्हणाले. आपण समाजाचे देणे लागतो त्यामुळे काहीतरी परत करायला हवे यासाठी प्रत्येकाने प्रयत्नशील रहायला हवे. ही प्रत्येकाची स्वतःची जबाबदारी असायला हवी. त्याचप्रमाणे समाजातील मोठमोठया संस्थांनी पुढे येऊन सढळ हाताने मदत करायला हवी. आपण केलेल्या कार्याचे कुठे ना कुठे समाधान नक्की मिळेल अशी आशा त्यांनी दर्शविली. संस्थेच्या कार्याबद्दल त्यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

डॉ. वृषाली देशपांडे यांनी आभार प्रदर्शन केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.






सौरउर्जा प्रकल्पाच्या उद्घाटन सोहळ्यात उपस्थित मातृसेवासंघाच्या अध्यक्ष, डॉ. अरुणा बाभुळकर, सचिव डॉ. लता देशमुख, पर्सिसटेंट चे प्रमुख श्री. समीर बेंद्रे तसेच सर्व पदाधिकारी

## मातृ सेवा संघ ''संस्थापिकाद्वय पुरस्कार''

मातृ सेवा संघाच्या संस्थापिका कै. कमलाताई होस्पेट यांची पुण्यतिथी व कै. वेणूताई नेने यांच्या जयंती निमित्त दरवर्षी १५ नोव्हेंबरला संस्थापिकाद्वय पुरस्काराचे आयोजन संस्थेतर्फे केले जाते. कै. कृष्णाताई भावे व लेले परिवार पुरस्कृत हा पुरस्कार प्रामुख्याने विदर्भातील व साधारणत: महाराष्ट्रातील समाजोपयोगी कार्य करणाऱ्या कर्तबगार महिलांना दिल्या जातो. पुरस्काराचे हे २७ हे वर्ष आहे. वर्ष २०२१-२२ चा पुरस्कार मेळघाट येथील संपूर्ण बांबु केंद्राच्या अध्यक्षा डॉ. निरुपमा देशपांडे यांना प्रदान करण्यात आला.

मातृसेवासंघाच्या सन्माननीय सल्लागार, स्वातंत्र्य सैनिक व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ता श्रीमती लीलाताई चितळे यांना वर्ष २०२० चा नागभूषण पुरस्कार जाहीर झाला. या सोहळयात श्रीमती लीलाताई चितळे यांचा सत्कार ॲड. श्री. प्रभाकरराव मारपकवार यांच्या हस्ते करून त्यांचे अभिनंदन केले. दिनांक १८ नोव्हेंबर २०२२ रोजी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते त्यांना नागभूषण पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

आज दोन माहेरवाशिणींचा सन्मान माझ्या हातून झाला याचा मला विशेष आनंद वाटतोय अशी भावना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ॲड. श्री. प्रभाकरराव मारपकवार यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली. ते पुढे म्हणाले की कमलाताईंसाठी मला कायम नितांत आदर वाटत आला आहे. मला त्यांचा प्रत्यक्ष आशीर्वाद घेता आला हे मी माझे भाग्य समजतो. माझ्या मावशीनी कमलाताईंच्या मार्गदर्शनाखाली सुरू केलेले समाजसेवेचे कार्य आज वयाच्या ९८ व्या वर्षी देखील त्या लातूर येथे पार पाडित आहे, याचा मला अभिमान वाटतो. मातृ सेवा संघाशी माझे फार जुने नाते आहे व ते पुढेही उत्तरोत्तर दृढ होईल असे ते म्हणाले.

संस्थापिकाद्धय पुरस्काराची पार्श्वभूमी संस्थेच्या सचिव डॉ. लता देशमुख यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून दिली. यावेळी सौ. रश्मी भावे, उपाध्यक्ष, मातृ सेवा संघ, डॉ. वृषाली देशपांडे, कोषाध्यक्ष, सीताबर्डी सूतिकागृहाच्या वैद्यकिय अधिक्षिका डॉ. पुष्पा भावे, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. रत्ना शेखावत, महाल शाखेच्या सचिव श्रीमती वैदेही भाटे, श्रीमती सुनिला थेरगावकर, श्रीमती कांचन बांते, लेले परिवारातर्फे श्री. अरुण लेले व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. यश:श्री वाघ यांनी केले. ईशस्तवन सौ. शिल्पा नगरारे आणि आभार प्रदर्शन पंचवटी वृद्धाश्रमाच्या व्यवस्थापिका श्रीमती विभावरी टिकेकर यांनी केले.



मातृ सेवा संघाच्या वरिष्ठ सल्लागार श्रीमती लीलाताई चितळे यांना वर्ष २०२० चा नागभूषण पुरस्कार जाहीर झाला. संस्थापिकाद्वयी पुरस्कार सोहळ्याप्रसंगी ॲड. श्री. प्रभाकरराव मारपकवार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून मातृ सेवा संघातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले. उपस्थित सौ. रश्मी भावे, उपाध्यक्ष, मातृ सेवा संघ.

## पद्मश्री कमलाताई होस्पेट व्याख्यान व CME

सीताबडी सूतिकागृहाच्या सेवाकार्याला २०२१ साली १०० वर्षे पूर्ण झाले. शताब्दी वर्षात मातृ सेवा संघाच्या संस्थापिका पद्मश्री कमलाताई होस्पेट व्याख्यान व सी.एम.ई. सुरू करण्यात आली. रविवार दि. २० नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत पद्मश्री कमलाताई होस्पेट व्याख्यान व सी.एम.ई. चे आयोजन रंजन सभागृह, मातृ सेवा संघ, सीताबर्डी येथे करण्यात आले. Safe Motherhood- One Step -head सी.एम.ई. चे घोषवाक्य होते. AMOGS Emergency Obstetrics Committee यांच्या संयुक्त विद्यमाने या सी.एम.ई. चे आयोजन करण्यात आलेले होते.

सौ. कांचन गडकरी, अध्यक्ष, मातृ सेवा संघ, महाल शाखा मुख्य अतिथी म्हणून लाभलेल्या होत्या. त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करम्यात आले. डॉ. वैशाली वराडकर कार्यक्रमाच्या समन्वयक यांनी स्वागतीय भाषण केले. डॉ. लता देशमुख, सचिव, मातृ सेवा संघ यांनी आपल्या प्रास्ताविकाद्वारे मातृ सेवा संघाच्या विविध प्रकल्प, प्रवृत्तीच्या आजवरचा प्रवासाविषयी माहिती दिली. डॉ. चैतन्य शेंबेकर, Chairperson AMOGS Emergency Obstetrics Committee यांनी मातृ सेवा संघाच्या सेवाकार्याचे कौतुक केले आणि निरंतर वैद्यकीय शिक्षणाच्या महत्वावर भर दिला. डॉ. वृषाली देशपांडे, कोषाध्यक्ष, मातृ सेवा संघ यांनी मुख्य पाहुण्यांचा परिचय करून दिला. सौ. कांचन गडकरी यांनी आपल्या भाषणामध्ये

पद्मश्री कमलाताई होस्पेट यांच्या कार्याबद्दल व मातृ सेवा संचाने Safe Motherhood-One Step -head या विषयावर सी.एम.ई. आयोजित करण्याबद्दल कौतुक व्यक्त केले. प्रमुख पाहुणे सौ. कांचन गडकरी, यांचा सत्कार मातृ सेवा संघाच्या उपाध्यक्षा सौ. रश्मी भावे यांनी केले व डॉ. चैतन्य शेंबेकर यांचा सत्कार डॉ. लता देशमुख यांनी केला. डॉ. कामिनी नाकाडे यांनी आभार प्रदर्शन केले.पद्मश्री कमलाताई होस्पेट व्याख्यान: डॉ. वर्षा ढवळे यांनी Stitch in Time saves Nine या विषयावर प्रभावीपणे प्रस्तुत केले,

डॉ. निर्मला वझे व डॉ. मनोरमा पुरवार व्याख्यानाकरिता चेअरपर्सन म्हणून लाभलेले होते. सी.एम.ई. मधे नागपूर मधील वरिष्ठ डॉक्टरांनी विविध विषयांवर व्याख्यान व मार्गदर्शन केले. डॉ. नितू सिंग आणि डॉ. मनिषा साहू यांनी कार्यक्रमाचे परीक्षण केले. १०३ डॉक्टरांनी सी.एम.ई. चा लाभ घेतला.



दीपप्रज्वलन करताना प्रमुख अतिथी सौ. कांचन गडकरी, मातृ सेवा संघाच्या उपाध्यक्ष सौ. रश्मी भावे, सचिव डॉ. लता देशमुख, सीताबर्डी सूतिकागृहाच्या वैद्यकीय अधीक्षिका डॉ. पुष्पा भावे, डॉ. चैतन्य शेंबेकर व डॉ. वैशाली वराडकर

**CME**

| TOPICS | FACULTY |
|---|---|
| 1. Anaemia in Preganancy | Dr. Rajasi Sengupta |
| 2. Obesity & Preganacy | Dr. Shivangi Jahagirdar |
| 3. Strategies & resources to address burden of Hypertensive disorders of pregnancy | Dr. Rujuta Fuke |
| 4. A stitch in Time Saves Nine | Dr. Warsha Dhawale |
| 5. Clinical Practise Guidelines in GDM | Dr. Shuchita Mundle |
| 6. Pregnancy over age 35- a number game | Dr. Shilpi Sud |
| 7. Guidelines for early Identification of Sepsis in Pregnancy | Dr. Moushmi Tadas |
| 8. Liver Disease in Pregnancy | Dr. Abhiram Paranjpe |
| 9. When an Obstetrician needs to refer patient to Psychiatrist | Dr. Praveer Waradkar |
| 10. Cardiomyopathy in Preganacy | Dr. Parag Rahatekar |
| 11. Thrombocytopenia in Pregnancy | Dr. Madhuri Gawande |






पद्मश्री कमलाताई होस्पेट व्याख्यानमाला सादर करताना डॉ. वर्षा ढवळे

# मातृसेवा संघाच्या सर्व शाखांसह प्रसूती विषयक अहवाल


## बाह्यरुग्ण विभाग




बाह्यरुग्ण विभागात प्रसूतीपूर्व, प्रसूतिपश्चात तपासणी, स्त्रीरोग, कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया, कुटुंबनियोजन साधने, गर्भपात, वंध्यत्वनिवारण, फिजियोथेरापी, डेण्टल युनिट इत्यादी तसेच लहान बालकांच्या आरोग्य तपासणीचा समावेश आहे.

धमार्थ संस्था म्हणून, गरीब रुग्णांना १०% पूर्ण धर्मार्थ व १०% अर्ध धर्मार्थ सवलत देण्यात येते. अहवाल सालीच्या शेवटी एकूण २३२ (पूर्ण धर्मार्थ ८ व अर्ध धर्मार्थ २२४) रुग्णांनी या सवलतीचा लाभ घेतला.

# सोनोग्राफी





आजच्या आधुनिक युगात सोनोग्राफी व कलर डॉपलर हे अत्याधुनिक तपासणी चे यंत्र आहे. या व्दारे गर्भावस्थेत अर्भकाची वाढ, वय (Period of gestation), अवयव इ. बद्दल माहिती मिळते. महिलांमध्ये Ovulation Study आणि स्त्रीरोगाच्या निदानाकरिता सोनोग्राफी करणे आवश्यक आहे. फक्त महाल व सीताबर्डी सूतिकागृहामध्येच सोनोग्राफी करण्यात येते. सीताबर्डी सूतिकागृहात दि. १४/१०/२०२२ ला सोनोमॅमोग्राफी प्रोब घेण्यात आले.

अहवालसाली ८१५१ सोनोग्राफी व ९ सोनोमॅमोग्राफी करण्यात आल्या.


# शस्त्रक्रिया

अहवाल वर्षी सर्व शाखा मिळून एकूण २९१० शस्त्रक्रिया झाल्या. यामध्ये सिझेरियन, इव्हॅक्युएशन, गर्भपात, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, डी. ॲण्ड सी., हिस्ट्रेक्टॉमी, लॅप्रॉटॉमी, लॅप्रोस्कोपी, हिस्ट्रोस्कोपी, एक्सप्लोरेशन इत्यादी शस्त्रक्रियांचा समावेश आहे. यात महाल शाखेच्या २५ पिडीयाट्रिक शस्त्रक्रियांचा सुद्धा समावेश आहे.



# प्रसूती


अहवालसाली एकूण ३१२२ प्रसूती झाल्या. त्यात ७७३ स्वाभाविक प्रसूतींचा समावेश आहे. अहवालवर्षी स्वाभाविक प्रसूतीची संख्या समाधानकारक आहे.




| | 2019-20 | 2020-21 | 2021-22 | 2022-23 |
|---|---|---|---|---|
| Total Deliveries | 3456 | 2861 | 3064 | 3122 |
| Normal deliveries | 1123 | 869 | 859 | 773 |

# एन.आय.सी.यु./पी.बी.यु.

अहवाल साली एकूण १२६९ बाळांनी एन.आय.सी.यु./पी.बी.यु. चा लाभ घेतला आहे. यामध्ये सीताबर्डी, महाल, जबलपूर व बिलासपूर शाखेतील बाळांचा समावेश आहे.



# प्रकल्प व प्रवृत्ती

## मातृ सेवा संघ समाजकार्य संस्था, बजाजनगर, नागपूर





कै.डॉ. सत्यबाला तायल या हाडाच्या समाजसेविकेने ऑक्टोबर १९५८ साली मातृ सेवा संघाच्या छत्रछायेत समाजकार्य संस्थेची स्थापना केली. अहवालसाली मातृ सेवा संघ समाजकार्य संस्थेने समाजकार्य शिक्षणाच्या क्षेत्रात ६५ वर्ष पूर्ण केलीत. १९६२ सालापासून समाजकार्याचे शिक्षण देणारे हे महाविद्यालय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाशी संलग्नित आहे. महाविद्यालयाचे वेगळे असे वैशिष्टय समाजकार्यात आहे की संपूर्ण भारतातील प्रत्येक राज्यातील मुलं व मुली समाजकार्याचे शिक्षण पूर्ण करून जातात.

महाविद्यालयात मुला मुलींना बी.एस.डब्ल्यु, एम.एस.डब्ल्यु पी.एच.डी, शॉर्ट टर्म कोर्स इन कम्युनिकेटीव इंग्लिश, शॉर्ट टर्म कोर्स इन रिसर्च मेथडॉलॉजी (संशोधन पद्धती), पदव्यूत्तर समुपदेशन प्रमाणपत्र अभ्यासक्रम इत्यादी अभ्यासक्रम चालविले जातात. अहवाल साली एकूण २७२ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात विविध अभ्यासक्रंमात प्रवेश घेतला. महाविद्यालयाला NACC - B++ Grade (CGPA-2.91) मिळाले आहे.

संस्थेला उच्चशिक्षण व संशोधन केन्द्र (Centre for Higher Learning & Research) म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महराज नागपूर विद्यापीठाकडून मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार आचार्य पदवीकरीता २० विद्यार्थ्यांकरिता मान्यता आहे. केन्द्राची मान्यता दिनांक ३ मे २०२८ पर्यंत देण्यात आलेली आहे.

## नंदनवन दुर्बलमनस्क मुलांची शाळा, सीताबर्डी

मानसिक दिव्यांग हा समाजातील बराच मोठा व दुर्लक्षित घटक आहे. एकूण लोकसंख्येच्या किमान दोन टक्के तरी मानसिक दिव्यांग असतात. मानसिक दिव्यांग मुलांचे शिक्षण, प्रशिक्षण व पुर्नवसन हे लक्षात घेऊन मातृसेवासंघाची एक प्रवृत्ती नंदनवन दिव्यांग मनस्क मुलांची शाळा व संरक्षित कर्मशाळा १ एप्रिल १९६० साली सुरू करण्यात आली.




प्रकल्पास समाज कल्याण विभागाकडून १००% अनुदान मिळते. अहवाल साली शाळेला ६२ वर्ष पूर्ण झाली आहेत. शाळेची उत्तरोत्तर प्रगती होत गेली याचा आम्हाला अभिमान आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक नवनवीन योजनांची पूर्तता करण्याचा शाळा सतत प्रयत्न करित असते. नागपूर बाहेरील मानसिक दिव्यांग विद्यार्थ्यांना निवास व भोजन उपलब्ध करुन शाळेत शिक्षण मिळावे या उद्देशाने वसतिगृहाची स्थापना करण्यात आली. नंदनवन शाळेत एकूण प्रवेशित मुलांची संख्या १०० असून त्यात ७३ मुले व २७ मुली आहेत.

शाळेच्या मा. मुख्याध्यापक श्रीमती भावना नंदनवार दिनांक ३१ डिसेंबर २०२२ रोजी शाळेच्या कामकाजातून सेवानिवृत्त झाल्या. १९९७ ते २०२२ या कार्यकाळात विशेष शिक्षक ते मुख्याध्यापक या पदावर कार्य करित त्यांनी नंदनवन शाळेला आपली सेवा दिली.

## नंदनवन दुर्बल मनस्क मुलांची संरक्षित कर्मशाळा, लक्ष्मीनगर



नंदनवन संरक्षित कर्मशाळेत एकूण ४९ विद्यार्थी आहेत, त्यात २५ मुले आणि २४ मुली आहेत. संरक्षित कर्मशाळेत १८ वर्षाच्या पुढच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. विद्यार्थ्यांना विविध व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येते. त्यात फ्रेटवर्क, हातमाग, विणकाम,

बुकबाईंडिंग, केनिंग, खडू, मेणबत्त्या, कुकरी, खिळयावरचा रुमाल, पायपोस, स्क्रीन प्रिंटिंग, फाइल्स, पॉपकॉर्न, मसाले, फिनाइल तयार करणे याचा समावेश आहे. मुलांना कामाचा मोबदला दिला जातो. शाळेतील विद्यार्थ्यांच्या इतर कलागुणांना वाव मिळावा म्हणून मुलांना खेळ, गायन, चित्रकला, नृत्य इत्यादी शिकविले जातात.

## मातृसेवासंघ पंचवटी वृद्धाश्रम




| | 2019-20 | 2020-21 | 2021-22 | 2022-23 |
|---|---|---|---|---|
| | 114 | 91 | 80 | 81 |
| Total Beneficiaries | 114 | 91 | 80 | 81 |

पद्मश्री कै. कमलाताई होस्पेट ह्यांनी ६ नोव्हेंबर १९६१ रोजी पंचवटी वृद्धाश्रमाची सुरुवात केली. अहवालसाली वृद्धाश्रमाला ६२ वर्ष पूर्ण होत आहेत. मातृसेवासंघाच्या अनमोल सेवेतून मुक्त झालेल्या स्त्रियांना त्यांच्या वृद्धापकाळात आनंदाने जगता यावे म्हणून या वृद्धाश्रमाची स्थापना झाली.

आज पंचवटी वृद्धाश्रम नागपूर तसेच मातोश्री वृद्धाश्रम वर्धा हे दोन्ही वृद्धाश्रम विदर्भातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात एक आदर्श वृद्धसेवा संस्था म्हणून मानले जातात. आज बदलत्या काळाप्रमाणे वृद्धाश्रमाची आवश्यकता दिवसेंदिवस वाढत आहे. अहवाल साली पंचवटी येथे प्रवेशितांची संख्या ४५ असून यात १० पुरूष व ३५ महिलांचा समावेश आहे यातील ११ अनुदानीत आहेत. मातोश्री वृद्धाश्रमामध्ये ३६ प्रवेशितांची संख्या असून, यात १९ पुरुष व १७ महिलांचा समावेश आहे. पंचवटी व मातोश्री वृद्धाश्रमातील एकूण प्रवेशीतांची संख्या ८१ आहे.

## मातृ सेवा संघ शिशुगृह मेडिकल कॉलेज, नागपूर

मातृसेवासंघाद्वारा संचालित फाऊंडलिंग होमची स्थापना डॉ. सत्यबाला तायल यांनी २८ जानेवारी १९८२ साली केली असून प्रकल्पाला ४१ वर्ष पूर्ण झाले. प्रकल्पात भरती होणाऱ्या निराधार मुलांचे पुनर्वसन करणे हे प्रकल्पाचे प्रमुख उद्देश आहे. प्रकल्पाला ० ते ६ वर्ष वयोगटातील १० मुलांची मान्यता आहे. विशेष दत्तक संस्था (Special Adoption Agency -SAA) म्हणून प्रकल्पाला मान्यता मिळालेली आहे. प्रकल्पाव्दारे देशात व परदेशात मुले दत्तक दिली जातात. Central Adoption Resource Authority - CARA द्वारा निर्देशित मार्गदर्शक तत्वानुसार दत्तकासंबधी नवीन मार्गदर्शिका १ ऑगस्ट २०१५ पासून लागू झाली. अहवालसाली बाळांची संख्या एकूण १४ होती त्यात

७ मुली व ७ मुलांचा समावेश आहे. अहवाल साली प्रकल्पामार्फत एकूण ४ मुला-मुलींचे दत्तक विधानाद्वारे पुनर्वसन झाले. २ मुले देशात व २ मुली परदेशात दत्तक दिल्या. १ मुलगा व १ मुलगी फास्टर केअरमध्ये देण्यात आले. ४ मुले व ४ मुली इतर संस्थेत स्थलांतरीत करण्यात आले.

संस्थेच्या बालरोग तज्ञ डॉ. सीमा पांडे आठवड्यातून २ वेळा जातात व मुलांची तपासणी करतात. मुलांचे लसीकरण, त्रैमासिक मूल्यमापन या कामात त्यांची मोलाची मदत मिळते.

गेल्या ४१ वर्षापासून कोणत्याही प्रकारच्या शासकीय अनुदानाशिवाय प्रकल्प संस्थेद्वारे चालविला जातो. हे प्रकल्प देणगीदारांनी दिलेल्या आर्थिक मदतीने चालू आहे. सर्व देणगीदारांचे आम्ही व मातृसेवासंघ सदैव ऋणी आहोत.

शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे मातृ सेवा संघाद्वारे चालविण्यात येणारी प्रवृत्ती ''फाउंडलिंग होम'' (शिशुगृह) ला बंद करण्याविषयी दि. ७/११/२०२२ रोजी झालेल्या मातृ सेवा संघ, शिशुगृहच्या स्थायी समितीत चर्चा करण्यात आली.


''फाउंडलिंग होम'' (शिशुगृह) च्या स्थायी समितीतून आलेल्या विषयावर चर्चा व निर्णय घेण्याकरिता मातृ सेवा संघाच्या कार्यकारिणी ची तातडीची सभा बुधवार दिनांक ९/११/२०२३ रोजी दुपारी ३ वाजता घेण्यात आली. सभेत या विषयावर विस्तृत चर्चा झाली. त्यात खालील मुद्दे समोर आलेत.

१. दिवसेंदिवस दत्तक विधानाचे नियम जाचक होत चालले आहेत. तसेच अनेक आर्थिक अडचणीही संस्थेला येत आहेत. त्यामुळे फाउंडलिंग होम चालविणे कठीण जात आहे.
२. शिशुगृहासाठी वापरण्यात येणाऱ्या जागेची मालकी शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय यांची असून ती जागा त्यावेळी अधिष्ठातांकडून संस्थेला वापरण्याकरिता देण्यात आली होती. त्यामुळे त्यांच्याकडून जागेबद्दल सतत विचारणा करण्यात येते.
३. मानधनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या ही समस्या उद्‌भवतात.

वरील सर्व बाबींचा विचार करता मातृ सेवा संघ, शिशुगृह, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे चालविण्यात येणारी प्रवृत्ती ''फाउंडलिंग होम'' (शिशुगृह) दिनांक ३१ मार्च २०२३ पर्यंत बंद करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

तसेच केंद्रिय दत्तक ग्रहण संसाधन प्राधिकरण, दिल्ली, जिल्हा महिला बालविकास आयुक्तालय, पुणे, जिल्हा महिला बालविकास अधिकारी, नागपूर, बाल कल्याण समिती, नागपूर यांना प्रवृत्ती बंद करण्याविषयी कळविण्यात आले.

संस्थेत उपस्थित असलेल्या ७ बालकांना नागपूरातील इतर संस्थेत स्थलांतरीत करण्यात आले.




# स्नेहांगण दिव्यांग मुलांची निवासी शाळा

सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती उषा संत आणि अस्थिशल्य चिकित्सक पद्मश्री डॉ. विक्रम मारवाह ह्यांनी ५ एप्रिल १९८१ रोजी आंतरराष्ट्रीय अपंग वर्षाचे औचित्य साधून स्नेहागंण दिव्यांग मुलांच्या शाळेची स्थापना केली. अहवालसाली शाळेची ४२ वर्ष पूर्ण होत आहेत. दिव्यांग मुलांचे पुनर्वसन प्रकल्पात निवासी शाळा शारीरिकरीत्या अपंग असलेल्या मुलांना शिक्षण व प्रशिक्षण देण्यात येते. प्रकल्प राज्य शासन समाजकल्याण विभागाकडून अनुदानित आहे. शासनाकडून लाभार्थी मान्य संख्या ५० असून ४०% ते ६०% अपंगत्व असणे आवश्यक आहे.

निवासी शाळेत १८ वर्षापर्यंतच्या अस्थिव्यंग मुला-मुलींना प्रवेश देण्यात येतो. निवासी शाळेत वर्ग १ ते ८ पर्यंतचा अभ्यासक्रम शिकविला जातो. ५० निवासी मुला-मुलींसाठी अनुदान तत्वावर तसेच सत्र २००६-२००७ पासून १५ अनिवासी मुला-मुलींसाठी विना अनुदान तत्वावर राज्य शासनाच्या मान्यतेनुसार प्रवेश देण्यात येतो. मुलांना विविध भौतिकोपचार साधने जसे - कॅलिपर, पाटले, क्रचेस, वॉकर, व्हीलचेअर, ट्रायसिकल, ट्रायपॉड स्टिक, इत्यादी तसेच सकस आहार, विविध खेळ, मनोरंजनाची साधने, शालेय शैक्षणिक साहित्य, गणवेष आणि पाठ्यपुस्तके मोफत पुरविण्यात येतात. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी नामांकित अस्थिशल्य चिकित्सक डॉ. सुश्रुत बाभुळकर यांचे मार्फत शाळेतील अस्थिव्यंग मुला-मुलींचे तपासणी करून ऑपरेशन आणि त्यानंतर व्यायामोपचार व भौतिकोपचार देण्यात येतात. तसेच विद्यार्थ्यांचे शारीरिक पुनर्वसनासाठी आवश्यक ते उपचार सुश्रुत हॉस्पिटल येथे विनामूल्य करण्यात येतात. संस्था त्यांची ऋणी आहे.

या शिवाय दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त कला गुणांना वाव मिळावा या दृष्टीने विविध कलाही विद्यार्थ्यांना शिकविण्यात येतात. अशा प्रकारे शाळेत अपंग विद्यार्थ्यांचे

शारीरिक, शैक्षणिक पुनर्वसन करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतो. शासनाकडून मंजूर केलेले शिक्षक कमी पडतात, म्हणून समाजातील काही अनुभवी महिला, विद्यार्थ्यांना नि:शुल्क शिक्षण व प्रशिक्षण देतात. संस्था त्यांची आभारी आहे.

सत्र २०२२-२०२३ मधे एकूण प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या ५० असून त्यात २७ मुले व २३ मुली होत्या.




## विकलांग मुलांचे पुनर्वसन प्रकल्प

मातृ सेवा संघाच्या छत्राखाली विकलांग/अस्थिव्यंग विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणानंतर आत्मनिर्भर होऊन उभे राहण्याकरिता व विद्यार्थ्यांचा जीवनाबाबतचा दृष्टिकोन सकारत्मक बनावा, मनोबल वाढावे म्हणून प्रकल्पाद्वारे त्यांना व्यवसायाचे पूर्व प्रशिक्षण देऊन, छोटे-मोठे हस्तकला व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यात येते. सन २००२-२००३ पासून स्नेहांगण शाळेव्यतिरिक्त इतर लाभार्थी/विद्यार्थी आणि इतर इच्छुक दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यास सुरूवात केली. अहवालसाली प्रकल्पाला २० वर्ष पूर्ण होत आहेत. अहवालवर्षात ५० विद्यार्थी व ६ पालकांनी समुपदेशनाचा लाभ घेतला. अहवालवर्षात खालील विद्यार्थ्यांना प्रकल्पात प्रशिक्षण घेतल्यानंतर नोकरी मिळविण्यास यश मिळाले.


१. सचिन पांडे २. सीमा वाहाने चव्हाण ३. राकेश काकडे

४. रवींद्र राऊत ५. परमेश्वर चव्हाण

## मातृसेवासंघ कौटुंबिक सल्ला केंद्र, बजाजनगर व समाजकार्य संस्था

मातृसेवासंघाद्वारे कुटुबांना विघटीत होण्यापासून वाचविणे, समस्या ग्रस्त व्यक्तींना आवश्यक ती मदत पुरविणे, स्त्रियांवरील अत्याचार कमी करणे या हेतूने सल्ला व मार्गदर्शन सेवा पुरविण्यासाठी कौटुंबिक सल्ला केंद्राची स्थापना डॉ. सत्यबाला तायल यांनी १६ नोव्हेंबर

१९८७ रोजी केली. अहवाल साली केंद्राला ३६ वर्ष पूर्ण होत आहेत. कुटुंबाचे भारतीय समाजात महत्वाचे स्थान आहे. केंद्रात सल्ला सेवा देताना व्यक्तीचे वय, लिंग, सामाजिक व आर्थिक स्तर, शिक्षण याचा विचार न करता केवळ समस्याग्रस्त व्यक्ती म्हणून मदत केल्या जाते.




त्यांना आवश्यक त्या सुविधा उदा. कायदेविषयक सहाय्य, पुर्नवसनाच्या दृष्टीने मदत, वैद्यकीय व मानसोपचार तज्ञांची मदत, रोजगार व व्होकेशनल ट्रेनिंग संबंधी मार्गदर्शन केल्या जाते. अनेक कुटुंबातील हरवलेले सुख केन्द्राच्या मदतीने परत आले आहे. ऑक्टोबर २०१५ पासून अनुदानाची ९०% रक्कम समाज कल्याण सल्लागार बोर्डाकडून प्राप्त होते व १०% रक्कमेचा सहभाग संस्थेचा असतो. अहवाल साली दोन्ही केन्द्र मिळून एकूण ८३२ नवीन केसेसची नोंदणी करण्यात आली.



## मातृ सेवा संघ कर्मचारी महिला वसतिगृह बजाजनगर, वसतीगृह

नागपूर शहरात अनेक प्रातांतून तसेच ग्रामीण भागातून येणाऱ्या कर्मचारी महिला व विद्यार्थीनींना राहण्याची व जेवणाची उत्तम सोय उपलब्ध करून देण्याकरिता १९७७ साली डॉ. सत्यबाला तायल यांनी कर्मचारी महिला वसतिगृहाची स्थापना केली. अहवाल साली कर्मचारी महिला वसतीगृहाला ४६ वर्ष पूर्ण होत आहेत. वसतीगृहात सर्व सोयी उपलब्ध आहेत. वसतीगृहाच्या सुरक्षितेच्या दृष्टीने सर्व बाजूने सी.सी.टीव्ही कॅमरे लावण्यात आले. अहवाल वर्षी वसतीगृहात एकूण ७८ प्रवेशिकांना प्रवेश देण्यात आला.

## सीताबर्डी व इतर वसतीगृह

मातृसेवासंघ कर्मचारी महिला वसतीगृह, सीताबर्डीची स्थापना १९५४ साली परिचारिका प्रशिक्षणार्थी करिता करण्यात आली. बाहेरगावाच्या मुली ज्या नागपूरमध्ये शिक्षणाकरीता व नोकरीसाठी येतात अश्या महिलांना सुरक्षित निवास व उत्तम भोजनाची सोय व्हावी या उद्देशाने महिला वसतिगृह सुरू करण्यात आले. अहवालवर्षी वसतीगृहाला ६९ वर्षे पूर्ण झाले.

अहवालवर्षी नागपूर व वर्धा येथील वसतीगृहात २०८ कर्मचारी महिला वास्तव्यास होत्या. कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही.

## सुधारित सहायक परिचारिका प्रसविका प्रशिक्षण केंद्र

१९२७ पासून महिलांना स्वावलंबी बनविणे व सूतिकांना उत्कृष्ट सेवा मिळण्याच्या उद्देशाने कै. कमलाताई होस्पेट यांनी हा प्रकल्प सुरु केला. सुधारित सहाय्यक परिचारीका प्रसविका प्रशिक्षण केन्द्र योजना, मातृसेवा संघ, सीताबर्डी सूतिकागृह येथे ९६ वर्षापासून व महाल सूतिकागृह येथे ४३ वर्षापासून अव्याहत सुरू आहे. अहवाल वर्षी एकूण २० मुलींना प्रशिक्षण देण्यात आले. ऑक्टोबर २०२० मध्ये महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाच्या परीक्षेचा निकाल - महाल १००% व सीताबर्डी ७८% असून महालचे २ विद्यार्थिनी ऑनर्स, १२ विद्यार्थिनी प्रथम श्रेणी व सीताबर्डी चे १ विद्यार्थिनी ऑनर्स व १५ विद्यार्थिनी प्रथम श्रेणी मध्ये उत्तीर्ण झाल्या. शिक्षकवृंदांचे संस्थेतर्फे अभिनंदन.

**परीक्षेचा निकाल खालील प्रमाणे आहे.**

| सुधारिक सहायक परिचारिका प्रसविका प्रशिक्षण केंद्र | सीताबर्डी सूतिकागृह | महाल सूतिकागृह |
|---|---|---|
| परीक्षेचा निकाल | १००% | १००% |
| प्रथम क्रमांक | हर्षाली अखिल पिल्लेवार | प्रियंका किनकर |
| द्वितीय क्रमांक | - | चंचल किराड |
| ऑनर्स | १ | २ |
| प्रथम श्रेणी | १५ | १० |
| द्वितीय श्रेणी | - | - |
| अनुत्तीर्ण | - | - |
| एकूण विद्यार्थीनी | १६ | १२ |

# मातृसेवा मासिक

१९६६ मध्ये मातृसेवासंघाच्या संस्थापिका कै. कमलाताई होस्पेट यांनी मातृसेवा मासिकाची सुरुवात केली. मासिकाचे वर्षातून १२ अंक काढले जातात. सर्व शाखा, प्रकल्प व प्रवृत्तींचे वार्षिक अहवाल मासिकाच्या डिसेंबर महिन्याच्या अंकात प्रकाशित केला जातो. मुख्यत्वे मासिकात संघाच्या शाखा, प्रवृत्ती, प्रकल्पांच्या कार्याची माहिती दिली जाते, शिवाय महत्त्वाच्या घटना व प्रबोधनपर लेखही दिले जातात. तसेच महिला व बालक यांच्या आरोग्य व आहार या संबंधीचे लेख, व कर्तृत्ववान महिलांविषयीची माहिती मासिकात दिली जाते. मासिकाची वार्षिक वर्गणी रु.२०० रुपये असून आजीव सदस्यत्व रु.१००० आहे. वार्षिक वर्गणीदार जवळपास ११० असून आजीव वर्गणीदार ४७५ आहेत.

# मातृसेवासंघ सन्मित्र कॅंटीन, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर

आपल्या सेवेची ४४ वर्षे पूर्ण करणारे हे केन्द्र शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे सहकारी तत्वावर चालविले जाते. येथे रुग्णालयातील रुग्णांकरिता व त्यांच्या नातेवाईकांकरिता अत्यंत अल्प दरात चांगल्या प्रतीचा चहा, गरम पाणी, दूध, नाश्ता इ. पुरविले जाते. दिक्र ३१ मार्च २०२३ ला सन्मित्र उपहारगृह बंद करण्यात आले.

# कुसुम विहार

मातृ सेवा संघाच्या माजी अध्यक्षा कै. डॉ. कुसुमताई वांकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ तसेच त्यांच्या इच्छेप्रमाणे व त्यांच्याच आर्थिक मदतीने मातृ सेवा संघ परिसरात दि. २७ डिसेंबर २०१४ रोजी 'कुसुम विहार' प्रकल्प सुरू करण्यात आला. तळमजल्यावर ज्येष्ठ नागरिकांकरीता अल्प निवासगृह व पहिल्या माळ्यावर डॉक्टरांच्या निवासाची सोय करण्यात आली आहे. बऱ्याच कुटुंबांना काही दिवस बाहेर गावी किंवा परदेशात जायचे असल्यास त्या वेळी वृद्धांना घेऊन जाणे शक्य नसते. त्यांची अडचण लक्षात घेऊन या प्रकल्पात जेष्ठ नागरिकांना/वृद्ध रुग्णांना सेवा देण्यात येते. जेणे करुन त्यांचे कुटुंबीय निश्चिंतपणे बाहेर जाऊ शकतील किंवा आपले काम करू शकतील. येथे उत्तम निवास, भोजन, शुश्रूषा व आधुनिक सोयी उपलब्ध आहेत. वैद्यकीय उपचाराकरिता डॉक्टर्स ही आहेत. गरजेप्रमाणे ज्येष्ठ नागरिक 'कुसुम विहार' मध्ये येऊन राहतात व उपलब्ध सोईंचा लाभ घेतात. या प्रकल्पाला ९ वर्ष पूर्ण होत आहेत. या अहवाल वर्षात २१ व्यक्ती कुसुम विहार मधे वास्तव्याला होत्या.

# विशेष कार्यक्रम

**१. जागतिक परिचारिका दिन :** दि. १२ मे २०२२ रोजी परिचारीका दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाकरिता श्रीमती शारदा चौरे Senior Sister Tutor शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. तसेच कार्यक्रमाला डॉ. अरुणा बाभुळकर, अध्यक्ष, मातृ सेवा संघ, डॉ. लता देशमुख,

सचिव, मातृ सेवा संघ, डॉ. पुष्पा भावे वैद्यकीय अधीक्षिका, सीताबर्डी सूतिकागृह, डॉ. रत्ना शेखावत, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी, सीताबर्डी सूतिकागृह व आर.ए.एन.एम. स्कूलच्या प्राचार्या श्रीमती कांचन बांते, सर्व शिक्षकवृंद व परिचारिका प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

**२. डॉ. कुसुमताई वांकर स्मृतिदिन :–** शुक्रवार दि. २७ मे २०२२, रोजी डॉ. कुसुमताई वांकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त कुसुमताईच्या प्रतिमेचे पूजन आणि हारार्पण करण्यात आले.

**३. स्वातंत्र्यदिन :–** मातृ सेवा संघ, सीताबर्डी, नागपूर येथे दि. १५ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ८ वाजता ध्वजारोहण करून 'स्वातंत्र्यदिन' साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष मा. श्री. संदेश सिंगलकर यांच्या शुभहस्ते झेंडावंदन करण्यात आले.

**४. कै. वेणुताई नेने पुण्यतिथी :** मातृसेवासंघाच्या सहसंस्थापिका कै. वेणूताई नेने यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम बुधवार दि. २५.०८.२०२२ रोजी बाह्यरुग्ण विभागात साजरा करण्यात आला. त्यांच्या प्रतिमेला माल्यार्पण तसेच दीपप्रज्वलन करण्यात आले.

मातृ सेवा संघाच्या सचिव डॉ. लता देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. वृषाली देशपांडे, सीताबर्डी सूतिकागृहाच्या वैद्यकीय अधीक्षिका डॉ. पुष्पा भावे, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. रत्ना शेखावत तसेच सूतिकागृहातील सर्व डॉक्टर्स, CGO प्रशिक्षणार्थी व सूतिकागृहातील कर्मचारी या प्रसंगी उपस्थित होते.

डॉ. वृषाली देशपांडे यांनी वेणुताई नेने यांच्या जीवनावर प्रकाश टाकत त्यांनी सूतिकागृहाच्या स्थापनेपासून त्यांनी ते उत्तमरित्या कसे सांभाळले, सूतिकांची स्वत: सेवा केली याबाबत सांगीतले. त्यांचा आदर्श डोळयासमोर ठेवून आपल्याला त्यांचे कार्य पुढे सांभाळायचे आहे असे त्यांनी प्रशिक्षणार्थी परिचारिकांना उद्देशून सांगितले.

श्रीमती कांचन बांते यांनी आभार प्रदर्शन केले.






**५. गणतंत्र दिवस :** मातृसेवासंघ, सीताबर्डी, नागपूर येथे दि.२६ जानेवारी २०२२ रोजी सकाळी ८.०० वाजता ध्वजारोहण करून 'गणतंत्रदिन' साजरा करण्यात आला. ज्येष्ठ स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. नंदिता संन्याल यांच्या शुभहस्ते झेंडावंदन करण्यात आले.

**६. जागतिक महिला दिन :** मातृसेवासंघ सीताबर्डी नागपूर व नागपूर महिला मंच यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ८ मार्च २०२३ रोजी सकाळी ९:०० वाजता पद्मश्री कमलाताई होस्पेट व पु. वेणुताई नेने यांच्या पुतळ्याला संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अरुणा बाभुळकर, सचिव डॉ. लता देशमुख, डॉ. दमयंती पांढरीपांडे, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. रत्ना शेखावत यांच्या हस्ते हारार्पण करून महिला दिन साजरा करण्यात आला.

मातृसेवा मासिकाच्या संपादिका श्रीमती शीला राव, श्रीमती विशाखा बागडे, श्रीमती किशोरी वाळुंजकर, श्रीमती कल्पना तिवारी, श्रीमती विशाखा बागडे, श्रीमती कल्याणी बुटी, श्रीमती कल्पना तिवारी, मातृ सेवा संघाच्या प्रकल्प/प्रवृत्तीचे प्रमुख कार्यक्रमाला उपस्थित होते.

त्यानंतर नर्सिंगच्या विद्यार्थीनींची रॅली काढून झांशी राणी चौकात जाऊन राणी लक्ष्मीबाई यांच्या पुतळ्याला नवीन पिढीची प्रतिनिधी म्हणून एका विद्यार्थीनीच्या हस्ते पुजन व हारार्पण करण्यात आले. यावेळी महिला दिनानिमित्त घोषणा देण्यात आल्या व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.








## पूर्ण झालेल्या योजना

१. १ जुलै २०२२ पासून दुपारची बाह्य रुग्ण सेवा सुरू करण्यात आली.
२. २५ एप्रिल २०२२ रोजी FCRA ची नोंदणी करण्यात आली. FCRA ची मुदत २०२२ ते २०२७ पर्यंत आहे.
३. निर्माण फर्टिलिटी केन्द्रा करिता ART level 1 Clinic करिता नोंदणीसाठी १० ऑगस्ट २०२२ रोजी अर्ज करण्यात आला.
४. पंचवटी वृद्धाश्रम येथे २८ जानेवारी २०२३ रोजी नवीन गडर लाईन टाकण्यात आली.

५. २९ जुलै २०२२ रोजी ३० KV चे सौर उर्जा प्रकल्प देणगी दाखल प्राप्त करून सोलर पॅनल बसविण्यात आले.

## आगामी योजना

(१) जुन्या झालेल्या इमारतींचे नूतनीकरण करणे. (२) मातृ सेवा संघ सीताबर्डी सूतिकागृहाच्या परिसरात नवीन गडर लाईन व सांडपाणी प्रक्रिया यंत्र बसविणे (ETP and STP) (३) पंचवटी वृद्धाश्रम येथे ५ नवीन कुटी (कॉटेजेस) बनविणे.

**दुखवटा :** मातृ सेवा संघाशी जिव्हाळ्याचे, सलोख्याचे संबंध असलेल्या व्यक्तिंच्या निधनाने संस्थेला कधीही भरून न निघणारी हानी होत असते. संस्था त्यांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या आप्त स्वकीयांचे पत्र पाठवून सांत्वन करीत असते.

**श्रद्धांजली :**

| | | |
|---|---|---|
| १. श्री. मनोहर म्हैसाळकर | २. श्रीमती रूपा रॉय | ३. श्रीमती लिली मेनॅचेरी |
| ४. श्री. प्रेम ढवळे | ५. श्रीमती कलावतीबाई नेवारे | ६. श्री. हेमराज बघेल |
| ७. डॉ. देवीसिंह शेखावत | ८. सौ. लता आमडेकर | ९. श्री. अनिल दाणी |
| १०. श्रीमती सुनिता उत्तमानी | ११. डॉ. माधवी चोरघडे | १२. श्रीमती पद्माताई वटे |
| १३. श्री. रवींद्र गंधे | १४. सौ. सरला विकामशी | १५. श्री. भालचंद्र गोडबोले |
| १६. श्री. मिठ्ठूराम रोहणबाग | १७. श्रीमती सुधा रंगनाथ | १८. श्री. दिवाकर मोहनी |
| १९. श्री. हरिहर रुईकर | २०. श्रीमती चंद्रकला जिवणे | २१. श्री. पुरुषोत्तम तल्हार |
| २२. श्रीमती पूजा बसंतराव लांजेवार | २३. श्रीमती सुहासिनी निमदेवकर | |
| २४. डॉ. लक्ष्मीकांत तुळणकर | | |

## आभार प्रदर्शन

केन्द्र, १२ शाखा, १३ प्रकल्प व प्रवृत्तींचा एकत्रित अहवाल येथे सादर केला आहे. त्या सर्वांच्या यशाच्या वाटचालींमध्ये डॉक्टर्स, परिचारिका, सर्व स्तरावरील कर्मचारी व त्यांचा लाभ घेणारे अगणित लाभार्थी, तसेच दानशूर दाते, विद्यमान कार्यकारिणी, विद्याविभूषीत सल्लागार, व्यवस्थापन समिती, हितचिंतक, अंकेक्षक, इंजिनिअर्स, समाज सेवक - सेविका, पत्रकार, वृत्तपत्र, केन्द्र व राज्य शासन, समाजकल्याण विभाग, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, आरोग्य विभाग, नागपूर महानगरपालिका, महाराष्ट्र परिचर्या परिषद, भारतीय परिचर्या परिषद, अनुदानासाठी सतत प्रयत्नशील हितचिंतक व आमसभेचे सदस्य, संस्थेचे अंकेक्षक - सी. आर. सगदेव अॅन्ड कंपनी, संस्थेच्या बँक - स्टेट बँक ऑफ इंडिया, रामदासपेठ, नागपूर, बँक ऑफ बडोदा, सीताबर्डी, नागपूर, बँक ऑफ महाराष्ट्र, सीताबर्डी, नागपूर, आय.डी.बी.आय.बँक सीताबर्डी, नागपूर यांची संस्था आभारी आहे. अनावधानाने कुणाचा उल्लेख राहून गेल्यास उदार अंत:करणाने माफ करावे ही विनंती.

सर्वांच्या सहकार्याबद्दल आभार मानून २०२२-२०२३ या वर्षाचा अहवाल संपवीत आहे.

दिनांक :

**डॉ. लता देशमुख**

**सचिव, मातृसेवासंघ, सीताबर्डी, नागपूर**

# मातृसेवासंघ विविध शाखा

## मातृसेवासंघ, शाखा महाल, नागपूर

**स्थापना दि. ०१ ऑगस्ट १९२७**

**वार्षिक अहवाल सन २०२२–२०२३**

पूजनीय पद्मश्री कमलाताई होस्पेट यांच्या स्मृतीस अभिवादन करून सन २०२२–२३ चा वार्षिक अहवाल आपणासमोर सादर करीत आहे.

महाल शाखेने आपल्या सेवा कार्याची ९५ वर्षे पूर्ण करून ९६ व्या वर्षात पदार्पण केले आहे. शाखेचे प्रमुख कार्य प्रसूती व कुटुंब कल्याण कार्याचे असून या कार्याच्या अनुषंगाने इतर प्रवृत्तींचा तपशील थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे.

**प्रवृत्ती क्रमांक १:– प्रसूती विभाग**

अहवालसाली एकूण दाखल केलेल्या स्त्रिया २३१७ असून प्रसूती रोगाकरिता ११०१२४१ स्त्रिया व प्रसूती सोडून इतर रोगाकरिता १०७६ स्त्रिया दाखल झाल्या. एकूण प्रसूती ११६१ झाली असून त्यात स्वाभाविक प्रसूती २९६ व अस्वाभाविक प्रसूती ८६५ झाली आहे व इतर रोगाकरीता २३४ स्त्रियांची तपासणी करण्यात आली.

**प्रवृत्ती क्रमांक २:– बाह्यरुग्ण विभाग**

प्रसूतिपूर्व प्रथम तपासणीसाठी २४२३ स्त्रियांची नोंदणी झाली असून पुन्हा तपासणीसाठी ४२३५ स्त्रियाची नोंदणी करण्यात आली व १५८४ स्त्रियांची प्रसवोत्तर तपासणी करण्यात आली.

**प्रवृत्ती क्रमांक ३:– बालचिकित्सा विभाग**

या विभागात लसीकरण व बालकांच्या स्वास्थ्याबाबत मार्गदर्शन केले जाते. अहवाल साली १३६७ बालकांनी या विभागाचा फायदा घेतला. डॉ. कमलेश भोयर, डॉ. राहुल जुमळे आणि डॉ. प्रज्वल बांगडे हे बालरोगतज्ञ या विभागात काम करीत आहे.

**प्रवृत्ती क्रमांक ४ :– अपूर्णकाल अर्भक कक्ष**

हा कक्ष सर्व आधुनिक सोयींनी सुसज्ज कक्ष असून डॉ. बी.पी.खोब्रागडे, डॉ. प्रज्वल बांगडे, डॉ. कमलेश भोयर व डॉ. राहुल जुमळे हे सांभाळतात. २०२२–२३ साली ४८८ बालकांनी या विभागात उपचार घेतला, त्यापैकी ०८ बालकांना क्रिटीकल उपचारासाठी दुसऱ्या रुग्णालयात पाठविण्यात आले. ८९ बालकांना L.R. & OT मधून दुसऱ्या दवाखान्यात पाठविण्यात आले. या विभागाात खालील प्रमाणे लसीकरण झाले. PCV - 190, Swine flu below 3 yrs- 94, varicella-51, Quadravac-47, Typhoid-239, Hexa painless-13, Swine flu above 3 yrs-06, Hepatitis A-93, Typhoid Conjucated-28, MMR-68.

**प्रवृत्ती क्रमांक ५:– शस्त्रक्रिया विभाग**

स्त्रियांच्या अनेक प्रकारच्या रोगांकरिता आवश्यक अशा शस्त्रक्रिया करण्यासाठी

अद्ययावत व अत्याधुनिक उपकरणांनी युक्त अशी दोन शस्त्रक्रियागृहे सूतिकागृहात आहेत. अहवालसाली एकूण ११२५ शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यात सिझेरीयन ८६५, स्टरलायझेशन १३० व १३९ इतर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. शाखेत स्त्रियांच्या अनेक प्रकारच्या रोगाकरिता आवश्यक अशा सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अतिशय कौशल्याने यशस्वीरीत्या पार पाडतात. ही संस्थेकरिता अभिमानाची बाब आहे. चीफ मेडीकल ऑफीसर डॉ. छाया चौरासीया, वैद्यकीय अधीक्षिका डॉ. भाग्यश्री गंधे, डॉ.तबस्सुम वली, डॉ. वंदना मेढेकर, डॉ. प्रीती बागडे, डॉ. स्वाती चरडे, डॉ. अमृता फडके, डॉ. प्रियंका बाहेती यांनी इतर डॉक्टर्सच्या मदतीने सर्व शस्त्रक्रिया पार पाडल्या.

## प्रवृत्ती क्रमांक ६:- पॅथालॉजी विभाग

अहवालसाली ६४५९ स्त्री रुग्णांनी तपासणी केली व विभागाचा लाभ घेतला. शाखेत पॅथालॉजी विभागातून संपूर्ण आवश्यक तपासणी केली जाते. या विभागाचे प्रमुख डॉ. प्रेरणा मुरारका, सौ. प्रीती अजनीकर व सौ. झेबा हमीद ह्या लॅबटेक्निशीयन आहेत. तसेच पेशंटकरीता ‘कोवीड रॅपिड अ‍ॅन्टीजेन टेस्ट’ ची सुविधा उपलब्ध आहे.

## प्रवृत्ती क्रमांक ७:- (RANM) सुधारित सहायिका परिचारिका प्रसविका केंद्र

राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांनी राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत एप्रिल - २०१८ पासून स्वयंसेवी संस्थाचे (NGO) सहायक अनुदान बंद केले आहे व महाराष्ट्र परिचर्या परिषद मुंबई यांनी १५-१५ विद्यार्थिनींच्या दोन युनिटला मंजुरी दिलेली आहे. जुलै २०२२ मध्ये झालेल्या महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफनर्सिंग पॅरामेडिकल एज्युकेशन. परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला. एकंदरीत १२ प्रशिक्षार्थिंनी परीक्षा दिली. त्यात विशेष प्राविण्यासह (Distriction) ०२ विद्यार्थिनी १० प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या त्यात कु. प्रियंका किनकर व कु. चंचल चारुड यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

प्राचार्या क्लेरा पटला, कु. धनश्री येवले व श्री. हुसेन नर्सिंग सेंटरच्या विद्यार्थिनींना शिकवण्याचे काम करीत आहेत.

## प्रवृत्ती क्रमांक ८:- लसीकरण

अहवालसाली या विभागात १३० स्त्री-कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया झाल्या असून ४२ स्त्रियांनी तांबी बसवून घेतली. लसीकरणांतर्गत पेन्टावॅकचा ७०३, गोवर १७६, बूस्टर २९८, AMC TT 870, Hepatitis B - 1004, Rota-678, IPV-398, BCG-1177, Polio-2178, DPT-146, TT (10 Yrs)-91 बाळांना याचा लाभ देण्यात आला. विशेष लसीकरणाची सोय संस्थेकडून सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

## प्रवृत्ती क्रमांक ९:- गर्भपात केंद्र

अहवालसाली १४० स्त्रियांनी गर्भपात करवून घेतला. MTP-30 & Oral Pills-42, D & E-68 लागले.

## प्रवृत्ती क्रमांक १०:- सोनोग्राफी विभाग

अहवालसाली ३७४८ सोनोग्राफी झाल्या. डॉ. राजेश्वर गुडधे, डॉ. शोभा लाड व उर्वी भावसार या विभागात काम करीत आहेत. इतर रोगाकरिता सोनोग्रॉफी-

२०३ व गर्भवती माता ३५४५ इतक्या सोनोग्रॉफी २०२२-२३ यावर्षी करण्यात आल्या.

## प्रवृत्ती क्रमांक ११:- दुर्बल मनस्क विभाग

कुमार प्रवीण मोहनराव देसाई हा या विभागात राहत असून श्रीमती मंजिरी जोशी या त्याचे संगोपन करतात.

## प्रवृत्ती क्रमांक १२:- निर्धन व दुर्बल घटक रुग्ण

राज्यातील धर्मादाय रुग्णालयात शासनातर्फे देण्यात आलेल्या सोयी, सवलती व रुग्णालयामार्फत आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या रुग्णासाठी राखून ठेवलेल्या खाटा, करण्यात येणारा औषधोपचार, त्यासाठी येणारा खर्च शाखेमार्फत केला जातो. २०२२-२३ ला पूर्ण सवलत दिलेले रुग्ण ८ व अर्ध सवलत दिलेले रुग्ण ११० त्या व्यतिरिक्त ओ.पी.डी, पॅथालॉजी व सोनोग्राफी यात सवलत दिली जाते.

## प्रवृत्ती क्रमांक १३:- डेगमा ग्रामीण प्रकल्प

डेगमा येथील जमीन सुरक्षित असून दर महिन्याला भेट देत असतात.

## प्रवृत्ती क्रमांक १४:- फिजीओथेरपी विभाग

दि. १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ पर्यत एकूण १३४८ रुग्णांनी या विभागाचा फायदा घेतला.

## प्रवृत्ती क्रमांक १५:- CPS DGO

अहवाल साली दि. ०१ एप्रिल २०१७ पासुन CPS DGO Course संस्थेत चालु झालेला आहे. या कोर्सकरिता ४ एमबीबीएस विद्यार्थिनींनी प्रवेश घेतला आहे. व हा कोर्स २ वर्षाचा आहे. या कोर्सचे (Unit Head) डॉ. स्वाती भावे व डॉ. कुंदा तायडे आहे.डॉ. चौरसिया व डॉ. गंधे यांच्या मार्गदर्शनाखाली कोवीड मध्ये सर्व डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांनी उत्तम कार्य केले आहे. त्यामध्ये जर एखादा पेशंट 'पॉझिटिव्ह' आला तर त्या पेशंटला काही त्रास होऊ न देता इतर कोवीड रुग्णालयात शिफ्ट करण्याचे काम असो किंवा पेशंटचे रिपोर्ट यायची असल्यास त्यांना भरती करून उपचार देणे व योग्य व्यवस्था करणे, पेशंटला योग्य समुपदेशन करण्याचे काम उत्तम रीत्या करण्यात आले.

## प्रवृत्ती क्रमांक १६:- बाल शल्यक्रिया विभाग

वयोगट १ ते १७ पर्यंत बाळाच्या वेगवेगळ्या प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यासाठी अद्यावत व अत्याधुनिक उपकरणांनी युक्त असे शस्त्रक्रियागृह सूतिकागृहात आहेत. या अहवाल साली एकूण २५ शस्त्रक्रिया  करण्यात आल्या. शाखेत बाळांच्या अनेक प्रकारच्या शस्त्रक्रिया अतिशय कौशल्याने डॉ. राजेंद्र सावजी व इतर डॉक्टर्सच्या मदतीने यशस्वीरित्या पार पाडतात. ही संस्थेकरिता अभिमानाची बाब आहे.

## प्रवृत्ती क्रमांक १७:- ENDOCRINOLOGY Department

अहवालसाली ८७८ पेशंटने तपासणी केली व या विभागाचा लाभ घेतला असून शाखेत Thyroid, BP and Sugar या संपूर्ण आवश्यक तपासणी केल्या जातात. या विभागाच्या प्रमुख डॉ. अस्मिता गोळे आहेत.

**प्रवृत्ती क्रमांक १८:– सुजोक थेरपी विभाग**

अहवालसाली ७३ पेशंटने तपासणी केली व या विभागाचा लाभ घेतला.

**प्रवृत्ती क्रमांक १९:– नॅचरोपॅथी विभाग**

अहवालसाली १५८ पेशंटने तपासणी केली व या विभागाचा लाभ घेतला. या विभागाच्या प्रमुख सौ. गिता बांधेकर आहे.

**श्रीमती वैदेही भाटे, मातृसेवासंघ, महाल शाखा**

---

# सौ. जानकीबाई वाठोडकर सूतिकागृह मातृसेवा संघ भंडारा

**स्थापना – १९३८**

सौ. जानकीबाई वाठोडकर सूतिकागृहाचा सन २०२२–२०२३ चा वार्षिक अहवाल आपणा समोर सादर करीत आहे.

दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा संस्थेत पोलिओ लसीकरणाचा तसेच बि.सी.जी. ची लस देण्याचा कार्यकम जनरल हॉस्पीटलच्या सहयोगाने पार पडला.

तसेच राष्ट्रीय सण १५ ऑगष्ट आणि २६ जाने. ला संस्थेच्या प्रांगणात झेंडावंदनाचा कार्यक्रम कार्यक्रम कार्यकारिणी सदस्या व सभासद भगिनींच्या उपस्थितीत पार पडला. २६ जानेवारी रोजी संस्थेच्या सभासद भगिनींकरिता संक्रांती निमित्य हळदीकुंकवाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी भगिनींना हळदीकुंकू, तिळगुळ, नास्ता व वाण देण्यात आले.

संस्थेतर्फे ६ वैद्यकीय तपासणी शिबीरे वेगवेगळ्या ग्राम पंचायतीतील आरोग्य केंद्रावर घेण्यात आली. या सर्व शिबीराला उत्तम प्रतिसाद मिळाला शिबीराला डॉ. स्नेहा तुरस्कर, डॉ. माधुरी बोधनकर, डॉ तृप्ती मोगरे यांनी आपली नि:शुल्क सेवा दिली.

महिला दिना निमित्त ११ मार्च रोजी संस्थेच्या दवाखान्यात महिलांची सर्वांगीण तपासणी घेण्यात आली, त्यात महिलांचे बीपी, शुगर, रक्त तपासणी केली व महिलांना बी पी व शुगर, निघाले त्यांना योग्य व तज्ञ डॉक्टरांकडे जावून औषधोपचार घेण्याचे मार्गदर्शन करण्यात आले. या शिबीरा करिता डॉ. नितीन तुरस्कर, डॉ. माधुरी बोधनकर व डॉ. तृप्ती मोगरे यांनी सेवा दिली. डॉ. नितीन तुरस्करांनी महिलांना कॅन्सरवर मार्गदर्शन केले. तसेच उपचारासाठी सुद्धा मार्गदर्शन केले. तसच सर्वसाधारण आजारावर होमेओपॅथीची औषधे नि:शुल्क देण्यात आली. चैत्र पौर्णिमेनिमीत्त देवीला अभिषेक करण्यात आला.

संस्थेत कै. पद्मश्री कमलाताई होस्पेट यांच्या जयंती व पुण्यतिथी निमीत्त कार्यक्रम घेण्यात आले. तसेच लालबहादूर शास्त्री व महात्मा गांधी जयंतीचा कार्यक्रम लहान मुलांची आरोग्य तपासणी करून घेण्यात आली.

बालक दिनानिमीत्त दंत आरोग्याचे महत्त्व तसेच दंत सुरक्षा समजावून सांगण्यात

आली, मुलांना बिस्कीटे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम संताजी वाडीतील आंगणवाडी मध्ये घेण्यात आला.

या वर्षी कार्यकारिणीच्या १२ सभा घेण्यात आल्या. त्या सभांना सर्व कार्यकारिणी सदस्या उपस्थित होत्या. सामाजिक व धार्मिक वार्षिक उत्सव संस्थेमध्ये उत्साहाने साजरे केले जातात. संस्था उत्तम चालविण्या करिता कार्यकारिणी सदस्या व सभासद भगिनी नेहमीच तत्पर असतात. तसेच सर्वांचे सहकार्य व मार्गदर्शन आम्हाला वेळोवेळी मिळत असते.

नागपूर सीताबर्डी मातृ सेवा संघ शाखेच्या कार्यकारिणीचे सहकार्य व मार्गदर्शन आम्हाला नेहमीच मिळत असते. तसाच पाठींबा व सहकार्य आम्हाला सदैव मिळत राहील असा पूर्ण विश्वास आहे. धन्यवाद.

**सौ. लतिका मोहोकर–अध्यक्ष, मातृसेवा संघ, भंडारा**

---

# मातृसेवासंघ, शाखा वर्धा

**स्थापना – १९२७**

**कार्यकारी मंडळ :**

| | |
|---|---|
| सौ. पुष्पमाला देशमुख – अध्यक्षा | सौ. सुप्रिया कावळे – को.ऑप.सदस्या |
| सौ. वनितताई देशपांडे – सचिव | सौ. शुभांगी सोनटक्के – को.ऑप.सदस्या |
| श्रीमती जयश्रीताई सराफ – कोषाध्यक्षा | **सल्लागार मंडळ –** |
| सौ. रेखाताई देशपांडे – सहसचिव | डॉ. निखिल तांभेकर |
| श्रीमती सुचित्रा कुर्वे – सदस्या | श्री. महावीर पाटणी |
| सौ. संगीता देशपांडे – को.ऑ.सदस्या | **हितचिंतक –** |
| सौ. संध्याताई पुरेकर – सदस्या | डॉ. रा.शा. बैंदूर, प्रा. अरविंद देशपांडे |
| डॉ. ऋता देशमुख खापर्डे | श्री. भूपेन्द्र शहाणे |

पद्मश्री कमलाताई होस्पेट यांनी जे अद्वितीय शिल्प साकारले, त्याचीच एक शाखा म्हणजेच मातृसेवा संघ वर्धा होय. ही एक सेवाभावी संस्था असून संस्थेच्या अनेकविध प्रवृत्तोव्दारे केवळ, वर्धा वासियांकरिताच नव्हे तर परिसरातील जनतेच्या सोईकरिता अव्याहत कार्यरत आहे. वर्धा वासीयांच्या उत्स्फूर्त प्रेमाने सहकार्याने व संस्थेप्रति असणा–या जिव्हाळ्याने संस्थेनी ८२ वर्षे पूर्ण केलेली आहेत. म्हणुनच कठीण परिस्थितीतही, वर्धावासियांच्या हृदयात एक अढळ स्थान मिळविण्यात संस्था यशस्वी झालेली असून दिवसगणिक मिळणा–या यशस्वीतेचे सर्व श्रेय जनतेच्या प्रतिसादाला व कार्यकर्त्यांच्या सक्रीय मदतीला द्यावे लागेल.

समाजातील सर्व प्रमुख घटक स्त्रिया, बालक, अपंग, वृद्ध व रुग्ण यांची विविध माध्यमातुन जन सेवा करीत असताना आपल्या कार्याची व्याप्तीही दरवर्षी बरीच वाढत आहे व सुव्यस्थित आहे.

संस्थेनी आपला सेवाभाव कायम ठेवला असुन सन २०२२-२३ मधील कार्यप्रवृत्ती व प्रगतीचा अहवाल सादर करतांना संस्थेच्या संचालक मंडळास आनंद होत आहे.

**आरोग्य शिबीर :-**

दि. २३/०४/२०२२ रोजी वैद्यकीय जनजागृती मंचच्या वतीने घेण्यात आले. वृद्धांना त्याच्या आजारानुसार औषधी टॉनिक च्या बाटल्या, सुका मेवा, साबण, तेल आणि फळाचे वाटप करण्यात आले. या शिबीरात डोळे तपासणी, ब्लड प्रेशर, डायबेटीज रक्त तपासणी आदि चाचण्या घेण्यात आल्या. डॉ. मोना सुने नेत्ररोग तज्ञ, डॉ. हिवंज, डॉ. सायरे, डॉ. लोभेश बोंडे यांचा सहभाग लाभला.

दि. २०/०५/२०२२ ला समता फाऊंडेशन मुंबई यांचे मार्फत नेत्र रोग तपासणी मोफत करण्यात आली यात ४५ पेशंटची तपासणी करण्यात आली, मोती बिंदु चे ३ पेशंट चे ऑपरेशन करण्यात आले २५ पेशंटला चष्मे वाटप करण्यात आले डॉ.मोना सुने यांनी मोतीबिंदूचे ३ ऑपरेशन मोफत केले.

**नाक कान घसा शिबीर :-**

दि. ५ मे २०२२ रोजी आचार्य विनोबा भावे ग्रामीण रूग्णालय सावंगी मेघे व महात्मा गांधी आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय ह्यांच्या सहकार्याने मातोश्री वृद्धाश्रम येथील रूग्णाची तपासणी डॉ. प्रसाद देशमुख डॉ. अर्जुन मानेकर, डॉ. जसलीन, डॉ. गौरव भावे, डॉ. लोखंड, मिसेस किरण कावळे, श्री. संजय कराळे या चमूने केली. नाक, कान, घसा तज्ञानी हे शिबीर घेतले.

दि.२९/०९/२०२२ रोजी सेवा पंधरवाडा अंतर्गत आरोग्य जिल्हा परिषद विभागाच्या सहकार्याने मातोश्री वृध्दाश्रमात आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते या शिबिराला १०० रूग्णांनी आरोग्य सेवेचा लाभ घेतला.

सदर शिबिरात कुष्ठरोग जनरल आरोग्य तपासणी, धुंकी तपासणी, उच्च रक्तदाब, मधुमेह, थॉयराईड व इतर आरोग्या संबंधीत चाचण्या करण्यात आल्या तसेच तसेच औषधोपचार मातृसेवा संघातर्फे मोफत करण्यात आला.

हे शिबीर माननीय जिल्हा आरोग्य अधिकारी श्री. राज पराडकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. शिबीराला त्यांची उपस्थिती होती त्यामुळे शिवीर व्यवस्थित पार पडले.

**थोरामोठ्यांच्या भेटी :-**

दि.५ मे २०२२ रोजी आचार्य विनोबा भावे ग्रामिण रुग्णालय सावंगी मेघे व महात्मा गांधी विद्यालय व रुग्णालय यांच्या सहकार्याने मातोश्री वृद्धाश्रम येथील वृद्धांची तपासणी करण्यात आली. डॉ. प्रसाद देशमुख, डॉ. अर्जुन मानीकर, डॉ. लोखंडे, किरण कांबळे, श्री. संजय मराठे या चमूने केली.

सर्व ज्येष्ठ नागरिकांच्या तपासणी मध्ये एक समाधान मिळाले येथील वातावरण प्रसन्न आहे.

**नगराध्यक्ष अतुलजी तराळे :–**

माझ्या वडिलांच्या वाढदिवसा प्रित्यर्थ येथे येवून गेलो सर्व ज्येष्ठ मंडलीच्या सहवासात अत्यंत आनंद झाला मी येथील स्वागताने भारावून गेलो. येथे रहात असलेलया सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या,

आंबेडकर कर्मचारी महासंघाचा कार्यक्रम वृध्दाश्रमात घेण्यात आला या कार्यक्रमाला डॉ. अभ्युदयजी मेघे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. वृद्धाश्रमातील आनंदी वातावरण बघून मी भारावून गेलो असे ते म्हणाले.

**सचिव विधी सेवा प्राधिकरण, वर्धा :–**

दि. ०१/१०/२०२२ रोजी आज ज्येष्ठ नागरिक दिना निमित्त मातोश्री वृद्धाश्रम येथे कार्यक्रम घेण्यात आला. दुपारी ४ वा. ज्येष्ठ समाज सेवक मा.श्री. गौतम यांनी मार्गदर्शन केले व ज्येष्ठांच्या साठी सरकारने केलेल्या कायद्याची माहिती दिली विधि सेवा प्राधिकरणाचे सचिव मा. विवेक देशमुख यांनी अध्यक्ष स्थान भूषविले. ॲड. संध्याताई पुरेकर यांनी वृद्धाश्रमाची माहिती विशद केली.

डॉ. ऋता देशमुख खापर्डे यांनी त्यांच्या ध्यान केंन्द्र आराधना या ग्रुपवर शिकणाऱ्या साधकांनी मातृसेवा संघात एक लाख रूपयाची देणगी दिली संस्था त्यांची आभारी आहे.

**वसतीगृह :–**

शैक्षणिक व नोकरीविषयक दृष्टीने विचार करून मुलींकरीता व कर्मचारी महिलांकरिता दोन वसतीगृहे चालविण्यात येतात. एका वसतिगृहात विद्यार्थीनींना तर दुसऱ्या वसतिगृहात नोकरी करणाऱ्या महिला राहतात. जिल्ह्यातील एकमेव सुरक्षित व प्रसिध्दिस आलेलया वसतीगृहाला आता पर्यंत उत्तम प्रतिसाद मिळाला होता. परंतु वर्धेतील सर्व कॉलेजेसनी होस्टेल सुविधा उपलब्ध करून दिल्याने विद्यार्थीनीना तेथेच राहावे लागते. तरीही विद्यार्थीनींची संख्या चांगली आहे. एक महिना आधी खोली भाडे तसेच प्रवेश फी व विकास निधी अशी सुटसुटीत व्यवस्था केल्याने बऱ्याच मुलींनी वसतीगृहात प्रवेश घेतला आहे. याला सरकार तर्फे कोणतेही अनुदान नाही. यावर्षी वसतीगृहात ३० मुली आहेत. यावर्षी जास्त मुली वसतीगृहात दाखल व्हाव्या असा प्रयत्न केला जात आहे. यावर्षी वर्धा शाखेला आंध्र प्रदेश, पंजाब, कश्मिर येथुन ही मुली वास्तव्याला येतात. वसतिगृहाला सौर उर्जेवर चालणारे वॉटर हिटरची देणगी मा. मालिनी प्रसाद यांनी दिली आहे संस्था त्यांची ऋणी आहे.

मागील दोन वर्षात कारोना असल्यामुळे ८/१० च मुली होस्टेलच्या रहिवासी होत्या परंतु आता या वर्षी होस्टेलच्या मुलीची संख्या वाढते आहे. महिला कर्मचारी होस्टेल ला २० मुली असून कॉलेज च्या होस्टेल ला १० मुली आहेत.

**मातृसेवा संघाचा बाह्यरुग्ण विभाग:–**

मातृसेवा संघ, वर्षा शाखेने बाह्यरुग्ण विभाग सुरू केला आहे. डॉ. अभिलाषा वर्धने हा विभाग बधताच ५/०७/२०२२ पासून डॉ. वर्धने हा विभाग सांभाळीत आहे त्यांना मुंबईला जावे लागल्यामुळे त्यांच्या जागी डॉ. रागिणी वाघमारे यांची नियुक्ती केली आहे. मातृसेवा संघ मोफत तपासणी करीत असून मोफत औषधोपचार सुध्दा करीत आहे. त्यामुळे

हा विभाग चांगला चालतो आहे या डॉ. वृद्धाश्रमातील वृद्धांना ही आठवड्यातुन दोन दा तपासतात त्यामुळे वृद्धांना ही फार समाधान वाटते. दिनांक ५,७ जुलै ते ३० मार्च पर्यंत १९२ रुग्ण तपासल्या गेले व वृद्धाश्रमातील ३५ वृद्धांची ही तपासणी आठवड्यातून दोनदा करण्यात आली.

**मेस विभाग :–**

मेस विभाग वसतीगृहातील विद्यार्थीनीसाठी हा विभाग कार्यरत असतो. मुलींच्या भोजनाची वेळ सकाळी ७.३० ते १२.०० पर्यंत व संध्याकाळी ६.०० ते ८.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली आहे. भोजन व्यवस्था संस्थेतच असल्यामुळे मुली व पालकांना समाधान वाटते कौटुंबिक वातावरण असल्याने अन्य वसतीगृहापेक्षा मातृसेवा संघाच्या वसतीगृहाकडे पाल्यांचा व पालकांचा ओढा वास्तविकच अधिक प्रमाणात असतो. यावर्षी वसतीगृहात जेवणाचे रूपये २०००/– व खोली भाडे रूपये १०००/– आकारण्यात आले आहे.

विद्यार्थिनी नसल्यामुळे मेस बंद आहे पाक शाळा व भोजनालयाचे नूतनीकरण करणणे गरजेचे आहे. कर्मचारी वसतीगृहातील १ खोली भाडे २०००/– व भोजनाचे २०००/– आकारण्यात येतात.

**खादी विभाग :–**

श्री लक्ष्मी नारायण देवस्थानाला १०० वर्ष पूर्ण झालेत म्हणून श्री. शताब्दी महोत्सवात निमित्त श्री. शेखरजी बजाज यांनी रूपये ५,००,०००/– (अक्षरी रूपये पाच लाख) देणगी मातृसेवा संघ वर्धेला दिली होती, यातून १ लाख ५५ हजारांचे चरखे मातृसेवा संघाला मिळाले आहेत. आम्ही प्रशिक्षण केंद्र सुरू केले, प्रशिक्षणार्थी स्त्रिया या केंद्रातून प्रशिक्षण घेतात. आपल्या मातृसेवा संघाव्दारे खादीचे उत्तम कापड, चादरी व रंगीत खादी तयार केली जाते. दहा चरखे श्री बजाज यांनी आम्हाला दानात दिले आहे.

**मातोश्री वृद्धाश्रम :–**

आम्हाला शासनाकडून अनुदान ४ लाख २६ हजार रूपये सरकार कडून अनुदान मिळाले आहे. अडचणीवर मात करून समस्याग्रस्त वृद्धांना दिलासा देण्याचे कार्य संस्था सातत्याने करीत आहे. सध्या वृद्धाश्रमात ३६ वृद्ध निवासाला आहेत. वृद्धांच्या मदतीकरिता मातृसेवा संघ परिवरातील अनेक व्यक्ती सर्वतोपरी आपल्या परीने सहाय्य करीत आहे. वृद्धाश्रमाच्या भाजीची गरज भागावी म्हणून तरतुद केली आहे. शासनाकडून संस्थेला मिळालेला हा उपक्रम हितचिंतक, देणगीदार यांच्या सहकार्यामुळे सुचारु रूपात चालु आहे. वृद्धाश्रमाला यावर्षी ग्रॅन्ट मिळाली आहे.

दि. ३१/०८/२०२१ ला जन्माष्टमीच्या दिवशी सायंकाळच्या प्रार्थनेची व ध्यानाची सुरुवात डॉ. ऋता देशमुख खापर्डे यांच्या हस्ते करण्यात आली.

**वृद्धांची आरोग्य तपासणी :–**

सेवाग्राम मेडिकल कॉलजचे सिनियर डॉक्टर व त्यांची चमू मोफत तपासणी महिन्यातून दोनदा करून जातात. आजारी पेशंटला त्यांच्या संस्थेत घेऊन जाऊन औषधोपचार करतात, त्यांची जेवणाची खाण्याची राहण्याची व्यवस्था सेवाग्राम मेडिकल कॉलेज तर्फे

केल्या जाते. यावर्षी वृद्धाश्रमाला ग्रॅन्ट मिळाल्यामुळे आम्ही वृद्धाश्रमात दवाखाना व लायब्ररी हे दोन विभाग उघडले आहेत.

**श्रीगणेशचतुर्थी :–**

विघ्नहर्ता श्री गणेशाची स्थापना मातृसेवासंघात करण्यात आली. रामायण पाठ पर्वकाळात आयोजित केल्या गेला होता.

**सांस्कृतिक कला मंच :–**

कोरोनामुळे कोणतेच कार्यक्रम घेता आले नाही.

**पूज्यनिय कमलाताई होस्पेट पुण्यतिथी :–**

या दिवशी फोटोला हार अर्पण करून सर्वातर्फे चंदन करण्यात येते तसेच दर मंगळवारी मातृदेवतेची आरती होते.

**स्वातंत्र दिन :–**

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून सौ. साधना उमाळकर आल्या होत्या त्यांनी अतिशय सुरेख शब्दात १५ ऑगस्टचे महत्त्व विषद केले.

**गणराज्य दिन २६ जानेवारी :–**

प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण सोहळा श्री. जयश्रीताई सराफ यांचे हस्ते संपन्न झाला. त्यांचे मार्गदर्शनपर भाषण झाले.

**गोडावून :–**

मेसर्स वंदना टाईल्स यांना रूपये २०००/– प्रतिमाह या प्रमाणे गोडावूनचा एक भाग किरायाने दिलेला असून उर्वरित भाग संस्थेच्या वापराकरिता रिकामा करण्यात आला होता.

**रंजन सभागृह :–**

आम्ही हे नवकार एजन्सीला भाड्याने दिले आहे.

**संस्थेचा वाढदिवस :–**

वसंत पंचमीच्या दिवशी संस्थेचा वाढदिवस साजरा करण्यात येतो. याचेही मातृ देवतेला अभिषेक, पुजा, आरती व प्रसाद वितरण करण्यात येतो. यावेळी संस्थेत सर्व कार्यकारी सदस्य व कर्मचारी उपस्थित होते.

**गोकूळ अष्टमी :–**

गोकुळअष्टमीचे दिवशी तीर्थप्रसाद भजन व काल्याचे आयोजन करण्यात आले तसेच वृक्षारोपण कार्यक्रम ही घेण्यात आला.

**कार्यालय विभाग :–**

कार्यकारिणीच्या सहकार्याने व अध्यक्षांच्या अथक परिश्रमाचे प्रतिवर्षी आर्थिक प्रयत्नाला यश मिळाले व देणगीच्या आधारे सर्व प्रवृत्ती सुलभरित्या सुरू राहील्या. कार्यकारी सदस्या आणि सल्लागार सदस्य यांची आवश्यकता त्यावेही संस्थेला मदत होते. वर्धेतील केंद्राध्यक्षा, देणगीदार, विशेषतः मातोश्री वृध्दाश्रमाला सर्वतोपरी मदत करणारे हितचिंतक देणगीदार, वर्गणीदार, स्थानिक मान्यवर यांचेही सहकार्या बद्दल संस्था आभारी. मान्यवरांच्या भेटी १ ऑक्टोबर २०१८ रोजी संस्थेला जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वर्धा प्रथम सत्र

न्यायाधिश श्री. पाटकर साहेब वर्धा, श्री. परमार साहेब, न्यायाधिश – वर्धा यांनी वृद्धांना कायदे विषयी मार्गदर्शन केले, दि. ०८/११/२०१२ रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नगर संघ चालक मा. डॉ. प्रसादजी देशमुख यांनी भेट दिली. संस्थेत आमच्या अन्य भगिनी, शाखा भगीनी व अनेक थोरामोठ्यांना भेटीचा योग येतो. यावेळी त्यांचे आशिर्वाद व शुभेच्छा पाठीशी असतात.

**सौ. पुष्पमाला देशमुख, अध्यक्षा, मातृसेवा संघ, वर्धा**

---

## मातृसेवासंघ, शाखा आर्वी

**स्थापना – १९३८**

मातृसेवा व समाजातील दुर्बल घटकांची सेवा हेच ज्याचे अखंड व्रत होते त्या मातृ सेवा संघाच्या आद्य संस्थापिका के पद्मश्री कमलाताई होस्पेट यांनी आर्वीकरांना प्रेरणा दिली व कै. श्रीकृष्णदासजी जाजू आणि इतर प्रतिष्ठित मंडळी व डॉक्टर्स यांच्या सहकार्याने आर्वी येथे सन १९३८ साली मातृसेवासंघ या गौरवशाली संस्थेची स्थापना झाली.

आर्वी शाखेच्या दोन इमारती आहे. शाखेमध्ये सूतिकांची संख्या नसल्यामुळे संस्थेच्या ध्येयाशी निगडीत असलेले कार्यक्रम संस्थेत राबविले जातात. आर्वी शाखेने जोडलेले हितचिंतक व मार्गदर्शक यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १ जुलै २०१३ रोजी मातृसेवासंघ शाखा आर्वी तर्फे एक बालमंदिर सुरू करण्यात आले व त्याला चांगलाच प्रतिसाद मिळाला आहे. शाखेची सदस्य स्नेहल देशमुख ही आठवड्यातून दोन दिवस शाळेत मुलांना संस्कृत श्लोक शिकवायला जाते.

सन २०२२–२०२३ या आर्थिक वर्षात शाखेच्या एकंदर १० सभा घेण्यात आल्या.

२१ जूनचा 'योगदिवस' तपस्या इंग्लीश स्कूलबरोबर साजरा करण्यात आला.

दि. १ ते ७ सप्टेंबर 'आहार पोषण सप्ताहा'निमित्त एक दिवस ३० कुपोषित बालकांना पौष्टीक आहाराच्या किट्स वाटण्यात आल्या.

शाखेने स्वतःच्या निधीतून व देणगीदारांनी दिलेल्या देणगी मधून जुनी मोडकळीस आलेली इमारत पाडून त्या ठिकाणी एक हॉल व दोन खोल्या बांधल्या. दि.१३ नोव्हेंबर २०२३ रोजी श्री. दादारावजी केचे, आमदार, आर्वी विधानसभा क्षेत्र, यांच्या व शाखेच्या ज्येष्ठ सदस्या ज्योतीताई अभ्यंकर यांचे हस्ते या नवीन बांधकामाचे उद्घाटन झाले. त्यावेळेस शाखेला ज्यांनी देणग्या दिल्या त्यांचे व शाखेत वेळोवेळी शिबिरे घेतली जातात त्यावेळी ज्या डॉक्टरांचे सहकार्य लाभते त्या सर्वांचा स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

१५ नोव्हेंबरला पद्मश्री कै. कमलाबाई होस्पेट यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

बालकदिनाचे औचित्य साधुन २६ नोव्हेंबरला आर्वी येथील ६ अंगणवाडीत वय वर्ष ३ ते ४ या वयोगटातील बालकांची निःशुल्क आरोग्य तपासणी करण्यात आली. या साठी उपजिल्हा रुग्णालयाचे बालरोग तज्ञ डॉ. कोल्हे व डॉ. अमीत यांचे सहकार्य लाभले.

आजकाल लहान मुले सुद्धा मोबाईलचा खूप वापर करतात. तसेच ३ ते ५

वयोगटातील मुले तर मोबाईल सुरू केल्याशिवाय जेवत नाहीत आणि त्यामुळे यांच्यामध्ये लहानपणापासुनच डोळ्यांच्या समस्या सुरू होतात. ही बाब लक्षात घेऊन अंगणवाडीतील एकंदर ६० बालकांची डोळ्यांची सुद्धा तपासणी निःशुल्क करण्यात आली. या साठी नेत्ररोग तज्ञ डॉ. शैलेश गायकवाड यांचे सहकार्य लाभले. या ६० बालकांपैकी १५ मुलांमध्ये मायोपिया निघाला, डॉक्टरांनी त्यांना निःशुल्क आय ड्रॉप्स दिले.

२७ नोव्हेंबरला अंगणवाडीतील मुलांच्या आईचे सुद्धा निःशुल्क आरोग्य तपासणी शिबिर घेतले. त्यात स्त्रियांच्या पॅथोलॉजिकल टेस्ट्स करण्यात आल्या, यासाठी पॅथॉलॉजिस्ट डॉ. जया मोटवानी व टिम यांचे सहकार्य लाभले. गरजुंना निःशुल्क टॅब्लेट्स देण्यात आल्या, सर्व डॉक्टरांना आभारपत्रे व स्मृतीचिन्हे देवुन सन्मानित करण्यात आले.

१ फेब्रुवारी पासून डॉ. संगीता पवार बीएएमएस, यांनी मातृ-सेवा-संघामध्ये ओपीडी सुरू केली आहे. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आर्वी शाखेने १ मार्च २०२३ रोजी कॅन्सर जनजागृती कार्यक्रमांतर्गत Cervix आणि Breast कॅन्सर या विषयावर शिबिराचे आयोजन केले होते. कार्यक्रमासाठी तारा फाऊंडेशन फॉर वुमन, अकोला, या संस्थेच्या संस्थापिका/अध्यक्ष डॉ. वंदना बागडी, डॉ. विनिता जयवार, डॉ. सुरेखा नथानी व डॉ. सुनीता निवाने या आलेल्या होत्या. त्यांनी पीपीटीद्वारे दोन्ही कॅन्सरवर सविस्तर माहिती स्त्रियांना दिली. तसेच ब्रेस्ट कॅन्सरशी साठी सेल्फ एक्झामिनिशन कसे करायचे याचे प्रात्याक्षिक सुद्धा दिले. २०० महिलांनी शिबिराचा लाभ घेतला. स्मृतिचिन्हे व सन्मानपत्र देऊन डॉक्टरांना सन्मानित करण्यात आले.

१० मार्च २०२३ रोजी श्री. अशोकजी राठी M.D. Explosive Comany Private Limited (CEDET) तळेगांव, यांचेकडून शाखेला रुग्ण साहित्य देणगी रूपाने मिळाले. त्यात एअर बेड्स, एडजेस्टेबल बेड्स, वॉकर्स, व्हीलचेअर्स इ. साहित्यांचा समावेश आहे. शाखेने मेडीकल इक्व्पीमेंट लायब्ररी सुद्धा सुरू केली आहे. याद्वारे गरजूंना अतिशय नाममात्र दरात वरील वस्तू किरायाने दिल्या जातात.

शासनाचे एक पल्स पोलिओ सेंटर मातृ-सेवा-संघामध्ये सुरू आहे.

**आगामी योजना :-**

गर्भवती महिलांचे लसीकरण केंद्र (शासनाच्या मदतीने) सुरू करणे.

कौटुंबिक सल्ला केंद्र सुरू करणे.

शाखेमध्ये स्वातंत्र्य दिन, गणराज्य दिन, गांधी जयंती, बालकदिन साजरे केले जातात. दि. ३० जानेवारी महात्मागांधी पुण्यतिथी, २३ ऑक्टोबरला श्रीकृष्णदासजी जाजु यांची पुण्यतिथी व तसेच १५ नोव्हेंबरला कै. पद्मश्री कमलाताई होस्पेट यांची पुण्यतिथी साजरी केली.

**कार्यकारी मंडळ –**

| | | | |
|---|---|---|---|
| संघ अध्यक्षा | : डॉ. अरुणा बाभुळकर | संघसचिव | : डॉ. लता देशमुख |
| शाखाअध्यक्षा | : ॲड. सौ. अरुणा देशपांडे | उपाध्यक्षा | : सौ. ज्योती देशमुख |
| खजिनदार | : सौ. माया देशपांडे | सचिव | : सौ. ज्योती भट |
| सहसचिव | : सौ. शिवानी देशपांडे | | |

**सदस्या :** सौ. शैला देशपांडे, सौ. मीना जाजु, सौ. कविता जोशी, सौ. मंजिरी करमरकर, सौ. छाया बाजपेयी, सौ. योगिता पांडे, सौ. देवयानी देशपांडे.

**सल्लागार मंडळ :** ॲड. विनोद देशपांडे, श्री. जयंतराव देशमुख, डॉ. विनय देशपांडे. यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळते. संस्थेचा हिशेब अतिशय अचूक ठेवण्याचे व लिहिण्याचे काम संस्थेचे क्लर्क श्री. गणपतराव कालभूत करतात.

आर्वी शाखेची कार्यकारिणी, हितचिंतक, वर्गणीदार, देणगीदार, डॉक्टर्स, स्थानिक मान्यवर यांच्या सहकार्याबद्दल शाखा आभारी आहे.

ईश्वरी आशिर्वादाने तसेच कार्यकारी मंडळ, सल्लागार मंडळ व हितचिंतक या सर्वाच्या सहयोगाने शाखा उत्तरोत्तर प्रगती करेल यात शंका नाही.

**ॲड. सौ. अरुणा देशपांडे–अध्यक्षा, मातृसेवासंघ, शाखा आर्वी, जि. वर्धा.**

---

# मातृसेवासंघ, सूतिकागृह – शाखा जबलपूर

**स्थापना – १९४१**

सूतिकागृह एवं शिशुकल्याण केन्द्र, जबलपुर। यह मातृसेवासंघ नागपूर की शाखा है। इसकी स्थापना पू. कमलाताई होस्पेट के कर कमलों द्वारा दि.११.२.१९४१ को हुई। साधारणत: यह शाखा 'सूतिकागृह' जबलपुर के नाम से विगत ८१ वर्ष से प्रसिद्ध है और अपने नाम के अनुरूप मातृसेवा तथा शिशुकल्याण चिकित्सा में अनवरत कार्य कर रही है।

बच्चों एवं महिलाओं के स्वास्थ्य कल्याण का दायित्व यह संस्था निष्ठा एवं लगन से कर, राष्ट्र निर्माण में अहम् भूमिका निभा रही है। संस्था द्वारा धर्मार्थ एवं अर्धधर्मार्थ सेवाएँ गरीब प्रसूतिकाओं को दी जाती हैं जो समाजसेवा में अपनी मिसाल है।

वर्ष २०२२-२०२३ का अहवाल प्रस्तुत करते हुए कार्यकारिणी सदस्य डॉ. कु. सुलोचना सुले भूतपूर्व मुख्य चिकित्सा अधिकारी एवं डॉ. कीर्ति फडणीस, चिकित्सक वर्ग, कुशल व्यवस्थापिका एवं अन्य सम्बधित सभी समर्पित सेवा एवं निष्ठाओं को भुलाया नहीं जा सकता जिनके फलस्वरूप संस्था उत्तरोत्तर उन्नती कर रही है।

**कार्यकारी मंडल सभासद**

| | | | |
|---|---|---|---|
| १. श्रीमती सुमेधा पोळ | – अध्यक्ष | ७. श्रीमती नंदिता सरकार | – सदस्य |
| २. श्रीमती शुभांगी गुप्ता | – सचिव | ८. श्रीमती रत्ना वैद्य | – सदस्य |
| ३. श्रीमती राजश्री लोथे | –सहसचिव | ९. कु. मंजुषा देशमुख | – सदस्य |
| ४. श्रीमती राजश्री लोथे | – कोषाध्यक्ष | १०. श्रीमती मृणालिनी कुम्भोजकर | – सदस्य |
| ५. श्रीमती अलका रडके | – सदस्य | ११. श्रीमती वासंती खेरडीकर | – सदस्य |
| ६. श्रीमती आशा सोलंकी | – सदस्य | १२. श्रीमती आभा रानाडे | – सदस्य |

**अहवाल वर्ष में कार्यकारी मंडल की सभा : १२ इमारत : ०२**

**सूतिकागृह में कार्यरत कर्मचारियोंकी सूची :**

**अंतर्गत विभाग –**

व्यवस्थापिका – श्रीमती उषा अग्रवाल चिकित्सक – १२

सेविका – २२ नर्स, १६ आया, ११ जमादार, ५ कार्यालय सहायक, १ ड्राइवर, ४ चौकीदार

**सूतिका संबंधी जानकारी :**

| | | | |
|---|---|---|---|
| पलग सख्या | – ७५ | अबॉर्शन | – ३१ |
| कुल भर्ती | – २१७५ | प्रसूति उपरांत जाँच | – निरंक |
| प्रसूति के लिए भर्ती स्त्रियां | – १२३९ | डी ॲन्ड सी | – ४५ |
| प्रसूति अतिरिक्त भर्ती स्त्रियां | – ९३३ | भोजन लेने वाली स्त्रियां | – २४३ |
| कुल प्रसूति | – १२३९ | एम.टी.पी. | – ९० |
| नर्स द्वारा की गई स्वाभाविक प्रसूति | – ०४ | प्रसूति के पूर्व जाँच | – सभी |
| चिकित्सक द्वारा की गई स्वाभाविक | –३७७ | प्रसूतिपूर्व जाँच नहीं | – निरंक |
| चिकित्सक द्वारा की गई अस्वाभाविक प्रसूति | –८५८ | स्वाभाविक प्रसूति | – ३८१ |
| दुसरे हॉस्पिटल में भेजे मरीज | – ०५ | अस्वाभाविक प्रसूति | – ८५८ |
| सूतिका मृत्यु | – निरंक | पूर्णकाल प्रसूति | – १२१९ |
| बालमृत्यु | – निरंक | अपूर्णकाल प्रसूति | – २० |
| धर्मार्थ प्रसूति | – ०१ | अर्ध धर्मार्थ | – १९ |
| परिवार नियोजन की सलाह लेनेवालों की संख्या | –निरंक | जुडवा | – १४ |
| परिवार नियोजन शल्यक्रिया संख्या | – १११ | नर्सरी में दाखिल बच्चे | – ५१३ |
| लडका | – ६७२ | नर्सरी में मृत बच्चों की संख्या | – निरंक |
| लडकी | – ५८१ | **बाह्य रुग्ण विभाग :** | |
| कुल ऑपरेशन्स | – ८५८ | स्त्री रोगों के लिए जाँच | –११४९७ |
| आय.यू.डी. | – ०७ | छोटे बच्चों की जाँच | – ३७०६ |

**सांस्कृतिक कार्यक्रम** : स्वतंत्रता दिवस, गणतंत्र दिवस

**नए संकल्प, नयी योजना** : महिला आवासगृह

**प्रसूति का लाभ लेने वालों की श्रेणी :** अ. उच्च वर्ग ब. मध्यम वर्ग क. निम्न वर्ग ड. गरीबी रेखा के नीचे

**दानदाता :** श्रीमती पद्मजा सप्रे ११०००/– श्रीमती सुमेधा पोळ ५०००/–

**अहवाल में सदस्यों की संख्या :** १२

**कार्यवाह, मातृसेवासंघ, जबलपूर, म.प्र.**

---

# मातृसेवासंघ, शाखा हिंगणघाट

**स्थापना – १९४४**

**सूतिकागृहाचा वार्षिक संख्यात्मक अहवाल २०२२–२३**

| | |
|---|---|
| १. एकूण दाखल केलेल्या स्त्रिया – २१ | २. दाखल केलेल्या गर्भवती स्त्रिया–१३ |
| ३. प्रसूति सोडून इतर रोगांकरिता दाखल केलेल्या स्त्रिया – ०७ | ४. एकूण बाळंतपण – १० |
| ५. प्रसूति पूर्व तपासणीस | ६. प्रसूतिपूर्व तपासणीस न |

| | | | |
|---|---|---|---|
| आलेल्या स्त्रिया | - ०६ | आलेल्या स्त्रिया | - ०४ |
| ७. स्वाभाविक बाळंतपणे | - ०१ | ८. अस्वाभाविक : सिझेरियन | - ०९ |
| ९. पूर्ण दिवसांची बाळंतपणे | - १० | बाळंतपणे : फोरसेप डिलेवरी | -० |
| १०. अपूर्ण दिवसांची बाळंतपणे | - Nil | ११. गर्भपात | - Nil |
| १२. ब्लड ट्रान्सफ्यूजन(स्त्रियांची संख्या) | Nil | १३. दुसऱ्या दवाखान्यात पाठविलेल्या स्त्रिया | - Nil |
| १४. सूतिकामृत्यु | - Nil | | |
| १५. मुले | - ०५ | १६. मुली | - ०४ |
| १७. जुळी | - Nil | १८. बालमृत्यु पुत्र-१, कन्या | -०० |
| १९. अर्भक विभागात पाठविलेले | - Nil | २०. मृत-जन्मलेले (स्टिलबर्थ) | - Nil |
| २१. पूर्ण पैसे देणाऱ्या | - १० | २२. अर्ध धर्मार्थ | - Nil |
| २३. पूर्ण धर्मार्थ | - Nil | | |
| **बाह्यरुग्ण विभाग ओ.पी.डी.** | | | |
| १. प्रसूतिपूर्व प्रथम तपासणी | - ३४ | २. प्रसूतिपूर्व पुन्हा तपासणी | - २० |
| ३. स्त्री रोगाकरिता तपासणी -प्रथम | - ३९ | ४. प्रसूती पश्चात तपासणी - प्रथम | ०९ |
| -पुन्हा | - २८ | - पुन्हा | ०८ |
| ५. पॅप स्मिअर | - Nil | ६. कॉल्पोस्कोपी | -Nil |
| **ऑपरेशन्स** | | | |
| १. एकंदर ऑपरेशन | ०९ | २. सिझेरियन | - ०९ |
| ३. ॲबडॉमीनल शस्त्रक्रिया | ०१ | | |

**अध्यक्ष, मातृसेवासंघ सूतिकागृह, शाखा हिंगणघाट**

---

# मातृसेवासंघ, शाखा बिलासपूर (छत्तीसगड़)

**स्थापना - १९४५ बसंतपंचमी**

**स्थापना :-**

डॉ. स्व. श्री गोपालराव दीक्षित एवं स्वि. श्रीमती जानकीबाई रामचन्द्र दीक्षित द्वारा अपने एकमात्र सुपुत्र की स्मृति को चिरस्थायी बनाने के लिये पद्मश्री श्रीमती कमलाताई होस्पेट की प्रेरणा एवं सहयोग से 'अशोक प्रसूति मंदिर' की स्थापना बसंत पंचमी, ८ फरवरी १९४५ को की गई, जिसमें बिलासपुर के गणमान्य नागरिकों का सहयोग प्राप्त है।

**वर्तमान कार्यकारिणी मण्डल सभासद वर्ष २०२२-२३-**

**केन्द्राध्यक्ष :** डॉ.श्रीमती अरुणाताई बाभुळकर **केन्द्र सचिव :** डॉ. श्रीमती लता देशमुख, **शाखा अध्यक्ष :** श्रीमती मंगला बुरंगे, **पदेन सदस्य :** डॉ.श्री.व्ही.के. दीक्षित, भेषज अधीक्षक **शाखा सचिव :** डॉ श्रीमती गीता व्ही. दीक्षित **शाखा कोषाध्यक्ष :** श्रीमान् संजय दीक्षित **कार्यकारिणी सदस्य :** श्रीमती माधवी ओत्तलवार, श्रीमती विद्या गोवर्धन, डॉ. श्रीमती कावेरी दाभडकर, श्रीमती अपर्णा दाण्डेकर, श्रीमती भाग्यश्री गोवर्धन, श्रीमती दीप्ति देवरस, श्रीमती ज्योति होनप, डॉ. श्रीमती रश्मि अग्रवाल, श्रीमती सुनीता भट्ट.

**पदेन सदस्य :**श्रीमती छाया भवाळकर, व्यवस्थापिका, सुश्री सरस्वती वैष्णव, प्रमुख परिचारिका
**सलाहकार समिति :** डॉ.श्रीमान् बी.एस. पमनानी एण्ड कंपनी, सी.ए. बिलासपुर (छ.ग.)
: डॉ.श्रीमान् कि.वा. देवरस, शिशु रोग विशेषज्ञ
: श्रीमान् अनूप शर्मा, अधिवक्ता

वर्ष के दौरान कार्यकारिणी की कुल बैठकें : ०६

वर्ष के दौरान सदस्यता शुल्क देने वाले सदस्यों की कुल संख्या: ६०

**भूमि एवं भवन :-**

(१) शहर के मध्यवर्ती स्थल पर नजूल से प्राप्त १४३३५ वर्गफुट भूमि पर ८९६० वर्गफुट का पक्का दो मंजिला सर्वसुविधायुक्त भवन ।

(२) शहर से लगे हुये ग्राम कोनी में स्व.श्री लक्ष्मी नारायण जैन से दान में प्राप्त १० डिसमिल भूमि एवं ४५० वर्गफुट का पक्का मकान ।

(३) चांटापारा तिलकनगर, बिलासपुर (छ.ग.) में ३६६० वर्गफुट भूमि डॉ. स्व. श्री रामचन्द्र दीक्षित एंव श्रीमती जानकीबाई दीक्षित से दान में प्राप्त जिसे कम्पाउण्ड वॉल से सुरक्षित किया गया है।

**संस्था की प्रवृत्तियाँ :-**

(१) प्रसूति एवं शिशु संबंधी सभी प्रकार की बीमारियों का उपचार एवं सलाह।
(२) संस्था में वाचनालय।
(३) संस्था में बेबी इनटेंसिव केयर युनिट।

**प्रसूति गृह के कार्य का विवरण :-**

**चिकित्सक :** डॉ. श्रीमान् व्ही.के. दीक्षित एम.एस. (सर्जन), भेषज अधीक्षक, अशोक प्रसूति मंदिर
: डॉ. श्रीमती सुधा गिरीश पाण्डेय, स्त्री रोग विशेषज्ञ
: डॉ.श्री अशोक मेहता, शिशु रोग विशेषज्ञ

**व्यवस्थापिका** : श्रीमती छाया भवाळकर
**प्रमुख परिचारिका** : सुश्री सरस्वती वैष्णव
सेविका : ट्रेंड नर्स-०५, आया-०२, लिपिक/कम्प्यूटर ऑपरेटर-०१, भृत्य/चौकीदार-०१

**प्रसूति गृह संबंधी विवरण, वर्ष २०२२-२३ :-**

| | |
|---|---|
| बेड की संख्या : १५ | कुल भर्ती स्त्रियाँ : १४० |
| प्रसूति के लिये भर्ती स्त्रियाँ : ६४ | स्त्री रोग के लिये भर्ती स्त्रियाँ : ७६ |
| कुल प्रसूति : ६४ | प्रसूति पूर्व जाँच : ५० |
| प्रसूति एवं जाँच न होने वालों की संख्या : १४ | स्वाभाविक प्रसूति : १४ |
| अस्वाभाविक प्रसूति : ५० | पूर्णकाल प्रसूति : ६४ |
| अपूर्णकाल प्रसूति : निरंक | डी. एण्ड सी. : ०९ |
| परिचारिका द्वारा स्वाभाविक प्रसूति : निरंक | परिचारिका द्वारा अस्वाभाविक प्रसूति : निरंक |
| चिकित्सकों द्वारा स्वाभाविक प्रसूति : १४ | चिकित्सकोंद्वारा अस्वाभाविक प्रसूति : ५० |

| | |
|---|---|
| दूसरे अस्पताल में भेजे गये : निरंक | सूतिका मृत्यु : निरंक |
| पूर्ण पैसे देने वाली स्त्रियाँ : ११२ | धर्मार्थ प्रसूति (आयुष्मान) :२८ |
| अर्द्धधमार्थ प्रसूति : निरंक | नवजात शिशु–लड़के : ३२ |
| नवजात शिशु–लड़की : ३२ | नवजात शिशु–जुड़वाँ : निरंक |
| नवजात शिशु–तिड़वाँ : निरंक | कुल प्रसूति ऑपरेशन : ७८ |

**ब्राह्यरुग्ण विभाग :–**

चिकित्सक : डॉ. श्रीमान् व्ही.के. दीक्षित एम.एस. (सर्जन), भेषज अधीक्षक, अशोक प्रसूति मंदिर

| | |
|---|---|
| प्रसूति एवं जाँच : ३३ | प्रसूति एवं पुनः जाँच : ११३ |
| प्रसूति एवं कुल जाँच : १४६ | स्त्रीरोगों के लिये प्रथम जाँच : २३० |
| स्त्रीरोगों के लिये पुनः जाँच : ११५ | प्रसूति पश्चात् जाँच : ६१ |
| अन्य रोगों के लिये जाँच : १६० | |

**वाचनालय :**

(१) २ फरवरी २००३ से 'अशोक प्रसूति मंदिर' में वाचनालय प्रारंभ हुआ।

(२) वाचनालय में कुल पुस्तकों की संख्या २४१६ है, जिसमें मराठी ७९९, हिन्दी २०४, अंग्रेजी ३२२ एवं अन्य ३८, बाल सहित्य २५६ एवं अन्य ५१५ पत्रिकायें हैं।

(३) वाचनालय का संचालन संस्था के ही कर्मचारी द्वारा संपादित किया जाता है, जिन्हें अलग से कार्य के एवज में मानधन दिया जाता है।

**वर्ष २०२२–२३ में संस्था में निम्नलिखित कार्यक्रम सम्पन्न हुयेः–**

(१) सोमवार दिनांक १५ अगस्त, २०२२ को स्वतंत्रता दिवस के अवसर पर संस्था परिसर में प्रतिवर्षानुसार ध्वजारोहण सम्पन्न हुआ। संस्था के कर्मचारियों द्वारा सांस्कृतिक कार्यक्रम प्रस्तुत किया गया। स्वल्पाहार एवं चाय के पश्चात् कार्यक्रम समाप्त हुआ।

(२) विश्वकर्मा जयंती के अवसर पर पूजन शनिवार दिनांक १७.०९.२०२२ को शस्त्र पूजन कर प्रसाद वितरित किया गया।

(३) श्री गणेश चतुर्थी के दिन संस्था में श्रीमूर्ति (प्रतिकात्मक सुपारी) की स्थापना की गई। प्रतिदिन पूजा–आरती एवं प्रसाद वितरण किया गया। अनंत चतुर्दशी के दिन श्री गणेश (प्रतीक–सुपारी) विसर्जन कर एवं प्रसाद वितरण किया गया।

(४) बुधवार दिनांक ०५ अक्टूबर, २०२२ दशहरा विजयादशमी के शुभ अवसर पर शस्त्र पूजन किया गया।

(५) धनत्रयोदशी–धनवंतरी पूजन एवं दीपावती के दिन लक्ष्मी पूजन किया गया। दीपावली के दिन कर्मचारियों द्वारा सुन्दर रंगोली सजाई गई एवं रोशनी की गई।

(६) गणतंत्र दिवस गुरूवार दिनांक २६.०१.२०२३ को प्रातः ८:३० बजे मुख्य अतिथि डॉ. आर.ए. शर्मा द्वारा ध्वजारोहण किया गया। राष्ट्रध्वज को सेल्यूट के पश्चात् राष्ट्रगान हुआ। स्वल्पाहार एक तील–गुड़ वितरण के पश्चात् कार्यक्रम समाप्त हुआ।

(७) वसंत पंचमी एवं स्थापना दिवस के अवसर पर देवी सरस्वती के च्त्रि पर माल्यार्पण कर पूजन किया गया। तत्पश्चात् प्रसाद वितरण किया गया।

**वर्ष २०२२–२३ की योजनायें :–**

(१) झूलाघर/डे–केयर सेंटर पुनः प्रारंभ। (२) मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल बनाने का प्रयास।

**वर्ष २०२२–२३ में संस्था को निम्नानुसार दान प्राप्त हुआ :–**

१. श्रीमती प्रियंवदा कारखानीस १,००,०००/– रु. २. डॉ. श्रीमती गीता दीक्षित ३३,५००/– रु.

३. श्री नीरव टाह ५,१००/– रुपये ४. श्रीमती अंजली भुरंगी २,०००/– रुपये

कुल राशि १,४०,६००/– रुपये

## सूतिकागृहाचा वार्षिक संख्यात्मक अहवाल २०२२–२३

| | |
|---|---|
| १. एकूण दाखल केलेल्या स्त्रिया – १४० | २. दाखल केलेल्या गर्भवती स्त्रिया–१०९ |
| ३. प्रसूति सोडून इतर रोगांकरिता दाखल केलेल्या स्त्रिया – ३१ | ४. एकूण बाळंतपण –६४ |
| ५. प्रसूति पूर्व तपासणीस आलेल्या स्त्रिया – ५० | ६. प्रसूतिपूर्व तपासणीस न आलेल्या स्त्रिया –१४ |
| | ८. स्वाभाविक : सिझेरियन – ४८ |
| ७. स्वाभाविक बाळंतपणे – १४ | बाळंतपणे : फोरसेप डिलेवरी –०१ |
| ९. पूर्ण दिवसांची बाळंतपणे – ६४ | वेक्यूम – ०१ |
| १०. अपूर्ण दिवसांची बाळंतपणे – Nil | ११. गर्भपात - Nil |
| १२. ब्लड ट्रान्सफ्यूजन(स्त्रियांची संख्या) –०५ | १३. दुसऱ्या दवाखान्यात पाठविलेल्या स्त्रिया – Nil |
| १४. सूतिकामृत्यू - Nil | |
| १५. मुले – ३२ | १६. मुली – ३२ |
| १७. जुळी - Nil | १८. बालमृत्यु - Nil |
| १९. अर्भक विभागात पाठविलेले - ११ | २०. मृत–जन्मलेले (स्टिलबर्थ) – Nil |
| २१. पूर्ण पैसे देणाऱ्या – ४० | २२. अर्ध धर्मार्थ – Nil |
| २३. पूर्ण धर्मार्थ – Nil | |
| **बाह्यरुग्ण विभाग ओ.पी.डी.** | |
| १. प्रसूतिपूर्व प्रथम तपासणी – ३३ | २. प्रसूतिपूर्व पुन्हा तपासणी – ११३ |
| ३. स्त्री रोगाकरिता तपासणी –प्रथम २३० –पुन्हा ११५ | ४. प्रसूती पश्चात तपासणी – प्रथम ६१ – पुन्हा ४५ |
| ५. पॅप स्मिअर - Nil | ६. कॉल्पोस्कोपी –Nil |
| **बालचिकित्सा विभाग** | |
| १. हिपेटाइटिस बी : पुरुष–२६ : स्त्रिया–२६ | २. बीसीजी : पुरुष–२६ : स्त्रिया–२८ |
| ओपीव्ही : I, II, III, IV – २८ – ३० | |
| **एकंदर ऑपरेशन्स** – ७८, सिझेरियन – ४८ | |

कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया (ट्युबेक्टोमी) – ०२, इव्हॅक्युशन : ०३, इतर – १२

अपूर्णकाल/पूर्णकाल अर्भक विभाग (पी.बी.यु./एन.आय.सी.यु.) –

एकूण दाखल केलेले ११ एकूण मृत्यू – Nil

**सचिव, अशोक प्रसूति मंदिर, मातृसेवा संघ, बिलासपुर (छ.ग.)**

# मातृसेवासंघ, शाखा वरोरा

**स्थापना – १९४६**

कै. वंदनीय कमलाताईंना वंदन करून वरोरा मातृसेवासंघा अहवाल २०२२–२३ चा आपणा सर्वांसमोर सादर करीत आहोत.

सर्वप्रथम आजच्या आमसभेसाठी सर्व मातृसेवासंघ, शाखा परिवारातील पदाधिकारी व सदस्य अतिथी गणांचे मन:पूर्वक स्वागत.

कै. वं. कमलाताईंनी गरीब, परित्यक्त्या महिलांसाठी ज्या दिव्यदृष्टिने हे सूतिकासेवेचे कार्य १०० वर्षांपूर्वी सुरू केले त्या कार्याच्या प्रेरणेनेच आपण इथपर्यंत आलो. परंतु यापुढे सूतिकासेवेच्या कार्यातून विविध आरोग्य सेवेची आयामे अमलात आणू पुढे सातत्य ठेवणे हे आमचे कर्तव्य आहे.

वरोरा मातृसेवासंघ शाखा याआधच्या कार्यकारिणीने ज्या पद्धतीने काम केले त्याला धक्का लागू न देता पुढे काम करावे हे आमचे पहिले ध्येय आहे.

वरोरा शाखेचे १९४५ साली सुरू झालेले १ सूतिकागृह जे ग्रामीण रुग्णालयाच्या बाजूला आहे ती एक इमारत जी आता नूतनीकरणाच्या अवस्थेत आहे.

वरोरा तहसिल कार्यालयासमोर कै. नारायण श्रीहरी देशपांडे यांनी आपल्या मातोश्री कै. लक्ष्मीबाई श्रीहरी  देशपांडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मातृसेवासंघाला दान केली आहे ती जागा अशा २ जागा मातृसेवासंघाची आहे.

दुसरी इमारत – सरस्वती शिशू मंदिर चालू आहे. त्याचा किराया मातृसेवासंघ वरोरा शाखेकडे नित्य नेमाने जमा होतो.

**शाखेतील कार्यक्रम :** १५ ऑगस्ट, २६ जानेवारी

कै. कमलाताई होस्पेट यांच्या पुण्यतिथी निमित्त आनंदवन वरोरा येथील मूक बधिर मुलांना फळ वाटप केले जाते.

श्रीकृष्ण जन्माष्टमी कार्यक्रम, मकरसंक्रांतीचे हळदीकुंकू कार्यक्रम घेतले जातात.

यावर्षी एक आरोग्य सेवेचा उपक्रम सुरू केला. वरोरा येथील लक्ष्मीनगर मधील सावित्रीबाई फुले वसतिगृहात मातृसेवासंघ कार्याची ओळख करून दिली व त्यांच्यासाठी कार्यक्रम चालविण्याची परवानगी मिळविली.

१. हिमोग्लोबिन तपासणी २. मुलींचे मासिक पाळी तक्रारी व उपाय ३. विवाहबंधन – एक आवश्यक संस्कार माहिती ४. विवाहबंधन – कुटुंब व स्त्रीची जबाबदारी ५. वैवाहिक जीवन – समस्या व उपाय.

या सर्व विषयांचे चर्चासत्र व त्यासाठी डॉक्टर संपर्क ही आखणी करण्यात आली. नवीन सदस्यांना त्यांच्या कार्याची ओळख करून दिली. यापुढील कार्यासाठी आपल्या शुभेच्छा स्वीकारते व मनोगत इथेच थांबविते.

**सौ. सुवर्णरेखा पाटील, मातृसेवासंघ, वरोरा शाखा**

---

# मातृसेवासंघ, शाखा ब्रम्हपुरी

**स्थापना – १९४५**

वंदनीय पद्मश्री कै. कमलाताई होस्पेट यांच्या स्मृतीस अभिवादन करून सन २०२२–२०२३ चा शाखेचा ७७ वा अहवाल सादर करीत आहे. मातृसेवासंघ सूतिकागृह ही एक नामवंत सेवाभावी संस्था म्हणून ओळखली जाते.

ब्रम्हपुरी येथील जुने मालगुजार कै. श्री. तात्यासाहेब काळीकर यांनी दान दिलेल्या विस्तीर्ण जागेवर सन १९६३ साली संस्थेने आपली इमारत बांधली. येथील बऱ्याच नामवंत डॉक्टरांनी सूतिकागृहामध्ये आपली सेवा दिली.

**प्रसूति विषयक अहवाल –** शाखेमध्ये स्वाभाविक प्रसूति, अस्वाभाविक प्रसूति तसेच प्रसूतिविषयक व इतर शस्त्रक्रिया होतात. या वर्षात एकूण २१ प्रसूति झाल्या, त्यात स्वाभाविक ९ व अस्वाभाविक १२ आहेत. शस्त्रक्रियेसाठी भूलतज्ञ डॉ. लोकरे यांची सेवा शाखेत मिळते. शाखा त्यांची आभारी आहे.

**उत्पन्नाची साधने –** सूतिकागृहापासून मिळणारे उत्पन्न हे शाखेचे प्रमुख उत्पन्नाचे साधन आहे. याव्यतिरिक्त शाखेच्या मालकीची किरायाने दिलेली तीन दुकाने व तीन क्वार्टर्स पासूनही संस्थेला उत्पन्न मिळते. शाखेच्या सदस्यांकडून मिळणारी वर्गणी हे सुद्धा एक उत्पन्नाचे साधन आहे.

**व्यवस्थापक मंडळ –** सन २०२१–२०२२ या वर्षात पुढील व्यवस्थापक मंडळ आहे.

| | |
|---|---|
| श्रीमती कमल वैद्य – अध्यक्ष | श्रीमती शालिनी पांडे – उपाध्यक्षा |
| श्रीमती विद्या बरडे – सचिव | श्रीमती जयश्री लांबे – सहसचिव |
| श्रीमती निर्मला अग्रवाल – सदस्य | श्रीमती मीनाक्षी सिद्धम् – सदस्य |
| श्रीमती भाग्यश्री देशकर – सदस्य | श्रीमती अनघा गौरशेट्टीवार – सदस्य |
| श्रीमती मंजूषा कांडूपवार – सदस्य | श्रीमती वृशाली करंबेळकर – सदस्य |

**शाखेचा आय–व्यय –** शाखेचे २०२२–२०२३ या आर्थिक वर्षात एकूण उत्पन्न रु. २०,१७,८६७.०० असुन खर्च ९,३१,३९४.०० रुपये आहे.

**सल्लागार मंडळ –** शाखेचा व्याप सांभाळताना अनेक समस्या उपस्थित होतात. त्या निवारण करण्याकरिता व शाखेचे कामकाज व्यवस्थित सुरू राहण्यासाठी मार्गदर्शनाची आवश्यकता असते. म्हणून एक सल्लागार मंडळ आहे. यात ॲड. वसंतराव भुसारी, डॉ. श्रीकांत नागमोती, श्री. उमेश सिद्धम्, श्री. विनोद बरडे, श्री. अतुल गौरशेट्टीवार, श्री. संतोष वैद्य, ॲड. जयप्रकाश अंडेलकर यांचा समावेश आहे. शाखा त्यांची मनापासून आभारी आहे.

**कर्मचारी –** श्री. रामचंद्र चोले हे एकच अस्थाई कर्मचारी कार्यरत आहेत.

**उत्सव व सण –** गणराज्यदिन व स्वातंत्र्यदिन हे दोन्ही राष्ट्रीय सण संस्थेचे कार्यकारी सदस्यांनी उत्साहात साजरे केले. तसेच मकर संक्रांतीला हळदीकुंकू कार्यक्रम घेण्यात आला.

**वार्षिक वर्गणीदार –** शाखेचे हितचिंतक असे पंच्याहत्तर वर्गणीदार आहेत.

**सभा –** सन २०२२-२०२३ या वर्षात एकूण पाच सभा घेण्यात आल्या. तसेच वार्षिक आमसभाही घेण्यात आली.

**नवीन योजना –** संस्थेच्या गाळ्यांचे बांधकाम पूर्ण झाले. सूतिकागृहाच्या समोरच्या भागात गट्टू बसविण्यात आले. मातृसेवासंघ - भगिनी मंडळ यांच्यामध्ये वॉल कंपाउंड करण्याचे ठरले आहे. संस्थेच्या मोकळ्या जागेत बगीचा करण्याच्या दृष्टीने विचार विनिमय सुरू आहे.

**आभार –** शाखेच्या प्रगतीसाठी व्यवस्थापक मंडळाचे सर्व सदस्य, शाखेचे डॉक्टर तसेच शाखेचे कर्मचारी यांचे महत्त्वाचे योगदान आहे. त्याबद्दल त्यांचे आभार. सर्वांच्या सहकार्यामुळे शाखा प्रगतिपथावर आहे याची आम्हाला जाणीव आहे.

**कार्यवाह – सौ. विद्या बरडे, मातृसेवा संघ शाखा ब्रह्मपुरी**

---

# मातृसेवासंघ, शाखा अकोला

**स्थापना – १९५७**

मातृ सेवा संघ, शाखा अकोला यावर्षी आपला ६७ वर्षांचा प्रवास पूर्ण करून ६८ व्या वर्षात पदार्पण करती झाली आहे. मातृसेवासंघाची इमारत ही शहराच्या मध्यभागी तसेच अतिशय चांगल्या आणि सुरक्षित ठिकाणी आहे. ह्या ठिकाणाहून रेल्वे स्टेशन, बस स्टॅण्ड जवळ असल्यामुळे बाहेर गावच्या मुलींना ये-जा करणे सोपे होते. तसेच ज्या उद्देशाने म्हणजेच शिक्षणासाठी त्या अकोल्यात येतात, ती महाविद्यालय त्यांना जवळ पडत असल्याने, सोयीचे होते आणि म्हणूनच हे वसतिगृह शिकणाऱ्या मुली आणि नोकरदार स्त्रियांसाठी सुद्धा पसंतीचे आहे. तसेच मातृसेवाच्या आद्य संस्थापिका स्वर्गीय जानकी काकू चौधरी यांनी गरजू आणि खेड्यातील मुलींसाठी मुख्यतः हे वसतिगृह सुरू केले होते; त्याच तत्वावर हे आजही सुरू आहे.

मुलींसाठी सोलर वॉटर हीटर, वॉटर प्युरिफायर, वेंडिंग मशीन, वॉटर कुलर या सर्वच सोयी पुरवल्या जातात. अशाप्रकारे या मुलींना घरगुती व जिव्हाळ्याचं वातावरण मिळावं यासाठी संस्थाध्यक्षा सौ. आशाताई तारे, कार्यकारिणी सदस्य आणि संस्थेच्या दोन्ही वॉर्डन-प्रगती भालेराव तसेच नव्याने रुजू झालेल्या सुमंगल मावशी उटगीकर ह्या सुद्धा तत्परतेने कार्यरत असतात.

मुलींमधील सलोख्याचे वातावरण वाढावे, तसेच त्यांच्यात मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित व्हावेत म्हणून दरवर्षी दहा दिवसांच्या गणपती उत्सवाचे आयोजन करण्यात येते. बाप्पाची मूर्ती आणण्यापासून ते रोजची आरती, प्रसाद, विविध स्पर्धांचे आयोजन मुली स्वतः करतात, आणि अनंत चतुर्दशीला सहभोजनाचा आनंद घेतात. संस्थेतर्फे मुलींना मिठाई देण्यात येते.

मातृसेवाचा दुसरा महत्त्वाचा उपक्रम म्हणजे गर्भसंस्कार केंद्र, कोरोना काळात बंद झालेले हे गर्भसंस्कार केंद्र ५ जून रोजी पुन्हा सुरू करण्यात आले होते. पण कोरोना काळात ऑनलाईन ची सवय लागलेल्या मुलींच्या अभावामुळे हे केंद्र पुन्हा उभारी धरू शकले नाही.

२७ जानेवारी रोजी संक्रातीनिमित्त तिळगुळ समारंभाचे आयोजन करण्यात आले. ह्या निमित्ताने पाककला स्पर्धा घेण्यात आली. सन २०२३ हे वर्ष जागतिक तृणधान्य वर्ष म्हणून जाहीर करण्यात आले. त्यामुळे पाककलेची संकल्पना ही तृणधान्यावर आधारित होगी, तीळ आणि बाजरीचे गोड व खारे पदार्थ स्पर्धेसाठी ठेवण्यात आले होते. स्पर्धेला माता-भगिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आजमितीला कॅन्सर सारख्या दुर्धर आजाराने बऱ्याच जणांचा बळी घेतला आहे. याविषयी जनजागृती करण्यासाठी कैंसर सप्ताहा निमित्त ४ फेब्रुवारी रोजी मातृसेवासंघाच्या सभागृहात व्याख्यान आयोजित करण्यात आले. इनरव्हील आणि मातृसेवासंघाच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम घेण्यात आला. डॉक्टर मंत्री आणि डॉ. रूपाली राठी यांचे मार्गदर्शन या संदर्भात मिळाले. वसतिगृहाच्या मुलींना सुद्धा या व्याख्यानाचा लाभ घेता आला.

त्याचप्रमाणे संस्थेमध्ये दरवर्षी संस्थेच्या आद्यसंस्थापिका पद्मश्री कमलाताई होस्पेट, कै. वेणूताई नेने तसेच अकोला शाखेच्या संस्थापिका कै. जानकी काकू चौधरी यांची जयंती व पुण्यतीथीही साजरी केली जाते. तसेच स्वातंत्र्य दिन व गणराज्य दिन ही मातृसेवा संघात साजरा केला जातो. या सर्वांसाठी मोलाचे सहकार्य लाभते ते निवासी वॉर्डन उटगिकर मावशी तसेच प्रगती भालेराव यांचे. संस्थेचा हिशोब अतिशय चोख ठेवण्याचे तसेच लिहिण्याचे काम श्री हेमंत सांगाणी करतात. तसेच चार्टर्ड अकाउंटंट श्री अनिल पिंपरखेडे सर हे ताळेबंद अतिशय काटेकोरपणे सादर करीत असल्याने मातृसेवा संघाचा संपूर्ण व्यवहार अतिशय पारदर्शक आणि चोख असणे, ही आमच्यासाठी अतिशय आनंदाची बाब आहे.

संस्थेतील सर्व सहकारी कर्मचारी अतिशय प्रामाणिकपणे आणि जिव्हाळ्याने सर्व कामे करतात तसेच संस्थेच्या नावलौकिकात भर घालण्यात मदत करीत असतात.

संस्थाध्यक्ष सौ. आशाताई तारे यांच्या मार्गदर्शनात संस्थेच्या सचिव म्हणून मी सौ. आकांक्षा देशमुख, सहसचिव सौ अमरजा ढुमे, कोषाध्यक्ष सौ प्रतिभा दामले, सौ वंदना नानोटी, सौ. अंजली कवीश्वर, सौ निलिमा पाटील, सौ. नीलाताई जोशी तसेच संस्थेच्या माजी अध्यक्ष सौ देवयानी ताई चौधरी, सौ पद्माताई मांडवगणे, सौ. विनया वकील या सर्वांच्या प्रेमळ सहकार्यामुळे मातृसेवा संघाचे कार्य सुचारू पद्धतीने सुरू आहे.

**कार्यकारिणी -:**

| नांव | पद | नांव | पद |
|---|---|---|---|
| सौ. आशा तारे | अध्यक्षा | सौ. आकांक्षा देशमुख | सचिव |
| सौ. अमरजा दुमे | सहसचिव | सौ. प्रतिभा दामले | कोषाध्यक्ष |
| सौ. वंदना नानोटी | सदस्या | सौ. अंजली कवीश्वर | सदस्या |
| सौ. देवयानी चौधरी | सदस्या | सौ. नीला जोशी | सदस्या |
| सौ. नीलिमा पाटील | सदस्या | सौ. पद्मा मांडवगणे | सदस्या |
| सौ. विनया वकील | सदस्या | | |

**सल्लागार मंडळ -:** डॉ. नानासाहेब चौधरी — श्री. अरुणजी दामले

डॉ. सौ. अलका तामणे — ॲड. सौ. सुहासीनी उंटवाले

**सौ. आकांक्षा देशमुख - सचिव, मातृसेवा संघ, अकोला**

---

# मातृसेवासंघ, शाखा अमरावती

---

# मातृसेवासंघ, शाखा चांदूररेल्वे

---

# प्रवृत्ती व प्रकल्प

## मातृसेवासंघ, सीताबर्डी सूतिकागृह धर्मदाय रुग्णालय, सीताबर्डी

**स्थापना – १९२१**

आदरणीय पद्मश्री कमलाताई होस्पेट व कै. वेणुताई नेने यांनी ८ मे १९२१ साली अक्षयतृतीयेला सीताबर्डी सूतिकागृहाचे बीजारोपण केले. या बीजाचे रूपांतर १९५६ साली मातृसेवासंघ रूपी वटवृक्षात झाले व सीताबर्डी सूतिकागृह केंद्र शाखा म्हणून अस्तित्वात आली.

सीताबर्डी सूतिकागृहाला यावर्षी ५/५/२२, अक्षयतृतीयेला १०१ वर्षे पूर्ण झाली ही अभिमानाची बाब आहे. पद्मश्री कमलाताई होस्पेट व कै. वेणुताई नेने यांनी ज्या उद्देशाने सूतिकागृहाची स्थापना केली तेच उद्दिष्ट समोर ठेवून माता-बाल-संगोपनाचे कार्य १०० वर्षापासून अविरत सुरू आहे. हे नि:स्वार्थ कार्य प्रसूती पुरतेच मर्यादित न राहता प्रसूतीपूर्व, प्रसूती पश्चात, स्त्रीरोग चिकित्सा या सगळ्या सेवा महिलांना देण्यात येतात. बाळाला, जन्माला आल्यापासून लागणाऱ्या सर्व आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. त्याशिवाय लसीकरण, उपचार, अतिदक्षता विभागाची सेवा इत्यादी सेवा पुरविण्यात येतात. सीताबर्डी सूतिकागृह १०० वर्षांपासून आजतायागत विना अनुदान तत्त्वावर नि:स्वार्थ भावाने समाजातील महिला व बालकांना अविरत नि:स्वार्थ सेवा देत आहे.

धर्मदाय सहआयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांच्या सूचनेनुसार ऑगस्ट २००६ पासून दुर्बल घटक (अर्ध धर्माथ) व निर्धन घटक (पूर्ण धर्माथ) यांच्यासाठी योजना राबविण्यात येत आहे. अहवाल साली ९५ दुर्बल घटकातील रुग्णांना लाभ देण्यात आला. २०१८ पासून मा. धर्मदाय आयुक्तांच्या सूचनेप्रमाणे सिताबर्डी सूतिकागृहाचे नाव मातृ सेवा संघ सीताबर्डी सूतिकागृह (धर्मदाय रूग्णालय) असे करण्यात आले.

सीताबर्डी सूतिकागृहाची नोंदणी आरोग्य विभाग, नागपूर महानगरपालिका, नागपूर येथे ११/२/१९९१ ला झाली असून ३१/३/२०२४ पर्यंत नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. नोंदणी क्रमांक १८५ आहे.

कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया व गर्भपाता करिता रूग्णालयाला शासनमान्य गर्भपात केंद्र म्हणून मान्यता प्राप्त आहे. गर्भपात केंद्र नोंदणी क्रमांक ०४१ आहे.

**सूतिकागृहाच्या रुग्णालय समितीचे १२ सदस्य आहेत.**

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. अरुणा बाभुळकर | : अध्यक्ष |
| २. | सौ. रश्मी भावे | : उपाध्यक्ष |
| ३. | डॉ. लता देशमुख | : सचिव |

| | |
|---|---|
| ४. डॉ. वृषाली देशपांडे | : कोषाध्यक्ष |
| ५. डॉ. पुष्पा भावे | : वैद्यकीय अधीक्षिका |
| ६. डॉ. मंदाकिनी गुप्ता | : स्त्री रोग तज्ञ |
| ७. डॉ. रत्ना शेखावत | : वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी |
| ८. डॉ. सीमा पांडे | : बालरोग तज्ञ |
| ९. डॉ. वैशाली वराडकर | : वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी |
| १०. डॉ. किरण वैद्य/डॉ. स्मिता जैन | : बालरोग तज्ञ/ सोनोलॉजीस्ट |
| ११. डॉ. शैलेन्द्र मुंधडा/डॉ. अविनाश देशमुख | : चिकित्सक (पॅथॉलॉजीस्ट) |
| १२. श्रीमती शौली भद्र | : मेट्रन |

**अहवालवर्षी रुग्णालय समितीच्या ८ सभा झाल्या.**

## सूतिकागृहातील अंतर्गत विभाग

**१. प्रसूती व स्त्रीरोग चिकित्सा विभाग :–** वैद्यकीय अधीक्षिका : डॉ. पुष्पा भावे, ६ वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी, ४ निवासी वैद्यकीय अधिकारी, भूलतज्ञ तसेच परिचारिका, वार्ड कुली, इ. २४ तास सेवेत कार्यरत आहेत.

**अ) बाह्यरुग्ण विभाग :–** येथे बालक व स्त्रियांकरिता एकाच ठिकाणी खाली दर्शविलेल्या विविध सेवा उपलब्ध आहेत. बाह्यरुग्ण विभागात सूतिका व नातेवाईकांकरिता पिण्याच्या पाण्याकरिता कूलरची पण सोय आहे.

**बाह्यरुग्ण विभागात खालील सेवा उपलब्ध आहेत.**

| | |
|---|---|
| १. प्रसूतिपूर्व तपासणी | २. प्रसूतिपश्चात तपासणी |
| ३. हाय रिस्क प्रेगनेन्सी क्लिनिक (पॅप स्मीअर व कॉल्पोस्कोपी) | ४. स्तनपान सल्ला केन्द्र |
| ५. कुटुंब नियोजन क्लीनिक | ६. निर्माण फर्टीलिटी क्लिनीक |
| ७. स्त्रीरोग केंद्र | ८. मेनोपॉज क्लिनिक |
| ९. कर्करोग निदान केन्द्र | १०. किशोरवयीन मुलांचे सल्ला केन्द्र |
| ११. सोनोग्राफी, कलर डॉपलर व सोनोमॅमोग्राफी | १२. स्वस्थ शिशु चिकित्सा केन्द्र |
| १३. बालरोग निदान केन्द्र | १४. पॅथॉलॉजी (रोगनिदानशास्त्र) |
| १५. रोगप्रतिबंधक लस टोचणी कार्यक्रम | १६. शल्यक्रिया विभाग |
| १७. मेडिसीन विभाग | १८. आय.सी.टी.सी. सेंटर |
| १९. मॅमोग्राफी | २०. दंत चिकित्सा विभाग |
| (बाह्यरूग्ण विभागात इ.सी.जी., एन.एस.टी./सी.टी.जी. ची पण सोय उपलब्ध आहे.) | |
| २१. त्वचा रोग विभाग | |

**ब) आंतर रुग्ण विभाग :–** अद्यावत व अत्याधुनिक उपकरणांनी युक्त दोन शस्त्रक्रियागृह, प्रसूति कक्ष व खालील दर्शविल्याप्रमाणे ६० खाटांची सोय सूतिकागृहात उपलब्ध आहे. रिकवरी रूम – २, ईमर्जन्सी वॉर्ड – ६, एक्लेमशिया रूम – १, पी.आय.एच. रूम – १, पोस्ट ऑपरेटिव्ह वार्ड – ५, जनरल वार्ड – १४, सेमी प्रायव्हेट वार्ड – ५, आय.सी.यु. – ५, प्रायव्हेट वार्ड – २०, यातील ६ खाटा दुर्बल घटक व ६ खाटा निर्धन घटक रुग्णांसाठी राखीव आहेत. २४ तास अकस्मिक सेवा उपलब्ध आहे.

**२. बाल चिकित्सा विभाग :–** विभागात बालरोगतज्ज्ञ, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. किरण वैद्य, डॉ. सीमा पांडे व डॉ. रिषी लोडाया तसेच ऑन पॅनल डॉ. शिजु नायर, डॉ. पंकज अग्रवाल, डॉ. रिजवान खान सेवेत कार्यरत आहेत.

**अ) बाह्यरुग्ण विभाग :–** i) स्वस्थ शिशु चिकित्सा केन्द्र :- येथे ० ते ५ वर्ष वयोगटातील मुलांची नियमित तपासणी करण्यात येते. बाळाचे वाढीचे टप्पे, बाळाची वाढ (वजन) लसीकरण, इत्यादी करण्यात येते व तसेच पालकांना पोषक आहार, आरोग्य व रोग प्रतिबंधक लसीकरण या संदर्भात माहिती देण्यात येते.

ii) **बालरोग निदान केन्द्र :–** येथे ० ते १२ वर्ष वयोगटातील रुग्ण बालकांची तपासणी व उपचार करण्यात येतो. दर शनिवारी एच.आय.व्ही. बाधित मातांच्या बालकांची तपासणी व उपचार करण्यात येतो. तसेच आहाराचा पर्याय व माहिती, सल्ला पालकांना देण्यात येते.

iii) **रोग प्रतिबंधक लसीकरण :–** दर मंगळवारी व शुक्रवारी मुख्य इमारतीत सकाळी १० ते दुपारी १ पर्यंत जन्मापासून ते १८ वर्ष वयोगटातील बालकांना सर्व प्रकारच्या रोग प्रतिबंधक लस व जीवनसत्व ‘अ’ देण्यात येतात.

अहवालवर्षी बाह्यरुग्ण विभागात ८७३ बालकांची प्रथम तपासणी

iv) **विकासात्मक बालरोग विभाग :** ० ते १२ वर्षे वयोगटातील बालकांच्या विकासाबद्दल असलेल्या तक्रारीबाबत डॉ. पल्लवी बापट दर बुधवार व गुरुवार दुपारी २ ते ४ या वेळेत बाह्यरूग्ण विभागात मार्गदर्शन व सेवा देतात.

**ब) आंतर रुग्ण विभाग :** ० ते १२ वर्षे पर्यंतचे बालकांना सेवा देऊन त्यांच्यावर योग्य उपचार करण्यात येतो.

i) **एन.आय.सी.यु (नवजात शिशु विभाग)/पी.बी.यु. (अपूर्णकाल अर्भक विभाग) :** प्रसूतीनंतर गरज भासल्यास अपूर्ण दिवसाचे व इतर नवजात शिशु निरीक्षण व उपचारासाठी अद्यावत व अत्याधुनिक उपकरणांनी युक्त एन.आय.सी.यु/पी.बी.यु.ची सोय आहे.

अहवाल वर्षी एकूण २५७ ( १४ बाहेरून आलेले ) शिशुंना निरिक्षण व उपचारासाठी दाखल करण्यात आले.

**३. शिक्षण व प्रशिक्षण विभाग :– सी.जी.ओ :–** बी.ए.एम.एस. व बी.एच.एम.एस. मुलींना प्रात्यक्षिक अनुभव मिळावे याकरिता प्रसूति विभाग व बाल विभागात तीन महिन्यांचे प्रशिक्षण दिले जाते. अहवाल वर्षी ३९ मुलींनी या अभ्यासक्रमाचा लाभ घेतला.

**४. पॅथॉलॉजी विभाग :–** डॉ. अविनाश देशमुख व डॉ. शैलेन्द्र मुंधडा यांच्या सहकार्याने पॅथॉलॉजी विभाग सुरू आहे. कु. कोमल डंभारे लॅब टेक्निशियन म्हणून काम करीत आहे. मार्च २०१९ मध्ये पॅथॉलॉजी विभाग Fully Automatic Biochemisty Analyser, Cell counter ad Centrifuge उपकरणाने अद्यावत करण्यात आला. तेव्हापासून पॅथॉलॉजी विभागात डॉ. अविनाश देशमुख आपली सेवा देत आहेत. रक्ताची तपासणी, युरीन तपासणी यासह विविध तपासण्या माफक दरात करण्यात येतात.

**५. सोनोग्राफी विभाग :–** हा विभाग १९९७ साली सुरू झाला. विभागात अद्यावत सोनोग्राफी व कलर डॉपलर तोशिबा झेरीओ–१०० (TOSHIBA XARIAO-100(TUS-X 100) चे मशीन आहे. डॉ. स्मिता जैन, डॉ. रेश्मा गिरीपुंजे, डॉ. अमी रहातेकर, डॉ. आस्था खेमुका विभागात आपली सेवा देत आहेत. विभागात सोनोग्राफी व्यतिरीक्त सोनोमॅमोग्राफी, पोटाच्या विकाराकरिता, अर्भकाचे २ (D Echo), इत्यादी करण्यात येते. अहवाल वर्षी एकुण ४४०३ – मा.से.सं. ४०७६ (२८०० ऑब्स्ट्रॅटीक, ६०५ गायनीक सोनोग्राफी) व बाहेरून पाठविलेल्या ३२७ स्त्रियांची सोनोग्राफी करण्यात आली.

**६. दंत चिकित्सा विभाग :–** १ ऑगस्ट २०२२ पासून सुरू करण्यात आला. विभागात डॉ. नेहा देशपांडे, डॉ. रोहन देशपांडे, डॉ. नम्रता बजाज, डॉ. रजत बजाज सेवा देत आहेत. अहवालवर्षी २३ रुग्णांनी विभागाचा लाभ घेतला.

**७. प्रायव्हेट मल्टिस्पेशालिटी बाह्यरुग्ण विभाग :–** स्त्रियांच्या सोयीसाठी व रूग्णांना विविध उपचारांचा लाभ एका छताखाली, माफक दरात मिळावा म्हणून प्रायव्हेट मल्टीस्पेशालीटी बाहय रुग्ण विभागात दुपारी २ ते ४ या वेळात सर्व प्रकारच्या तपासणीची सोय करण्यात आली आहे. दि. १ जुलै २०२२ रोजी डॉक्टर्स डे चे औचत्य साधून ‘प्रायव्हेट मल्टीस्पेशालिटी बाह्य रुग्ण विभाग सुरू करण्यात आला. या विभागाचे उद्‌घाटन मातृ सेवा संघाच्या अध्यक्षा डॉ. अरुणा बाभुळकर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. अहवालवर्षी एकुण ४४ महिलांनी विभागाचा लाभ घेतला.

**८. कर्करोग प्रतिबंध व निदान केंद्र :–** डॉ. मेहरू कमाल या विभागात सेवा देतात. सर्व तपासण्या अल्पदरात करण्यात येतात. अहवाल वर्षी ९८ महिलांचे पॅपस्मिअर, २६ महिलांचे एल.बी.सी. व २२ महिलांची एच.पी.व्ही.डी.एन.ए. तपासणी करण्यात आली.

**९. मेडिसीन ओ.पी.डी :–** विभागात डॉ. मोहना कुलकर्णी आणि डॉ. आरती धारस्कर आपली सेवा उपलब्ध करून देतात. अहवालवर्षी २५३ रुग्णांची विभागाचा लाभ घेतला.

**बाह्यरुग्ण विभाग : (२०२२ ते २०२३)**

| | |
|---|---|
| १) प्रसूतिपूर्व नोंदणी/पुन्हा तपासणी | – ११३७/४२७९ |
| २) स्त्रीरोगाकरिता नोंदणी / पुन्हा तपासणी | – ४४६/३०७ |
| ३) प्रसूती पश्चात् नोंदणी / पुन्हा तपासणी | – ३८६/२८५ |
| ४) पॅप स्मिअर/ओपीडी + कॅम्प | – २९१ |
| ५) एल.बी.सी./एच.पी.वी. डी.एन.ए. | – २६/२२ |
| ६) संध्यादीप प्रकल्प/कॉल्पोस्कोपी/मॅमोग्राफी | – २/३१/५ |
| ७) Eloira / Cu-T / Others | – ६/२५/१ |
| ८) CTG/NST | – १३४ |
| ९) Inj. Td I/II/Booster Dose | – २८०/२९४/५४ |
| एकूण सोनोग्राफी/बाहेरुन आलेले | – ४४०३/३२७ |
| मेडिसिन ओ.पी.डी./ इ.सी.जी. | – २३२/२१ |

| | |
|---|---|
| निर्माण फर्टिलिटी नोंदणी / पुन्हा तपासणी | - ७०/३१२ |
| आय.सी.टी.सी. गर्भवती स्त्रिया/इतर/कॅम्प | - ११९४/४००८/३१७४ |
| बालचिकित्सा विभाग प्रथम/पुन्हा तपासणी | - ८७३/२४३२ |
| एकंदर ऑपरेशन | - ८२८ |
| सिझेरिअन | - ५०७ |
| कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया | - १३२ |
| ॲबडॉमीनल/लेप्रोस्कोपी ट्यूबल लायगेशन | - ११५/१७ |
| एम.टी.पी./इव्हॅक्युशन/ डी.एन्ड.सी. | - ५३/३६/३५ |
| हिस्टेरेक्टोमी/लॅप हिस्टेरेक्टोमी | - १३/४ |
| दाखल केलेल्या गर्भवती स्त्रीया | - ७३८ |
| प्रसूति पूर्व तपासणीस आलेल्या/न आलेल्या स्त्रिया | - ५०९/५९ |
| एकूण बाळंतपण (जुळी १२) | - ५६८ |
| स्वाभाविक बाळंतपणे/फोरसेफ डिलीव्हरी | - ५८/३ |
| एकूण मुले/जिवंत जन्मलेले/स्टिलबर्थ | - ३०७/३०४/३ |
| एकूण मुली/जिवंत जन्मलेले/स्टिलबर्थ | - २७३/२७१/२ |
| अर्ध धर्मार्थ /पूर्ण धर्मार्थ | - ९५/- |
| सवलतदार | - १४ |

**विशेष कार्यक्रम, परिषद, कार्यशाळा व प्रशिक्षण**

**दरवर्षी प्रमाणे अहवाल वर्षी**

**१. जागतिक ओ.आर.एस. सप्ताह :-** २५ ते ३१ जुलै ओ.आर.एस. सप्ताह साजरा करण्यात आला. ''Jodi No.1 ORS & Zink" हे जागतिक ओ.आर.एस. सप्ताह चे घोषवाक्य होते. २९ जुलै २०२२ रोजी मातृ सेवा संघ आणि इंडियन ॲकेडमी ऑफ पिडीयाटीक्स, नागपूर च्या सौजन्याने नर्सिंगच्या प्रशिक्षणार्थीसाठी भींतीचित्र, घोषवाक्ये व रांगोळी स्पर्धा सूतिकागृहाच्या प्रतिक्षालयात आयोजित करण्यात आली होती. रुग्णांना व नर्सिंगच्या प्रशिक्षणार्थींना ओ.आर.एस. आणि झिंक चे महत्त्व विषयी माहीती देण्यात आली.

**२. जागतिक स्तनपान सप्ताह :-** दिनांक १ ते ७ ऑगस्ट 'जागतिक स्तनपान सप्ताह' साजरा करण्यात आला. "Step up for Breastfeeding Educate and Support" हे जागतिक स्तनपान सप्ताह चे घोषवाक्य होते.

दिनांक २ ऑगस्ट २०२२ रोजी 'स्तनपानाचे फायदे आणि त्याचे महत्व' या विषयावर सूतिकागृहाच्या प्रतिक्षालयात प्रशिक्षणार्थी परिचारीकांना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रशिक्षणार्थी परिचारीकांसाठी रांगोळी स्पर्धा, घोषवाक्य आणि भिंतीचित्रे प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धाचे बक्षिसही देण्यात आले.

दिनांक ३/८/२०२२ रोजी "Inner Wheel Club, Nagpur Orange City" यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्तनपानाचे महत्व' या विषयावर बाहयरूग्ण विभागात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. सरीता जैस्वाल ह्यांनी गर्भवती महिला,

स्तनदा माता, त्यांचे नातेवाईक व परिचारीका प्रशिक्षणार्थींना 'स्तनपानाचे महत्व' या विषयावर मार्गदर्शन केले.

**३. जागतिक एडस् सप्ताह :–** दि. १ ते ७ डिसेंबर २०२२ जागतिक एडस् सप्ताह साजरा करण्यात आला. 'समानता' हे जागतिक एडस् सप्ताह चे घोषवाक्य होते. (Equalize "To Keep everyone safe, to protect everyone's health, we need to Equalize"). District AIDS Prevention Control Unit (DAPCU) यांच्या तर्फे मेयो रूग्णालय ते दोसर भवन पर्यंत एडस् जनजागृती रॅली काढण्यात आली. नर्सिंगच्या प्रशिक्षणार्थींनी रॅली मध्ये भाग घेतला.

**४. सी.एम.ई. व कार्यशाळा :–** सीताबर्डी सूतिकागृहातील वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. वैशाली वराडकर, डॉ. कामिनी नाकाडे, डॉ. उज्वला झामड, डॉ. शोआ खान, डॉ. अमी रहातेकर, डॉ. सरिता जैस्वाल, डॉ. रिषी लोडाया यांनी नागपूर व नागपूर बाहेरील विविध सी.एम.ई. मध्ये सहभाग घेतला.

**५. प्रसूती पूर्व व पश्चात अवस्थेत आहाराबद्दल माहिती :–** दर महिन्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या शुक्रवारी डॉ. उज्वला झामड बाह्य रुग्ण विभागात महिलांना प्रसूती पूर्व व प्रसूती पश्चात पोषक आहाराबद्दलचे महत्त्व समजावून सांगतात.

**६. सिद्धी ग्रामीण आरोग्य केंद्र, धामना :–** मातृ सेवा संघ, सीताबर्डी सूतिकागृहाद्वारे महिला, पुरूष आणि बालकांकरिता दिनांक २९ एप्रिल २०२२ रोजी सिद्धि ग्रामीण आरोग्य केंद्र, धामना, अमरावती रोड, नागपूर येथे सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत नि:शुल्क आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराची विस्तृत माहिती मातृ सेवा संघाच्या अहवालात दिलेली आहे.

दि. २९/४/२०२२ पासून सिद्धी ग्रामीण आरोग्य केंद्र, येथे शुक्रवारी शिबिर घेण्यात येते. अहवालवर्षी १४ शिबिर घेण्यात आले. शिबिरात एकूण २७६ महिला, १०९ पुरूष आणि ७१ बालकांची नोंदणी व तपासणी करण्यात आली. शिबिरामध्ये डॉ. पुष्पा भावे, डॉ. रत्ना शेखावत, डॉ. सीमा पांडे, नर्सिंग चे टयुटर व प्रशिक्षणार्थी परिचारीका व निता सोनटक्के यांचा शिबिरात सहभाग असतो. शिबिरात नि:शुल्क आरोग्य तपासणी, पॅप स्मिअर, एच.आय.व्ही. चाचणी, हिमोग्लाबिन, ब्लड शुगर, बोन डेन्सिटी, औषध वाटप करण्यात येतो.

**७. कर्करोग तपासणी शिबिर :–**

| **कर्करोग तपासणी शिबिर आयोजक** | **आरोग्य शिबिराचे स्थान व दिनांक** | **पॅप स्मिअर** | LBC | **आय ब्रेस्ट** |
|---|---|---|---|---|
| मातृसेवासंघ, सीताबर्डी, सूतिकागृह रोटरी क्लब ऑफ नागपूर ईशान्य व रोटरी क्लब ऑफ नागपूर नॉर्थ | सातनवरी, अमरावतीरोड १४ ऑगस्ट २०२२ | १० | – | २५ |
| मातृसेवासंघ, सीताबर्डी, सूतिकागृह रोटरी क्लब ऑफ नागपूर ईशान्य वुमेन्स वेलफेअर असोशिएशन | ऑर्डनन्सफॅक्टरी, डिफेन्स २१ ऑगस्ट २०२२ | १२० | २ | १३० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मातृसेवासंघ, सीताबर्डी, सूतिकागृह रोटरी क्लब ऑफ नागपूर ईशान्य व भारतीय स्त्री शक्ती | भरोसा सेल, सुभाषनगर १४ ऑगस्ट २०२२ | ११ | – | – |

## पद्मश्री कमलाताई होस्पेट ओरेशन व CME

सीताबर्डी सूतिकागृहाच्या सेवाकार्याला २०२१ साली १०० वर्षे पूर्ण झाले. शताब्दी वर्षात मातृ सेवा संघाच्या संस्थापिका ''पद्मश्री कमलाताई होस्पेट ओरेशन'' व सी.एम.ई. सुरू करण्यात आली.

रविवार दिनांक २० नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत ''पद्मश्री कमलाताई होस्पेट ओरेशन'' व सी.एम.ई. चे आयोजन रंजन सभागृह, मातृ सेवा संघ, सीताबर्डी येथे करण्यात आले. "Safe Motherhood-One Step Ahead" सी.एम.ई. चे घोषवाक्य होते. AMOGS Emergency Obstetrics Committee यांच्या संयुक्त विद्यमाने या सी.एम.ई. चे आयोजन करण्यात आलेले होते.

सौ. कांचन गडकरी, अध्यक्ष, मातृ सेवा संघ, महाल शाखा मुख्य अतिथी म्हणून लाभलेल्या होत्या. त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. डॉ. वैशाली वराडकर कार्यक्रमाच्या संयोजक यांनी स्वागतीय भाषण केले. डॉ. लता देशमुख, सचिव, मातृ सेवा संघ यांनी आपल्या प्रास्ताविकाद्वारे मातृ सेवा संघाच्या विविध प्रकल्प, प्रवृत्तीच्या आजवरचा प्रवासाविषयी माहिती दिली. डॉ. चैतन्य शेंबेकर, Chairperson AMOGS Emergency Obstetrics Committee यांनी मातृ सेवा संघाच्या सेवाकार्याचे कौतुक केले आणि निरंतर वैद्यकिय शिक्षणाच्या महत्वावर भर दिला. डॉ. वृषाली देशपांडे, कोषाध्यक्ष, मातृ सेवा संघ यांनी मुख्य अतिथींचा परिचय करून दिला. सौ. कांचन गडकरी यांनी आपल्या भाषणामध्ये पद्मश्री कमलाताई होस्पेट यांच्या कार्याबद्दल व मातृ सेवा संघाने "Safe Motherhood-One Step Ahead" या विषयावर सी.एम.ई. आयोजित करण्याबद्दल कौतुक व्यक्त केले. मुख्य अतिथी सौ. कांचन गडकरी, यांचा सत्कार मातृ सेवा संघाच्या उपाध्यक्षा सौ. रश्मी भावे यांनी केले व डॉ. चैतन्य शेंबेकर यांचा सत्कार डॉ. लता देशमुख यांनी केला. डॉ. कामिनी नाकाडे यांनी आभार प्रदर्शन केले.

''पद्मश्री कमलाताई होस्पेट ओरेशन'' : डॉ. वर्षा ढवळे यांनी "A Stitch in Time saves Nine" या विषयावर प्रभावीपणे प्रस्तुत केले.

डॉ. निर्मला वझे व डॉ. मनोरमा पुरवार ओरेशन करिता चेअरपर्सन म्हणून लाभलेले होते. सी.एम.ई. मधे नागपूर मधील वरिष्ठ डॉक्टरांनी विविध विषयांवर व्याख्यान व मार्गदर्शन केले. डॉ. नितू सिंग आणि डॉ. मनिषा साहू यांनी कार्यक्रमाचे समालोचन केले. १०३ डॉक्टरांनी सी.एम.ई. चा लाभ घेतला.

### मातृसेवासंघ, सीताबर्डी आणि रोटरी क्लब ऑफ नागपूर ईशान्स यांच्या सौजन्याने 'कॅन्सर जनजागृती कार्यक्रम'

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने मातृ सेवा संघ, सीताबर्डी आणि रोटरी क्लब ऑफ नागपूर, ईशान्य यांच्या संयुक्त विद्यमाने नर्सिंगच्या प्रशिक्षणार्थींकरिता १३ वा शैक्षणिक व कॅन्सर जनजागृती कार्यक्रम' दिनांक १ मार्च २०२३ रोजी मातृ सेवा संघाच्या

रंजन सभागृहात साजरा करण्यात आला. नागपूर येथील ७ विविध नर्सिंग केंद्राच्या २०० पेक्षा अधिक प्रशिक्षणार्थी या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या. नर्सिंगच्या प्रशिक्षणार्थीसाठी घोषवाक्य व भित्तीचित्र प्रद्रर्शनी आयोजित करण्यात आली होती.

रोटरीच्या प्रथम महिला रोटरीयन दर्शना बल्दवा यांनी प्रदर्शची चे उद्घाटन केले. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून डॉ. विनीता जैन लाभलेल्या होत्या. मातृ सेवा संघाच्या सचिव डॉ. लता देशमुख, रोटरी चे अध्यक्ष श्री. नरेश बल्दवा, सचिव डॉ. मनीषा राठी, रोटरी क्लब आर्फ नागपूर ईशान्यच्या प्रकल्प प्रमुख डॉ. मेहेरबानो कमाल, तसेच प्रमुख वक्ता म्हणून डॉ. निर्मला वझे लाभलेल्या होत्या.

पद्मश्री कमलाताई होस्पेट यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते माल्यापर्ण करून दीपप्रज्वलनाद्वारे कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सर्व मान्यवरांचा रोपटे देऊन सत्कार करण्यात आला.

रोटरी चे अध्यक्ष श्री. नरेश बल्दवा यांनी जागतीक महिला दिनानिमित्य आयोजित केलेल्या या कार्यकमाची प्रशंसा केली.

मातृसेवासंघाच्या सचिव डॉ. लता देशमुख यांनी रोटरी क्लब ऑफ नागपूर द्वारे मातृसेवासंघ, सीताबर्डी येथे २००७ सालापासून सुरू असलेल्या ‘श्रीमती प्रेमावती जैन कर्करोग निदान केंद्राची माहिती दिली तसेच रोटरी क्लब ऑफ नागपूर यांच्या सहकार्याबद्ल आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या डॉ. निर्मला वझे, स्त्रीरोग तज्ञ, संकल्प हॉस्पीटल यांनी ‘झहिदा बेन कमाल’ ओरेशन प्रस्तूत केले. त्यांनी प्रशिक्षणार्थी परिचारीकांना "Prevention of Cancer - Cervix & Breast" या विषयावर उपयुक्त माहिती दिली.

डॉ. मेहेरबानो कमाल यांनी गर्भाशयाच्या कॅन्सर ला प्रतिबंध करण्यासाठी पॅप-स्मिअर चाचणी, HPV चाचणी व लसीकरण करण्याबाबतची उपयुक्तता व माहिती सांगीतली. त्यांनी मातृ सेवा संघ, सीताबर्डी येथे कॅन्सरच्या निदानाकरिता अत्यंत माफक दरात उपलब्ध असलेल्या पॅप-स्मिअर चाचणी व मॅमोग्राफी च्या सुविधेची माहिती दिली. भारतात गर्भाशयाच्या कॅन्सरचे प्रमाण जागतीक तुलनेत २७ टक्के आहे. रुग्णाला कॅन्सरच्या तिसऱ्या व चौथ्या टप्प्यात निदान होणे हि बाब चिंताजनक आहे. जगातील दर ५ महिलांपैकी १ भारतीय महिला गर्भाशयाच्या कॅन्सरने ग्रस्त आहे. महिलांच्या वयाच्या मध्यान्हातील मृत्यूचे हे सर्वात मोठे कारण आहे. दरवर्षी १ लाख महिला गर्भाशयाच्या कॅन्सरचे बळी पडतात. भारतात मृत्यूचे प्रमाण दर ७ मिनीटात १ महिला असे आहे. लवकर निदान आणि योग्य उपचाराने गर्भाशयाचा कॅन्सरपूर्णपणे बरा होऊ शकतो.

रोटरीयन लता लद्धा, मीरा मालपानी, दीपा अग्रवाल, डॉ. प्रज्ञा लद्धा, सीताबर्डी सूतिकागृहाच्या वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. रत्ना शेखावत, नर्सिंग स्कूलच्या प्राचार्या श्रीमती कांचन बांते घोषवाक्य व भित्तीचित्र प्रदर्शनी करिता परीक्षक म्हणून लाभले होते.

रोटरीच्या सचिव डॉ. मनीषा राठी यांनी आभार प्रदर्शन केले.

## स्तनाचा कर्करोग व गर्भाशय मुखाचा कर्करोग शिबिराचा उद्घाटन समारंभ

महिलांमध्ये होणाऱ्या स्तनाचा कर्करोग व गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची तपासणी व निदान शिबिराचे उद्घाटन दिनांक २५ मार्च २०२३ रोजी सकाळी ११ वाजता मेमोग्राफी सभागृह, मातृ सेवा संघ, सीताबर्डी येथे करण्यात आले. डॉ. दीपक सेलोकर, D.H.O. नागपूर प्रमुख अतिथी म्हणून लाभले होते. दिनांक २८/३/२०२३, ६/४/२०२३ व ११/४/२०२३ रोजी शिबिरांचे आयोजन करण्यात आलेले होते.

पद्मश्री कमलाताई होस्पेट यांच्या प्रतिमेला माल्यापर्ण करून मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाद्वारे कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या मान्यवरांमध्ये डॉ. दीपक सेलोकर, डॉ. मनीषा राठी, रोटरी क्लब ऑफ नागपूर ईशान्य च्या सचिव, डॉ. मेहेरबानो कमाल, डॉ. आस्था खेमुका, रेडिओलॉजीस्ट, सीताबर्डी सूतिकागृह यांचा समावेश होता.

डॉ. दीपक सेलोकर यांच्या हस्ते शिबिराच्या माहितीपुस्तीकेचे अनावरण करण्यात आले.

डॉ. मेहेरबानो कमाल यांनी गर्भाशय मुखाच्या कर्करोगाबद्दल माहिती सांगितली.

डॉ. मनीषा राठी २७ वर्षापासून वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी स्तनाच्या कर्करोगाबद्दल माहिती दिली.

डॉ. दीपक सेलोकर यांनी जलदगतीने वाढत असलेल्या स्तनाच्या व गर्भाशय मुखाच्या कर्करोगाला प्रतिबंध करणे हे एक मोठे आव्हान असल्याबाबत सांगीतले. भारत सरकार द्वारे राबविण्यात येणाऱ्या नागरिकांच्या तपासणी व उपचार उपक्रमाबद्दल त्यांनी सांगीतले. त्यांनी धामणा गावात राबविण्यात येणाऱ्या आरोग्य शिाबिराच्या उपक्रमाची स्तुती केली व विनंती केली की असाच उपक्रम इतर ग्रामीण भागातही राबविला गेला तर खुप मदत होईल. मातृ सेवा संघाद्वारे आयोजित करण्यात आलेल्या कर्करोग निदान शिबिरात जास्तीत जास्त महिलांनी सहभागी होऊन सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. लता देशमुख यांनी डॉ. दीपक सेलोकर यांनी कार्यक्रमात उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले. शिबिराची माहितीपुस्तीका जास्तीत जास्त महिला मंडळांना पोहोचविण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच त्यांनी उपस्थित सर्वांना आवाहन केले की मातृ सेवा संघाद्वारे स्तनाचा कर्करोग व गर्भाशय मुखाचा कर्करोगाकरिता आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात जास्तीत जास्त महिलांनी सहभागी होऊन तपासणी करून घ्यावी तसेच याबाबतची माहिती इतरांना सुद्धा द्यावी. शिबिराच्या आयोजनामागे महत्त्वाची भूमिका असलेल्या मातृसेवासंघाच्या अध्यक्षा डॉ. अरुणा बाभुळकर, कार्यक्रमाच्या संचालक डॉ. वैशाली वराडकर यांचे आभार व्यक्त केले. डॉ. वैशाली वराडकर यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. कर्करोग तपासणी शिबिराचा बऱ्याच महिलांनी लाभ घेतला.

**पूर्ण झालेल्या योजना :–**

१. वाचनालय अद्ययावत करण्यात आले.

२. सूतिकागृहात सोलर पॅनल बसविण्यात आले.

३. मॅमोग्राफी मशीन सी.एस.आर. सिस्टीम लावून अद्यावत करण्यात आली.

४. सोनोमेमोग्राफी साठी लिनीयर प्रोब घेण्यात आले.

**आगामी योजना :–**

१. ऑपरेटिव्ह लॅप्रोस्कोपी साठी उपकरण घेणे.

२. इतर प्रकल्प सुरू करणे : युरो गायनेकोलॉजी.

३. वाचनालयात इंटरनेट ब्रॉड बॅन्डची सोय करणे.

४. गर्भसंस्कार केंद्र आठवडयातून एक दिवस सुरू करणे.

५. Sewage System (सांडपाणी व्यवस्था) नवीन बसविणे.

६. STP and ETP बसविणे.

सीताबर्डी सूतिकागृहाच्या कार्यात सर्वांनीच घेतलेल्या परिश्रमांमुळे आज सीताबर्डी सूतिकागृहाने १०२ व्या वर्षात पदार्पण केले आहे. अध्यक्ष, सचिव, रुग्णालय समितीचे सभासद, डॉक्टर्स, कार्यालयीन कर्मचारी, सफाई कामगार तसेच प्रशिक्षणार्थी, विभाग प्रमुख, शासकिय संस्था, आरोग्य विभाग महानगरपालिका, नागपूर आणि विश्वासाने योजना राबविण्यास मंजुरी देणारे केन्द्र व राज्य शासन यांच्या सहकार्याने संस्था प्रगती पथावर पोहचली आहे.

सर्वांच्या सहकार्याबद्दल आभार मानून २०२२–२०२३ या वर्षाचा अहवाल संपवीत आहे.

**डॉ. पुष्पा भावे, वैद्यकीय अधीक्षिका,**
**सीताबर्डी सूतिकागृह, (धर्मदाय रुग्णालय)**
**मातृसेवासंघ, सीताबर्डी, नागपूर.**

---

# सुधारित सहाय्यक परिचारिका प्रसविका प्रशिक्षण केंद्र

## मातृसेवासंघ, सीताबर्डी, नागपूर.

### वार्षिक अहवाल २०२० – २०२१

**१. स्थापना :–** कै.पद्मश्री कमलाताई होस्पेट व श्री वेणूताई नेने यांनी परिचारिका प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर सूतिकाची सेवा करण्याच्या निश्चिय केला. सूतिकांची सेवा करण्यासाठी सूतिकाशास्त्र शिकलेल्या सेविकांची आवश्यकता असते. मग आपणच आपल्या संस्थेत नर्सिंग प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम सुरू करावा असे कमलाताईचा मनात आले. महिलांना स्वावलंबी बनविणे हा त्यामागील एक उद्देश होता. याकरिता १९२६ साली त्यांनी दाई प्रशिक्षण केन्द्र सुरू केले दोन वर्षानंतर या केन्द्राला शासन मान्यता मिळाली, त्यानंतर याला ए.एन.एम नाव देण्यात आले.. केन्दाला बहुउद्देशीय आरोग्य परिचारिका प्रशिक्षण केन्द्र हे सध्या हे प्रशिक्षण परिचारिका सुधारित सहाय्यक परिचारिका प्रसविका प्रशिक्षण केंद्र (आर.ए.एन.एम) या नावाने सुरू आहे. आजतागत ९६ वर्ष या प्रशिक्षिण केन्द्राला झाली असून अजूनही केन्द्र अविरत कार्य करीत आहे.

**२. नोकरीची संधी :–** १००% सरकारी निमसरकारी व प्रायव्हेट दवाखान्यात नोकरीची संधी मिळते व काही प्रशिक्षणार्थींना सीताबर्डी सूतिकागृहात नोकरीची संधी देण्यात येते.

**३. मान्यता :** सुधारित सहाय्यक परिचारिका प्रसविका प्रशिक्षण (आर.ए.एन.एम) केंद्र, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण (MSBNPE), महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सिल मुंबई (MNC) व इंडियन नर्सिंग कॉन्सिल, दिल्लीची (INC) मान्यता आहे. तसेच वेळेवर कॉन्सिल इन्स्पेक्शन व्दारे प्रशिक्षण केंद्राची अंसपकपजल वाढवली जाते. प्रशिक्षणार्थी पास झाल्यावर रजिस्ट्रेशन महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सिल करते. शेवटचे कॉन्सिल तपासणी जुलै २०१५ मध्ये केली. पुढील तपासणीसाठी तयारी सुरू आहे.

महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सिल मुंबई (MNC) प्रशिक्षणासंबधी यांच्याकडे सर्व नियम व अटी येत होत्या पण २०१८ नंतर महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण (MSBNPE) याच्याद्वारे प्रवेश प्रकिया व परीक्षा याविषयी सर्व ठरवले जाते व फक्त रजिस्ट्रेशनसाठी महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सिल मुंबई (MNC) जबाबदारी आहे.

**४. प्रशिक्षण कालावधी :** प्रशिक्षण कालावधी एकूण २४ महिन्याचा आहे.

**५. वर्ग संबंधी माहिती :** महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ MSBNPE यांच्या मान्यतेप्रमाणे दर वर्षी एकूण ४० प्रशिक्षणार्थीं घेण्याची परवानगी आहे. पण त्या मंजुरीप्रमाणे क्लासरूम व प्रशिक्षित स्टॉफ नसल्याने मातृसेवासंघाच्या कार्यकारणी ठरावाप्रमाणे वर्षाला २० प्रशिक्षणार्थींना प्रवेश देण्यात देणार आहे.

**६. प्रवेश दिलेल्या प्रतिक्षणार्थींची माहिती :** जुलै २०२१ मध्ये प्रशिक्षण प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण झाली होती. पण कोविड १९ या विषाणूमुळे पसरलेल्या कोरोना या रोगामुळे १ ऑगस्ट ऐवजी १ सप्टेंबर २०२१ मध्ये प्रशिक्षण सुरू झाले. एकूण २० प्रशिक्षणार्थींना प्रवेश देण्यात आलेला होता. त्यापैकी १६ प्रशिक्षणार्थींनी जानेवारी २०२३ ला परीक्षा दिली. यापैकी अश्विनी शेरकर ने ऑनर्स मिळविला व इतर १५ प्रशिक्षणार्थी पहिल्या श्रेणी मध्ये उत्तीर्ण झाले.

प्रथम वर्षाची परीक्षा बॅच २०२१ ची जुलै ऐवजी जानेवारी २०२३ ला झाली. निकाल १००% मिळाला. ऑगष्ट २०२२ ला एकूण २० प्रशिक्षणार्थींनी प्रवेश घेतला.

**७. एडमिशन संबंधी माहिती व प्रवेश अटी :** वर्षाला १ बेंच घेण्याची परवानगी आहे. एकूण ४० प्रशिक्षणार्थींची मर्यादा आहे.

**शैक्षणिक पात्रता :** १२ वी परीक्षा उत्तीर्ण (कला, वाणिज्य, विज्ञान शाखा)

**प्रवेश प्रकिया :** R.A.N.M. चा समिती सदस्यांचे सहमतीने प्रशिक्षणार्थीनींची निवड केली जाते.

**वयोमर्यादा :** १७ वर्ष पूर्ण ते ३५ वर्षापर्यंत.

**गुणांची टक्केवारी :** ४०% पेक्षा जास्त.

**८. रेजिस्ट्रेशन :** प्रशिक्षण संपल्यावर निकाल लागल्यावर महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सिल, मुंबई येथे प्रशिक्षणार्थीला रजिस्ट्रेशन ऑनलाईन करणे अनिवार्य आहे.

९. R.A.N.M. **समितीचे सदस्य :**

१. डॉ. अरुणा बाभुळकर - अध्यक्ष
२. डॉ. लता देशमुख - सचिव
३. डॉ. वासंती देशपांडे - कोषाध्यक्ष

४. डॉ. पुष्पा भावे - वैद्यकी य अधीक्षिका
५. डॉ. रत्ना शेखावत वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी
६ डॉ. कामिनी नाकाडे - वैद्यकीय अधिकारी
७. श्रीमती कांचन बांते - आर.ए.एन.एम. स्कूल प्राचार्य
८. प्रतिनिधी - सौ. आशा मेढेंगे स्कूल आफ पब्लिक हेल्थ, सदर

**१०. समितीची सभा :**

अहवाल वर्षी एकूण ५ सभा घेण्यात आल्या.

**११. प्राथमिक आरोग्य केंद्र अनुभवाची सोय :** शासनाच्या आदेशाप्रमाणे स्वतःचे ग्रामीण आरोग्य केन्द्र प्रशिक्षणार्थी करीता राहणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे धामणा येथे २९ एप्रिल २०२२ ला भव्य उद्धाटन करून हे केन्द्र सुरू केले. सिद्ध ग्रामीण आरोग्य केन्द धामणा माननीय डॉ. सुधीर बाभुळकरांचे असून मातृ सेवा संघ प्रशिक्षणाची करीता त्यांनी हे ग्रामीण आरोग्य केन्द्र उपलब्ध करून दिले. पहिल्या कॅम्प ला एकूण १६९ ग्रामीण व्यक्तीला नि:शुल्क उपचार देण्यात आले. हा कॅम्प धामणा येथे दर महिन्यात एक किवा दोन वेळा घेतला जातो. प्रत्येक कॅम्प ला ४० ते ५० पर्यंत रूग्णांना (महिला, पुरुष) नि:शुल्क सेवा दिली जाते.

मुख्यतः वैद्यकीय अधीक्षीका डॉ. पुष्पा भावे, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. रत्ना शेखावत, बाळरोगतज्ञ डॉ. सीमा पांडे महिन्याला एक किंवा दोन वेळेस जाऊन आरोग्य तपासणी करतात.

**एकूण कॅम्प :** १३ झालेले आहेत.

**कर्मचारी वर्ग :**

| अ.क्र. | कर्मचारी वर्ग | मंजूर पदे |
|---|---|---|
| १. | स्कूल प्राचार्य | १ |
| २. | सिस्टर ट्यूटर (Clinical Instructor) | ४ (१०:१) |
| ३. | वार्डन/मेट्रन | १ |
| ४. | लिपीक | १ |
| ५. | अटेन्टड | १ |
| ६. | सफाई कामगार | १ |
| ७. | वाहन चालक | १ |

**विशेष दिवसाकरिता राबविण्यात आलेले कार्यक्रम**

एप्रिल २०२२ : १) १ व ७ एप्रिल जागतिक आरोग्य दिवस - रोगनिदान शिबिराचा १६१ रुग्णांनी घेतला लाभ

२) दि. ३ मे २०२२ ला मातृसेवा संघाच्या वर्धापन दिनानिमित्त सुधारित सहाय्यक परिचारिका प्रसविका प्रशिक्षण केंद्राच्या प्रशिक्षणार्थी व मातृसेवासंघातील परिचारिकांकरिता खालील पारितोषिक देण्यात आलेले आहे.

१) पद्मश्री कै. कमलाताई होस्पेट पुरस्कार : अ) महाराष्ट्रातून प्रथम - माहिती नाही
ब) संस्थेतून प्रथम-बॅच २०१८ कु. दिव्या दिलीप नानपूरे ४९८/६००

२) कै. डॉ. पद्मजा रिसबुड पारितोषिक :
अ) संस्थेतून प्रथम-बॅच २०१९ कु. दिव्या दिलीप नानपूरे
ब) प्रथम वर्ष परिक्षेत संस्थेतून प्रथम-बॅच २०१९-कु. किर्ती सुरेश गाणवीर ६५३/६००
३) कै. वेणूताई नेणे स्मारक निधी कामात हुशार बॅच २०१९ कु. माहेश्वरी गणेश उके
४) कै. निजसुरे पारितोषिक कामात हुशार बॅच २०२० कु. हर्षाली राजेश अखिलपिल्लेवार
५) कै.इंदिराबाई खरे पारितोषिक उत्तम परिचारिका, बॅच २०१९श्रीमती नंदा नारायण साळुंके
६) कै. इंदिराबाई नीयोगी पारितोषिक उत्तम परिचारिका कु. शिवानी संजय अरखेल
७) कै. शांताबाई गोखले पारितोषिक उत्तम वागणूक कु. संगीता गुलाब पटेल
८) कै. धनंजयराव गाडगीळ शिष्यवृत्ती उत्तम वागणूक बॅच२०१९कु. वैष्णवी अनिल गोखले
९) कै.सुशिलाबाई गाडगीळ पारितोषिक उत्तम वागणूक बॅच२०२० श्रीमती शिल्पा राजेश सोमकुंवर

**४. १२ मे जागतिक परिचारीका दिन :** म्हणून साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी शारदा चौरे (Senior Sister Tutor Government Medical college) ह्या लाभलेला होत्या.

५. दि. ५ जून पर्यावरण दिवस (Environment Day) साजरा करण्यात आला.

**६. आंतरराष्ट्रीय योग दिन** : दि. २१ जून २०२२ मातृ सेवा संघ सीताबर्डी येथे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते कै. पद्मश्री कमलाताई होस्पेट यांच्या फोटोला माल्यार्पण व पुष्प अर्पण करून करण्यात आली. मुख्य अतिथी व योगगुरू म्हणून श्री. श्रीकांत भावे सर लाभलेले होते. व्यवसायाने केमिकल इंजिनिअर असून ते न्युझीलँड चे रहिवासी आहेत. तसेच मातृ सेवा संघाच्या डॉ. पुष्पा भावे वैद्यकीय अधीक्षिका, सौ. छाया जोशी फॅमिली कॉउंसिलिंग सेंटर इंचार्ज, नर्सिंग स्कूलच्या प्राचार्य श्रीमती कांचन बांते, मेट्रन श्रीमती शौली भद्रा उपस्थित होत्या. मुख्य अतिथी व योगगुरू यांनी योगाचे प्रात्यक्षिक दाखवून उपस्थित विद्यार्थी परिचारिका, रूग्णालयीन कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी यांचेकडून योग करुन घेतला. सौ. श्रेया पांडे यांनी आभार प्रदर्शन केले.

**७. ११ जूलै जागतिक लोकसंख्या दिवस :** साजरा करण्याकरीता ओ.पी.डी ला जाऊन आरोग्य शिक्षण दिले.

**८. १ ऑगष्ट ते ७ ऑगष्ट ब्रेस्ट फिडिंग सप्ताह :** (Breast feeding week) साजरा करण्यात आला. तसेच Oral rehydration solution (ORS) यावर सुद्धा कार्यक्रम घेण्यात आला. Indian Academy of Pediatrics (IAP) यांच्या सौजन्याने वेगवेगळ्या प्रतियोगिता पोस्टर व स्लोगन स्पर्धा घेण्यात आले.

**९. १५ ऑगष्ट –** १५ ऑगष्ट 'स्वातंत्र्यदिन' (Independence Day) ला प्रशिक्षणार्थींनी वेगवेगळ्या वेशभूषा धारण करून साजरा करण्यात आला.

**१०. १ ते ७ सप्टेंबर हा दिवस ''राष्ट्रीय पोषण सप्ताह''** (National Nutrition Day) म्हणून साजरा करण्यात आला. प्रशिक्षणार्थींद्वारे Nutrition प्रदर्शनी लावण्यात आली. गरोदर मातेला आहाराबद्दल स्वास्थ्य शिक्षण देण्यात आले.

डॉ. रत्ना शेखावत व डॉ. पुष्पा भावे यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.

**११.** ९ डिसेंबर ला बॅच २०२० चा 'निरोप समारंभ' (Farewell Ceremony) आणि

बॅच २०२२ चा 'स्वागत काय्रक्रम' (Welcome Program) साजरा करण्यात आला.

**१२. एड्स दिवस –** १ डिसेंबर एड्स दिवस करिता इंदिरा गांधी ते गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज पासून रेली काढण्यात आली त्यात शिक्षक वृदांनी सुध्दा सहभाग घेतलेला होता

**१३. ख्रिसमस दिवस –** २४ डिसेंबर ला पहिल्यांदा ख्रिसमस साजरा करण्यात आला.

**१४. कार्यशाळा –** २८ डिसेंबरला स्त्रियांसाठी लागू झालेला कायदा आणि कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ यावर कार्यशाळा घेण्यात आली. श्रीमती माधुरी साकुळकर स्त्री सहायक संघटनाचे सदस्य व लेखिका यांच्या उपस्थितीत कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ हा महिलांचा मुलभूत अधिकारांच्या विषयी कार्यशाळा घेण्यात आली.

**१५. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन –** महोत्सव साजरा करण्यात आला. डॉ. नंदिता संन्याल मॅडम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. डॉ. लता देशमुख – सचिव, डॉ. वासंती देशपांडे – कोषाध्यक्ष, डॉ. पुष्पा भावे – वैद्यकीय अधीक्षिका, डॉ. रत्ना शेखावत– वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, आरएएनएम प्रशिक्षणार्थी, स्नेहांगण शाळेचे विद्यार्थी व प्राचार्य सौ. मृणाली देशमुख व शिक्षक आदी उपस्थित होते.

**१६. द्वारका वॉटर पार्क पिकनिक –** २१ फेब्रुवारी प्रशिक्षणार्थींची शैक्षणिक सहल द्वारका वॉटर पार्क येथे नेण्यात आली.

**१७. ८ मार्च ला 'जागतिक महिला दिन'** साजरा करण्यात आला. कै. पद्मश्री कमलाताई होस्पेट ला फोटोला माला अर्पण केल्यानंतर झाशी राणी चौकमध्ये झाशी राणीचा पुतळ्याला कु. प्रचिता मेश्राम ने माला अर्पण केली.

**आर.ए.एन.एम तर्फे राबविण्यात येणारे विविध उपक्रम :**

प्रशिक्षणार्थींची स्मरण शक्ती वाढविण्याकरीता विविध उपक्रम घेतले जातात.

**विशेष आभार :** डॉ. अरुणा बाभुळकर–अध्यक्ष, डॉ. लता देशमुख–सचिव, श्री. वासंती देशपांडे–कोषाध्यक्ष, डॉ. पुष्पा भावे–वैद्यकीय अधीक्षिका, डॉ. रत्ना शेखावत वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी या सर्वांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य मिळत असते. या सर्वांचे आम्ही आभारी आहोत. तसेच चित्रा नायर यांचे विशेष आभार आर.ए.एन.एम चा अकांउट चे काम पाहण्याबद्दल तसेच ऑनलाईन सहकार्य करण्याबद्दल.

**१८. पालक सभा :** पालकांच्या सोथी प्रमाणे बोलावून प्रशिक्षणार्थींची माहिती दिली जाते.

**२०. भविष्यकालील योजना :**

१. प्रशिक्षणार्थींना समाज कल्याणाची शिष्यवृत्ती मंजूर करण्याकरिता प्रयत्न सुरू आहे आणि त्याकरिता डॉ. लता देशमुख सचिव मातृ सेवा संघ सीताबर्डी नागपूर आणि डॉ. वांसती देशंपाडे कोषाध्यक्षा मातृ सेवा संघ सीताबर्डी नागपूर यांचे वेळोवेळी सहकार्य मिळते.

२. अडचणी प्रशिक्षण केन्द्राला अनुभवी व स्थायी शिक्षक वृदांची कमतरता आहे. त्याकरिता सूतिकागृहातील योग्यता असलेल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित केले तर प्रशिक्षण केंन्द्राकरिता स्थायी व योग्य कर्मचारी मिळू शकते. व प्रशिक्षण केन्द्राचा विस्तार वाढू शकतो.

**प्राचार्य, श्रीमती कांचन बांते,**
**आर.ए.एन.एम, मातृसेवासंघ, सिताबर्डी,**

---

# मातृसेवासंघ, कर्मचारी महिला वसतीगृह, सीताबर्डी, नागपूर

**स्थापना –१९५४, अहवाल २०२२–२३**

मातृसेवा संघ कर्मचारी महिला वसतीगृह, सीताबर्डी, नागपूर हे नागपुरातील मध्यवर्ती स्थानात सुसज्ज व सुरक्षित असलेले उत्कृष्ट असे वसतीगृह आहे. बाहेरगावच्या विद्यार्थिनी तसेच नोकरी करणाऱ्या महिलांसाठी सुरक्षित निवास व भोजनाची उत्तम व्यवस्था व्हावी, या उद्देशाने मातृसेवासंघ महिला वसतीगृहाची स्थापना १९५४ साली करण्यात आली.

अहवाल वर्षी २०२२–२३ मध्ये एकूण ५० मुलींना वसतीगृहात प्रवेश देण्यात आला. त्यात नोकरी करणाऱ्या ९ मुलींचा समावेश आहे. तसेच ४१ मुलींना अल्प कालावधीकरिता प्रवेश देण्यात आला.

वसतीगृहाचे काम सुरळीत चालविण्यासाठी खालील स्थायी समिती खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| डॉ. अरुणाताई बाभुळकर, अध्यक्ष | डॉ. लता देशमुख, सचिव |
| सौ. ममता चिंचवडकर, आमंत्रक | डॉ. स्नेहा देशपांडे, सदस्य |
| सौ. रूपा जुनघरे, सदस्य | डॉ. श्रीमती शौली भद्र, सदस्य |
| श्रीमती कांचन बांते, सदस्य | सौ. संध्या वाघाडे, वॉर्डन |

दि. ३१ ऑगस्ट २०२२ रोजी गणेशोत्सव रंजन सभागृह यंथे साजरा करण्यात आला. ६ ऑक्टोबर २०२२ रोजी कोजागीरी पोर्णीमा साजरी करण्यात आली.

अहवाल वर्षी स्थायी समितीच्या २ सभा घेण्यात आल्या. वसतीगृहाच्या आंतरिक समस्या, नवीन प्रवेशबाबत, इमारतीची दुरुस्ती करणे बाबत, वसतीगृहातील शिस्त, नियम इत्यादी वर चर्चा करण्यात आली.

वसतीगृहात वॉटर प्यूरीफायर, इन्व्हर्टर, सोलर हिटर, वर्तमान पत्र इत्यादी सोयी पुरविण्यात येतात.

अहवाल वर्षी पेस्ट कंट्रोलचे काम करण्यात आले, चेंम्बर्स साफ करण्यात आले, गवत कापण्यात आले. आगामी योजने अंतर्गत वसतीगृहाच्या इमारतीला रंगरंगोटी करण्याचे व स्पोर्ट कोर्ट तयार करण्याचे ठरविण्यात आले.

सौ. संध्या वाघाडे वसतीगृहाच्या वार्डन पदावर कार्यरत आहे. सर्व कामात मातृसेवासंघाच्या अध्यक्ष, सचिव व स्थायी समितीचे सभासद यांचे वेळोवेळी मोलाचे सहकार्य लाभले.

**सौ. संध्या वाघाडे–वार्डन, कर्मचारी महिला वसतीगृह, सीताबर्डी, नागपूर**

---

# मातृसेवासंघ इन्स्टिट्यूट ऑफ सोशलवर्क, बजाजनगर, नागपूर

**स्थापना –१९५८**

स्व. पद्मश्री कमलाताई हॉस्पेट यांनी श्रीमती वेणूताई नेने यांच्यासह सन १९२१ साली मातृसेवासंघाचा पाया घातला. १९५८ साली मातृसेवासंघाच्या छत्रछायेत कै.डॉ.सत्यबाला

तायल यांनी मातृसेवासंघ इन्स्टिट्यूट ऑफ सोशलवर्क ची स्थापना केली. १९६२ सालापासून समाजकार्याचे शिक्षण देणारे हे महाविद्यालय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित आहे. २००८ साली सुवर्ण महोत्सव साजरा केलेल्या या संस्थेने देशातील समाजकार्य शिक्षणाचे एक केंद्र या नात्याने मान्यता मिळवलेली आहे. मे २०२२ मध्ये संस्थेला युजीसी नॅक कडून 'बी++'.ग्रेड (सीजीपीए-२.९१) मिळून, हे वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळवण्याऱ्या देशातील विद्यापिठांच्या महाविद्यालयात संस्थेचा समावेश झाला आहे.

**या महाविद्यालयाचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.**

१. व्यावसायिक समाजकार्याचे प्रशिक्षण देणे

२. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक उत्तरदायित्वाची भावना निर्माण करणे व त्यांना समाजकार्यासाठी प्रवृत्त करणे

३. समाजकल्याणाच्या क्षेत्रातील विविध स्तरांवर समाजकार्य हस्तक्षेप करण्यास सक्षम करणारे प्रशिक्षण देणे. वर्ग शिक्षण, संशोधन व क्षेत्रकार्यास बळकटी देणारे क्षेत्रकृती प्रकल्प (Field Action Project) ही या प्रशिक्षणाची माध्यमे आहेत.

**शैक्षणिक उपक्रम :**

१. या महाविद्यालयात पुढील अभ्यासक्रम चालविले जातात.

१. समाजकार्य त्रिवर्षीय स्नातक अभ्यासक्रम:- बी.एस. डब्ल्यु

२. समाजकार्य पारंगत द्विवर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रम:- एम.एस.डब्ल्यु

३. पी.एच.डी. प्रोग्रॅम (समाजकार्याशी संबंधित)

४. शॉर्ट टर्म कोर्स इन कम्युनिकेटीव इंग्लिश

५. शॉर्ट टर्म कोर्स इन रिसर्च मेथडॉलॉजी (संशोधन पध्दती)

६. पदव्यूत्तर समुपदेशन प्रमाणपत्र अभ्यासक्रम

व्यावसायिक सामाजकार्य शिक्षण देण्याव्यतिरिक्त, इतर अनेकशासकिय व स्वैच्छिकसेवा, संस्थांना सल्ला सेवा पुरविणे, संशोधनात्मक अभ्यास करून देणे, संस्थांच्या कृतीप्रकल्पात सहभागी होणे अशा विविध माध्यमातून महाविद्यालयाच्या तज्ञ सेवांचा व अनुभवांचा लाभ करून दिला जातो.

**२. कॉलेज डेव्हलपमेंट कमिटी:**

१ ऑक्टोबर २०२२ रोजी कॉलेज डेव्हलपमेंट कमिटी महाराष्ट्र पब्लीक युनिव्हर्सिटीज ॲक्ट २०१६ च्या सेक्शन ९७ (१) नुसार गठीत करण्यात आली. या समितीचा कार्यकाळ १ ऑक्टोबर २०२२ ते ३० सप्टेंबर २०२७ पर्यंत राहील. समितीच्या सदस्यांची माहीती खालीलप्रमाणे आहे.

| नांवे | पद |
|---|---|
| १. डॉ. अरुणा बाभुळकर, अध्यक्ष, मातृसेवासंघ | व्यवस्थापन अध्यक्ष |
| २. डॉ. लता देशमुख, सचिव, मातृसेवासंघ | व्यवस्थापन सदस्य |
| ३. डॉ. नंदिता माने, इंग्रजी विभाग प्रमुख | प्राचार्य नामनिर्देशित विभाग प्रमुख |
| ४. डॉ. प्रिन्स आगाशे, ग्रंथपाल | प्राध्यापक प्रतिनिधी (रिक्त) |
| ५. -------- | महिला प्राध्यापक प्रतिनिधी |

| | |
|---|---|
| ६. श्रीमती अपर्णा देशपांडे | शिक्षकेत्तर प्रतिनिधी |
| ७. श्री.बी.जे.इंगळे | निमंत्रीत सदस्य |
| **८. डॉ. मौसमी भोवल** | **स्थानिक सदस्य जे व्यवस्थापन** |
| **९. डॉ.रमेश पांडे** | **आणि प्राचार्य नामनिर्देशित** |
| **१०. श्रीमती रश्मी भावे** | **आहेत** |
| ११. डॉ. वृषाली देशपांडे, | कोषाध्यक्ष, मातृसेवासंघ |
| १२. डॉ. ज्योती निसवाडे | समन्वयक आयक्युएसी |
| १३. श्री. उत्सव साखरे | विद्यार्थी प्रतिनिधी |
| १४. प्रा. केशव वाळके, प्रभारी प्राचार्य | सदस्य सचिव |

**मातृसेवासंघ इन्स्टिटट्यूट ऑफ सोशलवर्क**

**टिप : शैक्षणिक वर्ष सत्र २०२२-२३ मध्ये समितीच्या ५ सभा झाल्या.**

**३. कॉलेज कॉंसिल :** या समितीमधे सहभागात्मक निर्णय प्रक्रियेचा अवलंब करून कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यात येतो. प्रा.नंदिता माने यांची या समितीच्या सचिवपदी निवड झाली. या समितीच्या दोन सभा या वर्षात पार पडल्या.

**४. आय.क्यू.ए.सी.:** या कक्षाने महाविद्यालयाच्या विकासाचे आपले कार्य सुरू ठेवले. डॉ. प्रिन्स आगाशे (ग्रंथपाल) यांनी समन्वयक म्हणुन तर प्रा. केशव वाळके यांनी कक्षाचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. शैक्षणीक सत्र २०२२-२३ मध्ये समितीच्या ३ सभा झाल्या. सदर सत्रात नॅक मूल्यांकन करण्यात आले. नॅकची टीम दि. २० आणि २१ सप्टेंबर २०२२ ला चौथ्या सायकलच्या मुल्यांकनाकरिता अनुक्रमे १) डॉ. सिद्धेगौडा येलीयुर सिद्धेगौडा, माजी कुलगुरू, तुमकुर विद्यापीठ, कर्नाटका यांच्या अध्यक्षतेखाली २) डॉ.पामेला सिंगला, प्राध्यापक तसेच समाजकार्य विभाग प्रमुख, दिल्ली विद्यापीठ व ३) डॉ. व्हीक्टोरीया अमलोरपावा मेरी, बॉन सोअर्स महिला महाविद्यालय, तीरूवरूर, तमिलनाडू यांच्याद्वारे मूल्यांकन केले गेले व त्यांनी कार्यकारी प्राचार्य यांना आपला अहवाल दि. २१ सप्टेंबर २०२२ ला सुपूर्द केला. महाविद्यालयाला मिळालेले मुल्यांकन सुरूवातीला (बी.सीजीपीए-२.७४) यामध्ये समाधानी नव्हते म्हणुन महाविद्यालयाने आक्षेप नोंदवून पूनर्मूल्यांकनासाठी विनंती केली व त्यानंतर महाविद्यालयाला (बी.जीपीए-२.९१) प्राप्त झाली.

**५. प्रवेश :** या सत्रात एकुण २७२ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेतला पैकी १६७ (६१.४० टक्के) महिला व १०५ (३८.६० टक्के) पुरूष होते. ८५.२९ टक्के विद्यार्थी सामाजिकदृष्टया मागासवर्गातील होते व १०.२९ टक्के खुल्या प्रवर्गातील होते.

**निकाल :** रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या सर्व वर्गाच्या परीक्षा अजून झालेल्या नसल्यामुळे निकालाविषयीची माहिती अपूर्ण आहे

**६. ग्रंथालय :** संस्थेचे अद्यावत ग्रंथालय असून प्राचार्यांच्या अध्यक्षतेखालील

'ग्रंथालय मंडळ' च्या माध्यमातुन ग्रंथालयाचे कार्य केले जाते. ग्रंथालयात एकूण १७२०४ पुस्तके असून अहवाल वर्षात नवीन विकत घेतलेल्या १८ तर डॉ वैशाली बेझलवार यांनी दान केलेल्या १८ पुस्तकांची भर पडली. ग्रंथालयात २३७९ बॉउण्ड व्हाल्युम्स आणि ३ जर्नल्स उपलब्ध आहेत.

**वाचन प्रेरणा दिन :** दि. १५.१०.२०२२ या दिवशी वाचन प्रेरणा दिन तसेच दि.२३ एप्रिल, २०२३ ला जागतिक बुक दिवस घेण्यात आला. दि.१४.११.२२ ला बौद्धिक धन संपदा (IPR) वर ऑनलाईन कार्यशाळा घेण्यात आली.

**७. संस्थेला उच्चशिक्षण व संशोधन क्रेद्र :** म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडुन मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार आचार्य पदवीकरीता २० जागा मान्यता प्राप्त झालेल्या आहेत.

**८. सर्टिफिकेट कोर्स इन कम्युनिकेटिव्ह इंग्लीश:** या कोर्स मध्ये सत्र २०२२-२०२३ ला एकूण ११० विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रत्येक शनिवारला १.३० ते ४.०० पर्यत घेण्यात आले. डॉ. शनुर मिर्झा, प्राचार्य, टाटा गर्लस् स्कुल तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, डॉ केशव वाळके यांचेद्वारे  दि. १६ फेब्रुवारी, २०२३ ला उद्घाटन करण्यात आले. तसेच त्यांच्याद्वारे विदयार्थ्यांना संभाषण कौशल्य इ. मार्गदर्शन करण्यात आले तसेच मेघा कश्यप, समन्वयिका डॉ नंदीता माने इत्यादी इतरही मार्गदर्शकाद्वारे मार्गदर्शन देण्यात आले.

**९. शार्ट टर्म रिसर्च मेथडॉलॉजी :** महविद्यालयाच्या पदव्युत्तर विभागाद्वारे हा मुल्यवर्धीत कार्यक्रम संस्थेतील एम.एस.डब्ल्यु च्या विद्यार्थ्यांकरीता सुरू केलेला आहे. या कोर्सची विभागणी ६ कार्यशाळा मध्ये करून सामाजिक कार्यातील एका पैलूंवर मार्गदर्शन केले जाते. या सत्रात प्रा केशव वाळके, प्रा.ज्योती निसवाडे आणि डॉ अमेन झेव्हीयर हे संसाधन व्यक्ती होते. सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे दिली जातात.

**१०. पदवी विभाग :** एकूण ११७ विद्यार्थ्यांनी पदवीपर्यंतच्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला होता. कारोनामुळे सर्वच वर्गातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष क्षेत्रकार्य करता आले नाही तरी ऑनलाईनच्या माध्यमातुन जवळ जवळ ५० विविध समाजकार्य संस्थांमध्ये विद्यार्थ्यांनी क्षेत्रकार्य केले. विद्यार्थ्यांना क्षेत्रकार्यांचा संपूर्ण अनुभव मिळावा यासाठी सर्व व्यवस्था वर्गसंचालकांनी केली होती. प्राध्यापकांच्या मार्गदर्शनांतर्गत विद्यार्थ्यांनी कार्यनुभव घेतला. सर्वच विषयाचे अभ्यासक्रम पुर्ण करण्याकरिता वर्ग घेण्यात आले. सी.एच.बी तत्वावर साहाय्यक प्राध्यापकांची नियुक्ती पदवी विभागासाठी करण्यात आली. सहसंचालक उच्च शिक्षण, महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशानुसार एकूण १६ सहा. प्राध्यापकांची तासीका तत्वावर सत्र २०२२-२३ करिता पुनर्नियुक्ती करण्यात आली.

**पदव्युत्तर विभाग :** एमएसडब्ल्यू अभ्यासक्रम या विभागात चालतात. एकूण १४३ विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमांना प्रवेश घेतला. डॉ. अमेन झेव्हीअर व प्रेरित बाथरी

यांनी या अभ्यासक्रमांचे वर्ग प्रबंधक म्हणून कार्य केले. संस्थेच्या पूर्णकालीन व अ‍ॅडहॉक शिक्षकांच्या मदतीने हया अभ्यासक्रमांचे वर्ग चालविले गेले. क्षेत्रकार्याशी संबंधीत नियमितपणे चालणा-या कौशल्य कार्यशाळा, गटचर्चा, चर्चासत्रे, उद्बोधनकार्यक्रम, संस्थाभेटी आदिंबरोबरच प्रत्यक्ष क्षेत्रात काम करणाऱ्या अनुभवींकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्राप्त झाले.

**११. ग्रामिण शिबिर :** राष्ट्रसंत तकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सामाजिक कार्य अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून, महाविद्यालयाने बिएसडब्ल्यू सेमिस्टर चार व एमएसडब्ल्यू सेमिस्टर दोन च्या विद्यार्थ्यांसाठी १४ ते १८ मार्च २०२३ या कालावधीत बोरगांव कलंद्री, उमरेड तालुका, नागपूर जिल्हा येथे पाच दिवसीय ग्राम शिबिराचे आयोजन केले होते. हे नागपूर पासून ४५ कीमी अंतरावर आहे. टिममध्ये ६६ विद्यार्थी, ४ प्राध्यापक आणि १ ऑफीस असिस्टंट यांचा समावेश होता ज्यामध्ये ५२ विद्यार्थी एमएसडब्ल्यु वर्गाचे होते तर १४ विद्यार्थी बिएसडब्ल्यु वर्गाचे होते. शिबिराचे ठिकाण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व ग्रामपंचायत प्रांगण, बोरगाव कलंद्री असे होते.

**१२. शैक्षणिक सहल :** राष्ट्रसंत तकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या नियमांनुसार सोशलवर्क प्रॅक्टिकमचा एक भाग म्हणून बिएसडब्ल्यू सेमिस्टर सहा व एमएसडब्ल्यू सेमिस्टर चार च्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यास दौरा आयोजित केला होता. या शैक्षणिक सत्रादरम्यान बिएसडब्ल्यू सेमिस्टर सहा च्या विद्यार्थ्यांनी १७ ते १९ जानेवारी २०२३ दरम्यान अमरावती जिल्हयातील मेळघाट परिसरात अभ्यास दौरा केला होता. भेटीसाठी सहा स्वयंसेवी संस्था (VOs) ओळखल्या गेल्या आणि ५६ विद्यार्थ्यांपैकी ४५ अभ्यास दौऱ्यात सामील होते. दौ-याच्या उद्देशाने आणि भेट देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे ((VOs) संक्षिप्त परिचय करून विद्यार्थ्यांना महाविद्यालयात अभिमुख केले होते. दौरा सुरळीत पार पाडण्यासाठी विविध समित्या जसे अर्थ, आरोग्य, वाहतूक, शिस्त, अन्न, वेळेचे व्यवस्थापन इ. नीता जगताप, डॉ. प्रियंका अंबादे आणि रोहीत उजवणे हे विद्यार्थ्यांसोबत होते. दौऱ्यादरम्यान परतवाडा येथील ((KHOJ) महान ट्रस्ट, चांदूरबाजार, लवादा संपूर्ण बांबू केंद, धारणी, डीम प्रोजेक्ट, मखाळा, पायविहीर ग्रामसभा, या सहा ((VOs) ला भेट दिला.

मास्टर ऑफ सोशलवर्कच्या चौथ्या सेमिस्टरच्या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून पुडूचेरी येथे अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता. हा अभ्यास दौरा वर्ग संचालक डॉ. अमेन झेविअर कौशल यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यी आणि ३ प्राध्यापक डॉ. नंदिता माने, डॉ. पायल चामटकर आणि प्रेरित बाथरी यांच्या सक्रिय सहभागाने पार पडला.

**१३. आय.सी.एस.एस.आर संशोधन प्रकल्प:** ICSSR दिल्ली तर्फे "Widows Social Security, Issues of Entitlement and Accessibity of Government Programmes : A Study of Widows in Rural India" या विषयावरील संशोधना करिता जुलै २०१९ मध्ये प्रकल्पाला मान्यता मिळाली असून जुलै २०२३ पर्यंत संशोधन प्रकल्प पूर्ण करून अहवाल सादर करावयाचा आहे. डॉ ज्योती

निसवाडे प्रधान संशोधक म्हणून कार्य पार पाडित आहेत.

**१४. आदिवासी संधोधन संस्था, आदिवासी कार्य मंत्रालय, भारत सरकार:** यांचे तर्फे संस्थेला CoE (Centre of Excellence) म्हणुन मार्च २०२० मध्ये मान्यता मिळाली असुन डॉ केशव वाळके यांनी सादर केलेल्या "Tribal and Other Traditional Dewellers inProtected Areas in India : Their Rights, Issues and Challenges: या विषयावरील संशोधन प्रकल्पाला मार्च २०२० मध्ये मान्यता दिली आहे. मंत्रालयातर्फे दोन वर्षांसाठी एकुण मान्य अनुदान ४०.० लाख आहेत. डॉ. केशव वाळके प्रधान संशोधक म्हणून कार्य करीत आहेत. महाविद्यालयाला मोटा अंतर्गत अंकेक्षण अहवाल २०२१-२२ सादर न केल्याने अप्राप्त आहे.

**१५. वार्षिक स्नेहसंमेलन :** २०२२-२०२३ या सत्रातील वार्षिक स्नेहसंमेलन दि. २३ व २४ मार्च २०२३ या दोन दिवसात पार पडले. २ व ३ मार्च २०२३ रोजी क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या होत्या. श्री. रोहित हे निमंत्रक होते. प्राध्यापक सदस्य डॉ. प्रणीता सोनेकर, प्रेरित बाथरी, श्री. संदीप कोठार, श्री. ईश्वर पुन, श्री. कपिल नान्ने होते. क्रिडा स्पर्धेत इनडोअर गेम्स तसेच मैदनी खेळांचा समावेश होता. औपचारिक समारंभ २४ एप्रिल २०२३ रोजी आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. अनुप कुमरे, कारगृह अधिक्षक, नागपुर मध्यवर्ती कारागृह हे होते. विविध स्पर्धांमधील विजेत्यांना प्रमाणपत्रे व पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. वार्षिक सामाजिक मेळावा साजरा करण्यासाठी सर्व कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी औपचारिक दुपारच्या जेवणात भाग घेतला. मानसी तिडके यांनी आभार मानले.

**१६. बौद्धिक संपदा कायदा (IPR) -** संपदा महाविद्यालयाचा ग्रंथालय विभाग व राजीव गांधी बौधिक संपदा कायदा व्यवस्थापनाच्या वतीने १४ नोव्हेंबर २०२२ ला २.०० वाजता एमएसडब्ल्यु प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांकरिता डॉ. भारत सूर्यवंशी यांचे भाषण आयोजित करण्यात आले.

**१७. संविधान व देशाच्या बांधणीत महत्त्व :** यावर एकदिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले. सदर चर्चासत्र राष्टीय सेवा योजना व संविधान सप्ताहाच्या निमित्ताने दि. २३ नोव्हेंबर २०२२ ला २.०० वाजता एमएसडब्ल्यु प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांकरिता आयोजित करण्यात आले. यामध्ये डॉ. भुजंग बोबडे, डायरेक्टर, रिसर्च फॉर रिसर्जन्स फाउंडेशन, नागपूर यांनी मार्गदर्शन केले.

**१८. आजादी का अमृत महोत्सव २०२२ :** स्वातंत्र प्राप्तीचे ७५ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल आजादीचा अमृत महोत्सव निमित्त हर घर तिरंगा अभियान राबविण्यात आला.

**१९. आंतरराष्ट्रीय योगा दिवस :** दि.२१ जुन २०२२ ला तायल हॉल मध्ये आयोजित करण्यात आला. यामध्ये सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, प्रोजेक्ट स्टाफ व विद्यार्थी उपस्थित होते.

२०. स्वातंत्र्यता संग्राममे जनजाती नायकोका योगदान हा कार्यक्रम १७ एप्रील २०२३ रोजी प्रा.श्याम कोरेटी, प्राध्यापक तथा विभागप्रमुख, इतिहास, रातुम नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला.

**२१. फिल्ड ॲक्शन प्रोजेक्ट:**

**अ. नागपूर चाईल्डलाईन १०९८ प्रकल्प (नोडल ऑर्गनायझेशन) :–** आपतकालीन स्थितीत सापडलेल्या मुलांसाठी चोवीस तास विनामूल्य सेवा देणारी ही टेलिफोन मदत सेवा आहे. १९९६ ला मुंबई इथे या संस्थेची स्थापना झाली. सध्या चाईल्डलाईन देशातील २८ विविध राज्यातील ६०३ जिल्हे आणि शहरात ७७४ पेक्षा अधिक विविध संस्थामार्फत नेटवर्कच्या स्वरूपात कार्यरत आहे. मातृसेवासंघ इंन्स्टिटयूट ऑफ सोशलवर्क, बजाजनगर, नागपूर या संस्थामार्फत नेटवर्कच्या स्वरूपात कार्यरत आहे. ही संस्था १९९८ पासून चाईल्डलाईनशी जुळलेली आहे. याव्यतिरीक्त रेल्वे चाईल्डलाईन जी पूर्णपणे नागपूर रेल्वे स्थानकावर सेवा देते त्याच्याशी ही संस्था जुडून आहे.

**ब. कौटुंबिक समुपदेशन केंद्र :** महिलांवरील वाढत्या कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना लक्षात घेऊन अशा महीलांसाठी विशेष कक्ष नागपूर येथे पोलीस आयुक्तालयाच्या सहकार्यांने स्थापन करण्यात आला. संस्थेने या संकल्पनेला पुढे नेण्यास पुढाकार घेतला. आणि १९९८ ला हा कक्ष सिताबर्डी नागपूर येथे स्थापन केला गेला. डॉ ज्योती निसवाडे या कक्षाच्या संचालक म्हणून काम पाहतात. ०१ एप्रिल २०२२ त ३१ मार्च २०२३ पर्यंत या कौटुंबीक समुपदेशन क्रेद्रात ४१० एकुण खटल्यांची नोंद झालेली आहे. ३८ प्रकरणांचा मागील वर्षात पाठपुरावा करण्यात आला. आज पर्यंत कौ.स. केंद्रात नोंदविलया गेलेलया एकुण खटल्यांची संख्या ४२२९ इतकी आहे.

**क. पर्यावरणसंबंधी सामाजिक कृती कार्यक्रम (कम्युनीटी ॲक्शन फॉर एमव्हायरमेंट–कफे):** कॅफे या उपक्रमांतर्गत उत्सावाच्या दरम्यान जलयुक्त साठ्याचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांकरीता कार्यशाळेचे आयोजन केले जाते. तसेच गणपती विसर्जनादरम्यान संस्थेच्या विद्यार्थ्यांनी महानगर पलिकेच्या स्वच्छता माहिमेत सहभागी होवून मदत केली जाते परंतु या सत्रात हे उपक्रम राबविता आले नाही. महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे ग्रंथ प्रदर्शनी तसेच स्वच्छता अभियान डॉ. प्रिन्स अजयकुमार आगाशे यांच्याद्वारे करण्यात आले.

**ड. लाईफलाईन (फिल्ड ॲक्शन प्राजेक्ट फॉर प्रोमोशन ऑफ ऑरगन डोनेशन):** कोरोना महामारीमुळे अवयवदान संबंधी जनजागृती व समाजात प्रोत्साहन देण्यासंबंधी प्रत्यक्ष कार्यक्रम घेता आले नाही परंतु आभासी पद्धतीने जनजागृती करण्यात आली. यात मोहन फॉउंडेशन चेन्नई यांचा सहभाग व सहकार्य लाभले.

**२२. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत राबविलेले कार्यक्रम रासेयो सभा:** कोवीडमुळे प्रत्यक्ष समुदायात जाऊन रासेयो स्वयंसेवकांना कार्य करणे कठीण असल्याने स्वयंसेवकांनी

आभासी पद्धतीने संदेश विडिओ, पोस्टर च्या द्वारे सामाजिक माध्यमे जसे व्हाट्सअॅप, फेसबुक इन्स्टाग्राम चा वापर करून कोरोनाविषयी जनजागृती करण्यात आपली भूमिका पार पाडली. कौटुंबिक समुपदेशक केंद्राच्या वतीने एच.आए.व्ही पॉझीटीव महिलांना कोवीड-१९ संदर्भात मार्गदर्शन करउयात आले, व धन्याचे वाटप केले गेले. संस्थेच्या काही रासेयो स्वयंसेवकांकडून गरजूंना धान्यवाटप, मास्क व जीवनवश्यक गोष्टींचे वाटप करण्यात आले.

**२३. प्रा. केशव वाळके यांनी प्रभारी प्राचार्य पदाचा पदभार स्वीकारला:** २२ जानेवारी २०२१ रोजी मातृसेवासंघ इंन्स्टिटयूट ऑफ सोशलवर्क, नागपूर चे प्रभारी प्रायार्य म्हणून प्रा. केशव वाळके यांनी पदभार स्वीकारला.

**२४. समारोपीय :** आदिवासी कार्य मंत्रालय, भारत सरकार, विद्यापीठ अनुदान आयोग, भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, महिला व बालकल्याण मंडळ, नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य समाजकल्याण सल्लागार मंडळ, मुबई आणि त्याचे सर्व देणगीदार, हितचिंतक यांचेकडून मिळालेल्या मदतीकरिता संस्था आभारी आहे. विविध सामाजिक संस्था हयांनी क्षेत्रकार्य, अभ्यास दौरे आयोजन करण्यात मदत केली ही संस्था त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल ऋणी आहे. संपूर्ण शैक्षणिक वर्षात प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, प्रशासकीय कर्मचारी यांनी केलेल्या निरंतर प्रयत्नांमुळे संस्थेला उद्दिष्टात्मक कार्य पूर्ण करण्यास मदत मिळाली. उत्कृष्ट संस्था म्हणून संस्थेचा नावलौकिक आहे. विद्यार्थी तसेच पालक यांनी संस्थेप्रती दाखविलेला विश्वास मोलाचा आहे. त्या करिता त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतो. धन्यवाद!

संस्थेचे ऑडीटर : सगदेव अॅण्ड कंपनी, चार्टर्ड अकाउंटंट, राहाटे कॉलणी, वर्धा रोड, नागपूर-४४००१०

संस्थेच्या बँक: १. बँक ऑफ महाराष्ट्र, लक्ष्मीनगर शाखा, नागपूर.
२. बँक ऑफ बडौदा, लक्ष्मीनगर शाखा, नागपूर.
३. स्टेट बँक ऑफ इंडीया, बजाजनगर शाखा, नागपूर.

**प्रा. केशव वाळके, प्रभारी प्राचार्य,**
**मातृसेवासंघ इन्स्टिटयूट ऑफ सोशल वर्क, बजाजनगर, नागपूर.**

---

## मातृसेवासंघ, नंदनवन दुर्बलमनस्क मुलांची शाळा

**सीताबर्डी, नागपूर (स्थापना - १९६०)**

**एकूण मान्य विद्यार्थी संख्या ७० (निवासी ३५ व अनिवासी ५५)**

**प्रवेशित मुले -७३ व मुली -२७ = एकुण १०० विद्यार्थी**

**शाळेचे ध्येय - बौद्धिक दिव्यांग मुलांचे शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसन**

मातृ सेवा संघ सीताबर्डी या संस्थेच्या २०२१ मध्ये शतकपूर्ती झालेल्या संस्थेच्या छायेखाली बौद्धिक दिव्यांग हा समाजातील बराच मोठा घटक आहे. हे लक्षात घेऊन

नंदनवन दुर्बल मनस्क मुलांच्या शाळेची स्थापना ०१ एप्रिल १९६० साली परमपूज्य पद्मश्री कमलाताई होस्पेट ह्यांनी केली. या क्षेत्रात काम करणारी विदर्भातील पहिली शाळा म्हणून या शाळेने नावलौकिक मिळविला आहे. त्यानंतर शाळेला सर्वांकडूनच अपेक्षित सहकार्य मिळत गेले आणि शाळेची उत्तरोत्तर प्रगती होत गेली. २०२१ मध्ये ह्या शाळेला ६१ वर्ष पूर्ण झाले आहेत. ह्याचे औचित्य साधत संघातर्फे व शाळेतर्फे हिरक महोत्सव मार्च २०२० मध्ये साजरा करण्यात आला याचा आम्हाला खूप अभिमान आहे. तसेच अनेक नवीन योजनाची पूर्तता करण्याचा शाळा सातत्याने प्रयत्न करीत आहे.

बौद्धिक दिव्यांग मुलांचे शिक्षणात सर्वसाधारणपणे शिक्षण, प्रशिक्षण पुनर्वसन असा अर्थ अभिप्रेत आहे. मागील २० वर्षात विशेष मुलांच्या बाबतीत जागरूकता फार वाढलेली आहे. जे मूल २० वर्षापूर्वी वयाच्या १० ते ११ व्या वर्षी पालक शाळेत घेवून येत असत तेच आज ४ ते ५ वर्षाच्या प्रारंभापासूनच पालक शाळेत घेऊन येतात हा खूप चांगला बदल आहे. अशा विशेष मुलांची प्रथम बुद्धीगुण्य तपासणी शाळेत केली जाते. त्यासाठी शाळेत वैद्यकीय मानसशास्त्रज्ञ आहेत. बुद्धीगुण्य तपासणी झाल्यानंतर सिव्हील सर्जनचे प्रमाणपत्र मिळाल्यावरच शाळेत प्रवेश देण्यात येतो. विशेष मुलांचे शारीरिक वय, आय.क्यु व इतर शारीरिक, भाषिक, सामाजिक विकास व सोबत दैनंदिन कार्य करण्याची क्षमता लक्षात घेवून त्यांचे वर्गीकरण करण्यात येते व त्यानुसार वर्गात प्रवेश देण्यात येतो.

शाळेमध्ये एकूण ०८ वर्ग आहेत. मुलांना त्यांच्या क्षमतेप्रमाणे शिक्षण लेखन, वाचन, सामान्य ज्ञान, चित्रकला, हस्तव्यवसाय शिकवले जातात. सकाळी ११ ते २ या वेळात शैक्षणिक उपक्रम व दुपारी २.३० ते ४ या वेळात हस्तव्यवसाय शिकवले जातात. दुपारी ४ ते ४.३० या वेळात पी. टी., डंबेल्स, योगा, गाणे, सामुहिक उपक्रम शिकवले जातात. २०२१ पासून बौद्धिक दिव्यांग मुलांना दिशाप्रकल्प अंतर्गत शिक्षण दिल्या जाते.

शाळेला जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांची मान्यता आहे व त्यांच्याकडून अनुदान मिळते. शाळेत प्रवेश घेताना पालक गोंधळलेले असतात. शाळेत आल्यावर समाजसेविका, मानसशास्त्रज्ञ व विशेष शिक्षक सर्व गोष्टी समजावून सांगतात. पालकांमध्ये शाळेबद्दल विश्वास निर्माण करतात की या शाळेमधे तुमचे मूल सुरक्षित आहे व मुलांमधे त्याच्या बुद्धी व शारिरीक क्षमतेनुसार प्रगती होईल. तसेच या विशेष मुलांना व त्याच्या पालकांना शासनाच्या ज्या सोयी व सवलती उपलब्ध आहेत त्याबद्दल माहिती दिली जाते.

समाजाकडून एवढीच अपेक्षा आहे की या मुलांना समजून घ्या, आधार द्या, मात्र आंधळं प्रेम व सहानुभूती देऊ नका. त्यांना इतर सामान्य एप्रिल महिन्याची सुरुवात शाळेच्या वर्धापन दिन (१ एप्रिल १९६०) निमित्ताने दरवर्षी होतो. त्यानिमीत्याने श्रीसत्यनारायणाची पूजा करण्यात आली याकरिता शाळेतील विद्यार्थी व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

शाळेच्या बर्डी येथील इमारतीतील वसतिगृहाच्या माळ्याचे नूतनीकरणाचे काम एप्रिल २०२२ पासून मातृसेवासंघाच्या आर्थिक सहाय्याने सुरू करण्यात आले.

कोव्हिड नंतर प्रथमच शाळा सुरू करण्यात आली, कोव्हिड १९ च्या प्रादुर्भावामुळे दोन वर्षानंतर विद्यार्थी शाळेत येऊ लागले. त्यांचे स्वागत चॉकलेट देऊन करण्यात आले.

१३ एप्रिल रोजी शाळेत पालक सभा घेण्यात आली. या सभेकरिता श्री. जगन गुदगडे, सहाय्यक प्राध्यापक, Special Education, CRC ह्यांनी पारकांना मार्गदर्शन केले. दोन वर्षामधे शाळेची मुले घरी असल्यामुळे त्यांच्यामध्ये आढळून आलेले Behaviour Problems या समस्या कशा कमी करायच्या ह्यावरचे उपाय त्यांनी पालकांना सुचविले. याच दिवशी शाळेमध्ये चैत्रगौरीचे पूजन करण्यात आले. मुलांना व पालकांना डाळ व पन्हे प्रसाद महणून देण्यात आले.

१४ एप्रिल भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा कार्यक्रम शाळेत सर्व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांचे जीवनातील महत्त्वाचे भाग वाचण्यात झाले.

१८ एप्रिल रोजी नागपूर महानगर पालिका, CRC व समाज कल्याण विभागातर्फे दिव्यांगाकरिता ADIP योजना व वृद्ध व्यक्तींकरिता असलेल्या वयोश्री योजने अंतर्गत शाळेतील सर्व कर्मच्याऱ्यांच्या सेवा रेशिमबाग येथील सुरेश भट सभागृह येथे सकाळी ९ ते सायंकाळी ७ पर्यंत लावल्या गेल्या. या योजने अंतर्गत दिव्यांगांना व वयाप्रमाणे दिव्यांगत्व येणाऱ्या व्यक्तिंना सहाय्यक उपकरणे जसे Walker, Learing Aid, C.P. Chair, JLM इ. बाबतची नोंदणी या दिवशी करण्यात आली.

एप्रिल २०२२ शेवटच्या आठवड्यात वसतिगृहातील विद्यार्थी उन्हाळयाच्या सुट्यांमुळे घरी गेले. तरीही कर्मचारी मात्र अनेक महत्त्वाच्या कामात व्यस्त होते. उद. स्कूटर रॅली, शिबिरे, मान्यवरांचे वाढदिवस, जयंती, पुण्यतिथी, राखी पौर्णिमा, आजादीचा अमृत महोत्सव, स्वच्छता अभियान इत्यादि.

दि. २७ जून २०२२ रोजी पासून शाळा व वसतिगृह सुरू झाले शाळेत व वसतिगृहात विद्यार्थी घेण्यास सुरुवात झाली.

जुलै २०२२ दिशा प्रकल्पाचा अभ्यासक्रम कोव्हीड काळात मुळे घरी असल्यामुळे मुलांना ऑन लाईन शिकविण्यात येत होते. पण विद्यार्थी शाळेत आल्यामुळे तो अभ्यासक्रम कसा राबवावा याकरिता दि. १२ व १३ जुलै रोजी दिशा प्रकल्पातर्फे शाळेमध्ये दोन दिवसीय शिबीर घेण्यात आले. Home Goals, School Goals कसे निवडावे Home Goals बाबत पालकांना किंवा विद्यार्थी वसततिगृहात राहत असल्यास त्यांच्या अधीक्षिकेला याबाबत सहभागी करून घेऊन नंतरच ते निवडावे ते शिकविण्याकरिता त्यांना आवश्यक ती सामग्री उपलब्ध करुन देऊन व शिकविण्याचे तंत्र त्यांना अवगत करावे याबाबत मार्गदर्शन केल्या गेले.

दिशाच्या State Co-ordinator सौ. रुपाली कांबळे, औरंगाबाद झोनच्या

Co-ordinator सौ. पूनम तांबे व नागपूर झोन च्या Co-ordinator सौ. रोशनी गौर ह्यावेळी उपस्थित होत्या ह्या शिबीरात प्रत्येक मुलाकरिता Work Book and Manual चा उपयोग कसा करावा याबद्दल त्यानी सांगितले. तसेब याबाबत Activity घेऊन उपस्थित शिक्षकांना प्रेरणा दिली, दिशा अभ्यासक्रम वर्गात मुलांना शिकविताना तो प्रभाविपणे कसा असावा हे सांगण्यात आले. IBP स्कोअरींग अचूक ध्येय निवडणे, आईवडिलांचा सहभाग कसा असावा. बौद्धिक मूल्यांकनानुसार अभ्यासक्रम निवडणे याबाबद्दल विशेष शिक्षकांना मार्गदर्शन केले. दि.१२ जुलै रोजी शाळेतील सर्व विशेष शिक्षक उपस्थित होते.

दि.२६ जुलै रोजी २०२२-२०२३ या सत्राची प्रथम पालक सभा घेण्यात आली. पालकाना दिशा पोजेक्ट संबधित माहिती देण्यांत आली. मुलांकरिता निवडलेल्या ५ गृह कौशल्यांची माहिती देण्यात आली. हे गृहकौशल्य पालकांनी आपल्या पाल्यांकडून कशा पद्धतीने करुन घ्यावा हे समजावून सांगण्यात आले. तसेच नवीन पालकांची ओळख करुन देण्यात आली.

२ ऑगस्ट नागपंचमी सणाबद्दल शाळेतील विशेष शिक्षक सौ. पाराशर ह्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

१२ ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांकडून शाळेच्या परिसरात व आपल्या आपल्या वर्गामध्ये स्वच्छता अभियान राबविण्यांत आले. मुलांकडून शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. मुलांच्या वेषभूषा स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये विद्यार्थ्यांनी झांशीची राणी लक्ष्मीबाई, महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, भगतसिंग, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांची वेषभूषा केली होती. वेषभूषेतील विद्यार्थी करण शेंडे याने संविधान वाचन केले वरील विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आले. हर घर तिरंगा या मोहिम अंतर्गत सर्व विद्यार्थ्यांना व शिक्षकांना तिरंगा झेंड्याचे वाटप करण्यात आले.

१८ ऑगस्ट रोजी शाळेत श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्य दहीहांडी घेण्यात आली. विद्यार्थ्यांना राधा-कृष्ण या वेषभूषेत तयार करण्यात आले. तसेच गाण्याच्या तालावर विद्यार्थ्यांनी रिंगण बनवून दहीहांडी फोडण्यात आली. सौ. निता पालीवाल विशेष शिक्षक ह्यांनी कृष्ण जन्माची माहिती दिली. मुलांना याप्रसंगी गोपालकाला देण्यात आला. शाळेत जन्माष्टमी, तान्हा पोळा, गणेशोत्सव, शिक्षकदिन, गांधी जयंती, विजयादशमी, कोजागिरी, भुलाबाई इत्यादि कार्यक्रम अत्यंत उत्साहाने साजरे केले गेले.

१४ नोव्हेंबर रोजी शाळेत बालक दिनाचा कार्यक्रम "Need for Hungry" आणि बरखा आर्ट हुडडी यांच्या सयुक्त विद्यमाने शाळेतील मुलांची पेण्यात आया Ball in Bucket, खुर्ची, बटाटा पर लंगडी व वेळ घेतले. शाळेतील मुलांनी या दिवशी चाचा नेहरू यांची वेशभूषा परिधान जपलेली होती. या मुलांच्या हस्ते केक कटींग करण्यात आला. शाळेतील अनिकेत जनबंधु व चेतन सावडीया या मुलांनी अभिनय गीत गाऊन दाखविले. मुलांना कार्यकमाच्या शेवटी चौकट दिसला असा खाऊ देण्यात आला.

संविधान दिन रॅली दिशा-अभियान-चर्चासत्र, जागतिक दिव्यांग दिनानिमित्त

सांस्कृतिक कार्यक्रम, यांचे समायोजन केले गेले.

५ डिसेंबर रोजी समाज कल्याण विभागातर्फे श्रम परिहराची सुटी देण्यात आली.

७ डिसेंबर दिव्यांग सप्ताह निमित्त शासकिय दंत रुग्णालय व महाविद्यालयातर्फे 'दंत तपासणी शिबीर' घेण्यात आले. या वेळी शाळेतील विद्यार्थ्यांची दंत तपासणी व दातांची स्वच्छता करुन देण्यात आली.

२३ डिसेंबर शाळेमध्ये नाताळाचा (ख्रिसमस) कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी ख्रिसमस ट्री सजविला होता. विद्यार्थ्यांनी सांताक्लॉज ची वेषभूषा केली. सौ. प्रिया डहाड विशेष शिक्षक यांना नाताळ सणाची व सॅन्टा क्लॉजची माहिती दिली. मुख्याध्यापक श्रीमती भावना न. नंदनवार यांनी मुलांच्या हस्ते केक कापला. मुलांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. शाळेतील कर्मचाऱ्यांनी मुलांसोबत नाताळाचा सण आनंदाने साजरा केला.

२८ डिसेंबर रोजी शाळेच्या विद्यार्थ्यांची वार्षिक सहल श्रीक्षेत्र 'आदासा' गणेश मंदिर या देवस्थानाच्या ठिकाणी गेली होती. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थी कर्मचारी उपस्थित होते. तेथे मुलांनी गणपतीचे दर्शन घेतले. मुलांना खावू देण्यात आला. आदासा येथे जाताना व येताना मुलांनी सहलीला भरपूर आनंद घेतला.

३१ डिसेंबर २०२२ रोजी शाळेच्या मा. मुख्याध्यापक श्रीमती भावना न. नंदनवार ह्या नियत वयोमानानुसार शाळेच्या कामकाजातून सेवानिवृत्त झाल्या. सेवानिवृत्तीचा कार्यक्रम शाळेमध्ये घेण्यात आला. याप्रसंगी मातृसेवासंघ सीताबर्डी येथील मा. अध्यक्ष डॉ. अरुणा बाभुळकर, मा. सचिव डॉ. लता देशमुख, मा. कोषाध्यक्ष डॉ. वृषाली देशपांडे, व मातृसेवासंघ कार्यकारिणी सदस्य डॉ. रत्ना शेखावत, डॉ पुष्पा भावे उपस्थित होत्या. यावेळी शाळा व कर्मशाळा येथील सर्व कर्मचारी उपस्थित होते. शाळेतील वैद्यकीय मानसशास्त्रज्ञ सौ. श्वेतांबरी गोजे ह्यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. मा. अध्यक्ष व सचिव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. श्रीमती भावना नंदनवार ह्यांनी १९९७ ते २०२२ या कार्यकाळातील विशेष शिक्षक ते मुख्याध्यापक असा विद्यार्थ्यासोबत व सहकाऱ्यांसोबत असलेला प्रवास व मनोगत व्यक्त केले. तसेच शाळेतील व कर्मशाळेतील कर्मचाऱ्यांनी त्यांच्याबद्दल आपले अनुभव व मनोगत व्यक्त केले. सर्वांना नाश्ता देण्यात आला.

३ जानेवारी – क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीचा कार्यक्रम शाळेत घेण्यात आला. त्यांच्याबद्दल माहिती विशेष शिक्षक सौ. दुरुगकर, सौ. पाराशर आणि सौ. गिरी मॅडम ह्यांनी सांगितली

१४ जानेवारी मकर संक्रांत निमित्त शाळेमध्ये दि. १६ जानेवारी रोजी मोठ्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रांगणात पतंग उडविली. मकरसंक्रांतीला तिळगूळ वाटप, जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा मध्ये सहभाग घेतला.

२६ जानेवारी – मातृ सेवा संघ सभासद मा. सुनिला थेरगावकर मॅडम ह्यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिन संपन्न झाला. त्यांनी मुलांना खाऊ वितरित केला व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

०३ फेब्रुवारी – पालक सभा शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या पालकांची सभा घेण्यात आली. पालकाच्या समस्यांचे निराकरण केले. या सभेचे विषय बौद्धिक अक्षम मुलांच्या वर्तन समस्या व वार्षिक स्नेहसम्मेलन असे होते. मातृसेवा संघ व्यवस्थापन समितीच्या ज्येष्ठ समाजसेविका व जेष्ठ मानसोपचार तज्ज्ञ श्रीमती सूनिला थेरगावकर मॅडम यांनी सर्व पालकांना व शिक्षकांना मार्गदर्शन केले. त्यांनी मुलांना देणाऱ्या वर्तन समस्या शाळेगारी गावकर में ह्यांची शाळेतील कार्यरत शिक्षक शिवायोत्तर कर्मचा–यांशी मनमोकळेपणाने संवाद साधला

फेब्रुवारी रोजी शाळा व कर्मशाला चे वार्षिक स्नेहसंम्मेलन मातृसेवासंघाचे रंजन सभागृह येथे दुपारी १२ वाजता झाले. यावेळी उद्घाटक मा. डॉ. प्रियंका नारनवरे (समापदेशक) SRPF, अध्यक्ष मा. समाज कल्याण विभाग नागपूर, प्रमुख पाहुणे मा. समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद नागपूर, सिद्धार्थ श्री. किशोर भोयर, जिल्हा व तसेच प्रमुख अतिथी डॉ. मीनाक्षी गिरीश, प्रोफेसर व विभाग प्रमुख AIMS नागपूर ह्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. प्रमुख अतिथी मा. डॉ. मीनाक्षी गिरीश ह्यांनी मुलांना समजेल अशा सोप्या शब्दात भाषण व्मक्त केले. तसेच मा. डॉ. प्रियवंदा नारनवरे ह्यांनी उद्घाटनपर भाषण केले. श्री. गायकवाड सर व श्री. भोयर सर ह्या प्रसंगी आवश्यक कामामुळे कार्मक्रमाला येवू शकले नाही. त्यांच्या वतीने श्री. रामटेके सर व श्री. गोंडे सर हे कार्यक्रमाला उपस्थित होते.

मातृ सेवा संघ अध्यक्ष मा. अरुणाताई बाभूळकर, सचिव मा. डॉ. लता देशमुख, कोषाध्यक्षा डॉ. वृषाली देशपांडे, सभासद डॉ. रत्ना शेखावत मैडम कार्यक्रमाला उपस्थित होते. शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापक सौ. यश:श्री वाघ व सर्व कर्मचारी तसेच कर्मशाळा अधिक्षक सौ. रंजना सुखदेवे व सर्व कर्मचारी उपस्थित होते. तसेच समस्त पालकवर्ग या कार्यक्रमाला उपस्थित होते. शाळा व कर्मशाळा विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

९ फेब्रुवारी वार्षिक स्नेहसंम्मेलना निमित्त शाळेमध्मे विद्यार्थी व शाळेतील कर्मचाऱ्यांचे खेळ व मनोरंजनाचे कार्यक्रम घेतले.

१० फेब्रुवारी वार्षिक स्नेहसंम्मेलना निमित्त मुलांना व शाळेतील कर्मचाऱ्यांना कर्मशाळेतर्फे स्नेहभोजनाचा कार्मक्रम झाला. शाळा व कर्मशाळेतील सर्व विद्यार्थी व कर्मचारी स्नेहभोजनाला उपस्थित होते. दि. ११ फेब्रुवारी रोजी स्नेहसंम्मेलनानिमित्त शाळेला सुट्टी देण्यात आली.

२० फेब्रुवारी नागपूर सुधार प्रन्यासद्वारे व जिल्हा समाज कल्याण जिल्हा परिषद नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने सूर्यनगर लता मंगेशकर पार्क पारडी, नागपूर मेथे दिव्यांगासाठी नवीन अनुभूती पार्कची निर्मिती होणार आहे. मा. नितीनजी गडकरी रस्ते व परिवहन केंद्रिय मंत्री व अन्य मान्यवरांच्या हस्ते भूमीपूजन सोहळ्याचे उद्घाटन करण्यात आले. या भूमिपूजन सोहळा कार्मक्रमासाठी शाळेतील सर्व कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. काही शाळेच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्मक्रम सादर केले. दिव्यांग विद्यार्थ्यांना कानाचे यंत्र, दिव्यांगाची

शैक्षणिक किट व्हिल चेअर इ साहित्याचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शाळेच्या रविरंजन, पार्थ, श्लोक पुन, कु. मुग्धा, व कु. ऋतूजा रागासे या ०५ विद्यार्थ्यांना दिव्यांगाची शैक्षणिक किट देण्यात आली.

६ मार्च २०२३ शाळेमध्ये होळीचा सण साजरा केला गेला. होळी सणाची माहिती शाळेतील विशेष शिक्षक सौ. प्रिया मोहोड व सीआरसी च्या विद्यार्थ्यांनी होळीची माहिती दिली. लहान मुलांना गुलाल व गाठी लावून होळी साजरी केली.

८ मार्च २०२३ जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सर्व महिला शिक्षक व शिक्षकेतर वर्गाचे गुलाबाचे फुल देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. यानिमित्त मुलांच्या चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. सावित्रीबाई फुले, आनंदीबाई जोशी, सुधामूर्ती, कमलाताई होस्पेट, कुसुमताई वांकर ह्या स्मरणात असलेल्या महिलांचे चरित्र वाचण्यात आले. तसेच शाळेतील महिलांच्या स्पर्धा घेण्यात आल्या.

१४ मार्च शाळेत शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापक सौ. वाघ मॅडम ह्यांच्या हस्ते सरस्वतीपूजन झाले. त्यांच्यासोबत शाळेतील विद्यार्थ्यांनी कु. राधा, कुराणी, कु मुग्धा व अक्षत या विद्यार्थ्यांच्या हस्ते सरस्वती पूजन केले गेले. मुलांना गूळ फुटाणे प्रसाद वाटण्यात आला तसेच मुलांना कच्चा चिवडा, जिलेबीचा खाऊ वाटण्यात आला.

१. श्रीमती भावना नरहरी नंदनवार, मुख्याध्यापक ह्यांनी वसतिगृहातील मुलांसाठी उपयोगी गरम पाण्यासाठी इलेक्ट्रीक गीझर देणगी दाखल देण्यात आले.

२. सौ. शुभांगी गभणे, वसतिगृह अधिक्षक ह्यांनी वसतिगृहातील मुलांसाठी वॉटर प्यूरिफायर लावून दिले.

३. श्री आनंदकुमार सिंह, नागपूर यांच्यातर्फे वसतिगृहातील मुलांसाठी खेळण्यासाठी कॅरम बोर्ड देण्यात आला.

४. श्रीमती निमा मॅडम नागपूर ह्यांचे तर्फे वसतिगृहातील मुलांसाठी बसण्यासाठी ०२ सतरंजी मिळाली.

**आभार**

मातृसेवासंघ नंदनवन दुर्बल मनस्क मुलांची शाळा नियमित व व्यवस्थित चालू राहण्याकरिता व्यवस्थापन मातृ सेवा संघ, सीताबर्डी, ह्यांनी बर्डी येथील इमारतीमधील वसतिगृहाचे नूतनीकरण करुन दिले. त्याबदल नंदनवन शाळा परिवार तर्फे विशेष आभार. तसेच जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नागपूर तसेच पालक, हितचिंतक व शाळा वसतिगृह येथील मुलांसाठी देणगीदार सतत मदत करतात. त्यांचेही आभार मानते. धन्यवाद.

## CRE (Continuing Rehabilitation Education)

Rehabilitation Council of India. New Delhi - तर्फे नोंदणी प्रमाणपत्रकारिता आवश्यक असलेले प्रशिक्षण कोव्हीड– १९ प्रादूर्भावामुळे खालील कर्मचाऱ्यांनी ऑन लाईन प्रशिक्षण घेतले.

१. सौ. शामली पाराशर, विशेष शिक्षक दि १० जून ते १२ जून २०२३
२. सौ. नीलिमा बेलसरे, समाज सेविका दि ०१ ते ०३ जूलै २०२३
३. सौ. नीलिमा बेलसरे, समाज सेविका दि १६ ते १८ नोव्हेंबर.
४. सौ. श्वेतांबरी गोजे, मानसशास्त्रज्ञ दि. १० ते १२ नोव्हेंबर पर्यंत
५. सौ. प्रिया मोहोड, विशेष शिक्षक दि. ०८ ते १२ डिसेंबर पर्यंत

**नंदनवन शाळा स्थायी समिती सभा**

मातृसेवासंघ नंदनवन दुर्बल मनस्क मुलांची शाळा, स्थायी समितीच्या एकूण ०४ सभा घेण्यात आल्या.

**दिव्यांग शिष्यवृत्ती**

सन् २०२२-२०२३ या शैक्षणिक सत्रामध्ये शाळेतील ३१ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे फॉर्म जिल्हा समाज कल्याण, जिल्हा परिषद नागपूर कार्यालय तर्फे भरण्यात आले. विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रत्येकी रु. १५००/- प्रमाणे कॅनरा बँक सीताबर्डी नागपूर येथे विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होते.

**समाज कल्याण कार्यालय भेटी**

१६ सप्टेंबर रोजी जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नागपूर तर्फे श्री. प्रल्हाद लांडे, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, श्री. सचिन रामटेके व श्री. प्रवीण मोंढे यानी शाळेला भेट दिली.

**पालक शिक्षक सभा**

१. दि १३.०४.२०२२ रोजी शाळेत पालक सभा घेण्यात आली

२. दि.२६ जुलै रोजी या प्रथम सत्राची पालक सभा घेण्यात आली. पालकांना दिशा प्रोजेक्ट संबधित माहिती देण्यात आली. वर्गातील सर्व पालकांना शिक्षकांनी समुपदेशन केले. दिशा प्रकल्प अंतर्गत वर्कशिट दिले.

या सर्व बाबी पालकांना वैयक्तिकरित्या बोलावून साध्य करण्यात आल्या, तसेच मुलांची वैयक्तिक प्रगती मुलांच्या वर्तन समस्या, या बद्दल पालकांना मार्गदर्शन केले.

३. दि.०३ फेब्रुवारी २०२३ शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या पालकांची सभा घेण्यात आली पालकांच्या समस्यांचे निराकरण केले. पालकांना समजेल अशा सोप्या भाषेत उपाय सुचविले.

**नंदनवन दुर्बलमनस्क मुलांची शाळा सीताबर्डी, नागपूर**
**देणगी एप्रिल २०२२ ते मार्च २०२३**

| देणगीदाराचे नाव | रक्कम | देणगीदाराचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|
| Excellon Software Pvt Ltd. | ५०००० | श्री कैलासनाथ हरिहरनाथ मुंशी | ११००० |
| सौ. शामली प्रतीक पाराशर | ५००० | श्री. निशीकांत चंद्रशेखर जोशी | ११०० |
| सौ. माधुरी रवींद्र कोल्हे | ३००० | श्री अशोक नानाजी हानुमंते | १००० |
| श्रीमती भावना नरहरी नंदनवार | ९५०० | सौ. माधुरी रवींद्र कोल्हे | १००० |

| | |
|---|---|
| श्री गोपाल के जयस्वाल | ४०००० |
| सौ. माधुरी रवींद्र कोल्हे | १५००० |
| सौ.छाया पुरुषोत्तम दुरुगकर | २५०० |
| सौ. शामली प्रतीक पाराशर | २५०० |
| सौ माधुरी रवींद्र कोल्हे | २५०० |
| सौ. आशा विजय पवार | २५०० |
| सौ. श्वेतांबरी निलेश गोजे | ५००० |
| सौ. वैशाली अरविंद कोरडे | २५०० |
| श्रीमती भारती रत्नाकर तुमडाम | २००० |
| नंदनवन शाळा कर्मचारी सीताबर्डी | ८००० |
| श्रीमती भावना नरहरी नंदनवार | २५०० |
| सौ. यश:श्री गजानन वाघ | २५०० |
| सौ. वैशाली पवन गायकवाड | २५०० |
| सौ. शुभांगी राजपाल बांगर | २५०० |
| नाईक, गोजे, रंगनाथ, तुमडाम, केणे, | |
| मारोतकर,घोडपागे, गोविंद मेश्राम,परतेकी, | |
| आटे,घायवट, नेवारे, माधुरी कोल्हे | |
| नंदनवन शाळा कर्मचारी | ३००० |
| श्री पराग सुभाष श्रृंगारकर | ५००० |
| सौ. छाया पुरुषोत्तम दुरुगकर | २५०० |
| सौ. शामली प्रतिक पाराशर | ५००० |
| सौ. शुभांगी राजपाल बांगर | |
| सौ. आशा विजय पवार | |
| श्री. मकरंद सुधीर नाईक | |
| सौ. वैशाली अरविंद कोरडे | १०००० |
| सौ. जयश्री केणे, सौ. रेखा मारोतकर | |
| श्रीमती निर्मला घेडपागे, श्री गोविंद मेश्राम | |
| श्री विकास परतेकी, श्री पराग आटे, | |
| श्री अनिल घयवट, श्री प्रभाकर नेवारे | |
| श्री भास्कर राउत, श्री सुनिल मेश्राम, | |
| श्री धर्मेंद्र दाभाडे नंदनवन शाळा कर्मचारी | १०५०० |
| डॉ. सुमंत करंड | २५०० |
| सौ. मेघा उदय रंगनाथ | ५००० |
| सौ. श्वेतांबरी निलेश गोजे | २५०० |
| सौ. छाया पुरुषोत्तम दुरुगकर | २५०० |
| सौ. आशा विजय पवार, सौ. माधुरी कोल्हे | ५००० |
| श्रीमती भावना नंदनवार, श्री गोविंद मेश्राम, | |
| सौ. शुभांगी गभने, सौ. रेखा मारोतकर, | |
| सौ. शुभांगी बांगर, सौ. वैशाली गायकवाड | ११००० |

| | |
|---|---|
| श्री पराग शरद श्रृंगारकर | २१००० |
| श्रीमती भावना नरहरी नंदनवार | २५०० |
| सौ. यश:श्री गजानन वाघ | २५०० |
| सौ. वैशाली पवन गायकवाड | २५०० |
| सौ. शुभांगी राजपाल बांगर | २५०० |
| श्री मकरंद सुधीर नाईक | २५०० |
| सौ. मेघा उदय रंगनाथ | २००० |
| सौ. माधुरी रवींद्र कोल्हे | ६००० |
| सौ. शुभांगी राजेश गभणे | २००० |
| श्री आनंद पांडुरंग सोवनी | ५००० |
| सौ. छाया पुरुषोत्तम दुरुगकर | २५०० |
| सौ. शामली प्रतिक पाराशर | २५०० |
| सौ. माधुरी रवींद्र कोल्हे | २५०० |
| सौ. शुभांगी राजेश गभणे | ३००० |
| श्री विकास तू. परतेकी | २००० |
| श्री लक्षण वठ्ठी | १५०० |
| सौ. माधुरी र. कोल्हे | ९००० |
| श्रीमती भावना नरहरी नंदनवार | २५०० |
| सौ. शुभांगी राजपाल बांगर | ११००० |
| सौ. यश:श्री गजानन वाघ | २५०० |
| सौ. मेघा रंगनाथ, सौ.श्वेता गोजे | |
| श्रीमती भारती तुमडाम, | |
| सौ. शुभांगी गभणे | |
| नंदनवन शाळा कर्मचारी | ८००० |
| प्रिती कालरा | २५०० |
| सुमित मंडल | ५००० |
| जयश्री, नागपूर | ५०० |
| श्रीकांत अपराजीत | ५०० |
| श्री अजय नामजोशी | १००००० |
| शारदा धिरणलाल सुखडिया | ३००० |
| श्री आनंद पांडुरंग सोवनी | ५५०० |
| नंदनवन शाळा कर्मचारी सीताबर्डी | ३९०० |
| श्रीमती भावना नरहरी नंदनवार | १५००० |
| सौ. मेघा उदय रंगनाथ | २००० |
| सौ. यश:श्री गजानन वाघ | ५००० |
| श्री मकरंद नाईक, सौ. वैशाली कोरडे | ५००० |
| नंदनवन शाळा कर्मचारी | |
| परतेकी, आटे, घायवट, नेवारे | |
| राउत, सुनिल मेश्राम, दाभाडे | ७००० |

| | |
|---|---|
| निर्मला घोडपागे, भारती तुमडाम, माधुरी | |
| कोल्हे, नंदनवन शाळा कर्मचारी | १०००० |
| नंदनवन शाळा कर्मचारी | ६००० |
| ट्रेनिंग कॉलेज नर्सिंग, इंदिरा गांधी हॉस्पिटल | १२७५ |
| सौ. यश:श्री वाघ, सौ. वैशाली गायकवाड | |
| सौ. आशा पवार, सौ.शुभांगी बांगर, | |
| श्री मकरंद नाईक नंदनवन शाळा कर्मचारी | १२५०० |
| डॉ. अलकनंदा शामराव सुपेकर | २००० |
| श्री पराग आटे, श्री अनिल घायवट, | |
| सौ रेखा मारोतकर, सौ.माधुरी कोल्हे | |
| श्रीमती निर्मला घोडपागे नंदनवन शाळा | ११००० |
| श्री प्रभाकर नेवारे | ७००० |
| सौ. यश:श्री वाघ, सौ.वैशाली गायकवाड | |
| सौ. छाया दुरुगकर, सौ. शुभांगी बांगर | १०००० |
| श्री मकरंद नाईक, सौ.हिरा गिरी, | |
| सौ. आशा पवार, श्री भास्कर राउत | ८५०० |
| श्रीमती भावना नरहरी नंदनवार | ५००० |
| सौ.मेघा रंगनाथ, श्रीमती भारती तुमडाम | |
| श्री गोविंद मेश्राम | १०००० |
| सौ. दुरुगकर, सौ. बांगर, सौ. पाराशर,पवार | १५००० |
| श्री आनंद पांडुरंग सोवनी | ५००० |
| श्री अरविंद जयस्वाल | ५००० |
| श्री आनंद पांडुरंग सोवनी | ५००० |
| सौ. मेघा रंगनाथ, सौ. श्वेतांबरी | ४५०० |
| सौ. माधुरी कोल्हे, सौ. शुभांगी गभणे | |
| श्रीमती भारती तुमडाम, सौ. जयश्री केणे | |
| सौ. छाया दुरुगकर, सौ. शामली पाराशर | |
| श्री गोविंद मेश्राम नंदनवन शाळा | १३००० |
| श्री आनंद पांडुरंग सोवनी | ५००० |
| सौ. मेघा रंगनाथ, सौ. श्वेतांबरी गोजे, | |
| सौ. वैशाली कोरडे, श्रीमती भारती तुमडाम | |
| नंदनवन शाळा कर्मचारी | ११५०० |
| श्री गोविंद मेश्राम, श्रीमती केणे, अनिल घायवट | |
| सौ. रेखा मारोतकर, श्रीमती निर्मला घोडपागे, | |
| सौ. शुभांगी गभणे, सौ. शामली चौहान, | |
| नंदनवन शाळा कर्मचारी | १३००० |
| श्री केशवराव आबाजी मंडलिक | २१००० |
| सौ. श्वेतांबरी गोजे, वैशाली कोरडे | १०००० |
| सौ वाघ, सौ गायकवाड, सौ कोल्हे | १०००० |

**एकूण ७१४७७५**

**प्रभारी मुख्याध्यापक, नंदनवन शाळा, नागपूर**

---

# मातृ सेवा संघ, नंदनवन दुर्बल–मनस्क मुलांची संरक्षित कर्मशाळा

**सीताबर्डी, नागपूर ( स्थापना – १९६०)**

**प्रकल्पाचे नांव** : मातृसेवासंघ, संचलित, नंदनवन संरक्षित कर्मशाळा, लक्ष्मीनगर, नागपूर

नंदनवन संरक्षित कर्मशाळा – प्रवेश १८ वर्षांपासून

मान्य संख्या – ४५ अनिवासी

नंदनवन कर्मशाळा – मुले २५ + मुली २४ = एकूण कर्मचारी ४९

निर्देशक – ०३ शिक्षकेतर कर्मचारी – ०६ एकूण कर्मचारी – ०९

**संस्थेचे ध्येय : मतिमंद मुलांचे शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसन –**

मतिमंद मुलांचे शिक्षण प्रशिक्षण व पुर्नवसन हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून ह्या शाळेची स्थापना करण्यात आली. ह्या शाळेत सुरवातीला विद्यार्थी संख्या अतिशय कमी होती. समाजाने दुर्लक्षिलेल्या मुलांसाठी शाळा काढून त्यांना दैनंदिन जीवन कसे जगावे व थोड्या प्रमाणात का होईना स्वावलंबी होऊन आर्थिक दृष्ट्या आईवडीलांना मदत करण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम करण्याचे कार्य गेली ५५ वर्षे ही संस्था करीत आहे.

ह्या संस्थेचे कार्य विशेषतः पालकांना दिलासा देणारे आहे. आपले विशेष मूल इतरांपेक्षा वेगळे असले तरी शाळेत जाऊन त्यांच्या बौद्धिक आणि शारीरिक क्षमतेनुसार शिकणार आहे ही आश्वासकता पालकांना समाधान देणारी आहे.

विशेष मुलांची बुद्धिगुण्य तपासणी शाळेत केली जाते. त्यासाठी शाळेत मानसशास्त्रज्ञ आहेत. बुद्धिगुण्य तपासणी झाल्यानंतर सिव्हील सर्जनचे प्रमाणपत्र मिळाल्यावरच शाळेत प्रवेश देण्यात येतो. विशेष मुलांचे शारीरिक वय, आय.क्यु. व इतर शारीरिक, भाषिक, सामाजिक विकास व सोबत दैनंदिन कार्य करण्याची क्षमता लक्षात घेवून त्यांचे वर्गीकरण करण्यात येते व त्यानुसार वर्गात प्रवेश देण्यात येतो.

कर्मशाळेत एकूण ०३ वर्ग आहेत. त्यामध्ये त्यांना फ्रेटवर्क, बुकबाईडींग, फाईल मेकींग, केनिंग, फिनाईल, भरतकाम, विणकाम, शिवणकाम, प्लेट मेकींग इत्यादी व्यवसाय शिकविले जातात, मुलांना त्यांच्या क्षमतेप्रमाणे शिक्षण लेखन, वाचन, सामान्य ज्ञान, चित्रकला, हस्तव्यवसाय शिकवले जातात. सकाळी ११ ते १२ या वेळात शैक्षणिक अभ्यास व १२ ते ४ या वेळात हस्तव्यवसाय शिकवले जातात. ४ ते ४.३० या वेळात पी. टी. खेळ, योगा, गाणे, सामुहिक उपक्रम शिकवले जातात. प्रकल्प अनुदानित आहे. शाळेत प्रशिक्षित शिक्षकवृंद, आहेत.

**कार्यक्रम –**

दरवर्षीप्रमाणे एप्रिल महिन्याची सुरुवात शाळेच्या वर्धापनदिनाने झाली. दि. १ एप्रिल शाळेची स्थापना झाली म्हणून या दिवशी सत्यनारायणाची पूजा. करण्यात येते. यावर्षी पूजा सौ. आशा पवार सर यांनी केली. सर्व कर्मचाऱ्यांना प्रसाद वाटण्यात आला. दि. १४/०४/२०२२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंतीचा कार्यक्रम घेण्यात आला. दि. ५ एप्रिल ते ७ एप्रिल २०२२ या काळात मुलांच्या वार्षिक परीक्षा घेण्यात आल्या व त्याचा निकाल दि. १९ एप्रिल २०२२ ला वार्षिक निकाल देण्यात आला. दि. १ मे २०२२ रोजी महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला.  दि. १०.०५.२०२२ पासून २५.०६.२०२२ पर्यंत उन्हाळी सुट्या होत्या.

दि. २७/०६/२०२२ पासून २०२२–२३ हे शैक्षणिक वर्ष सुरू झाले.

दि. १ ऑगस्ट २०२२ ला स्व. अण्णाभाऊ साठे यांची १०२ वी जयंती साजरी करण्यात आली तसेच लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

दि. ५ सप्टेंबर २०२२ ला शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

दि. २२/०९/२०२२ ला पालक सभेचे आयोजन करण्यात आले. पालक सभेकरीता ॲड. सुरेखा बोरकुटे उपस्थित होते.

दि. ०२/१०/२०२२ ला महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी केली.

दि. ०३/१०/२०२२ शस्त्रपूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

दि. १७/१०/२०२२ ते १८/१०/२०२२ या कालावधीत प्रथम सत्र परीक्षा घेण्यात आल्या.

दि. १७/०१/२०२३ रोजी जिल्हा स्तरीय स्पर्धा घेण्यात आली असून कर्मशाळेतील ०६ विद्यार्थ्यांनी खेळात भाग घेतला होता.

दि. २३/०१/२०२३ रोजी मा. अजय कडू यर यांनी मुलांची सहल सावनेर येथे इको पार्कला नेण्यात आली.

दि. २६/०१/२०२३ रोजी प्रजासत्ताक दिन कर्मचाऱ्यांमध्ये साजरा करण्यात आला.

दि. ०८/२/२३ वार्षिक स्नेहसंमेलन साजरे करण्यात आले. कार्यक्रमाकरीता उद्‌घाटक मा. डॉ. प्रियंका नारनवरे, समुपदेशक एस आर पी व प्रमुख पाहुणे मा. डॉ. मीनाक्षी गिरीश.

दि. २३/०३/२०२३ रोजी पालक सभेचे आयोजन करण्यात आले. मार्गदर्शनाकरिता मा. डॉ. जया शिवलकर व त्यांची संपूर्ण टीम यांनी दिव्यांग मुलांच्या रोजगाराबाबत तसेच मुलांच्या आरोग्य विषयक माहिती व वयात येणाऱ्या समस्या Good touch, Bad Touch यांनी चित्राच्या सहाय्याने मार्गदर्शन केले.

सन २०२२-२३ या सत्रात मुलांनी तयार केलेल्या वस्तु रुपये १२,३१०/- ला विकल्या.

**सन २०२२-२३ ची देणगी**

| | |
|---|---|
| मा. शशिकांत दलाल - ५,०००/- | मा. आनंद पांडुरंग सोवनी - २,०००/- |
| मा. श्री एस एस रंजन - १,०००/- | मा. डॉ. अभिरामजी परांजपे - २,०००/- |
| मा. शैलेजा पोफळी - ५,०००/- | मा. आनंद पांडुरंग सोवनी - ६,०००/- |
| मा. श्री दारुवाला - ५,०००/- | मा. प्रगती भुजाडे - ५,०००/- |
| मा. मनीषा बोडेकर - ५,०००/- | मा. मंजुषा साठे - ५,०००/- |
| मा. रेखा दंतुलवार - १,०००/- | मा. सिद्ध हनुमान मंदिर पंच कमिटी - ५,०००/- |

**प्रभारी अधिक्षक**
**नंदनवन संरक्षित कर्मशाळा मातृसेवासंघ,**
**लक्ष्मीनगर, नागपूर**

---

# मातृसेवासंघ, पंचवटी आश्रम, उमरेड रोड, नागपूर

**स्थापना - १९६१**

मातृसेवासंघ सीताबर्डी, पद्मश्री के. कमलाताई होस्पेट यांच्या शतकपूर्ती उत्सवाने साजरा झालेल्या सूतिकागृहाचे १०२ वे शतक पूर्ण झाले, त्यांची एक प्रवृत्ती पंचवटी वृद्धाश्रम आज आपला ६२ व्या वर्षीचा अहवाल सादर करीत आहे आणि हा २०२२-२३ अहवाल सादर करीत आहे.

स्त्रिया मुले व विविध प्रकारची सेवा हे कार्य कमलाताईनी व त्यांना सहकार्य करणाया सर्व सेविकांचे आधार असणारा हा पृध्दाश्रम ६ गोव्हेंबर २०१३ रोजी ६३ या वर्णत

पदार्पण करीत आहे. आज अहवाल काळी आश्रमात राहणात्या श्री व पुरुषांची संख्या कमी झाली आहे. दानित ३४ व अनुदानित ११ अशी एकूण ४५ व श्यांना सेवा देणारे ९, व्यक्ती आहे, आयमात राहणारे जेष्ठ नागरिक साधारण ७५ ते ९० या वयोगटातील आहेत तरीही आनंदाने वा ठिकाणी शेवटचे क्षण घालवित आहेत. समाजाचे भरपूर सहकार्य व आधमाने आजवर केलेली जनतेची सेवा या निकषावर देणगीदार आश्रयदाते, मातृसेवासंघाची कार्यकारिणी यांच्या सहकार्याने आश्रम वाटचाल करीत आहे.

आश्रमात राहण्याची व्यवस्था उत्तम प्रकारची आहे. आश्रमवासीयांना स्वतंत्र रूम, शेअर रूम, तसेच हॉल उपलब्धआहे. स्वतंत्र भोजनवास्तु आहे. येथे दोन वेळेचा चहा, दोन वेळाचे जेवण व एक वेळेचा नाश्ता देण्यात येतो. तसेच महिन्यातून ८ ते १० गोड जेवणं बाहेरील दात्याकडून देत असून परिसरात श्रद्धालु भक्तासाठी श्रीराम मंदिर आहे. हॉलमध्ये टीव्ही व वाचनासाठी वर्तमानपत्रे व धार्मिक पुस्तकेहि आहे. कोरोनापूर्वी डॉ. राठी आठवड्यातून एकदा आश्रमाला भेट देतात. सर्व ज्येष्ठ नागरिकांची आरोग्याची निःशुल्क तपासणी करतात.

आश्रमात सर्व प्रकारचे धार्मिक तसेच राष्ट्रीय सण साजरे करण्यात येतात. गुढीपाडवा ते श्रीरामनवमीचा उत्सव आश्रमात आनंदाने साजरा करण्यात आला. सौ मंगला देशकर यांच्या कीर्तनाने रामनवमी उत्सव पार पाडण्यात आला. उत्सवात अध्यक्ष डॉ. अरुणाताई बाभुळकर व कोषाध्यक्ष सौ. वृषालीताई देशपांडे उपस्थित होत्या. उत्तरवारताईंनी श्रीरामा समोर फुलांनी छान सजवून रांगोळ्या काढून सर्वांना आनंद व उल्हासात ठेवले. आश्रमातील वृद्धांनी तसेच आजुबाजूच्या परिसरातील येणाऱ्या व्यक्तींनी भजने गाईली. श्रीरामाचा पाळणा, आरती व प्रसाद वितरण करून श्रीरामनवमीचा उत्सव आनंदात साजरा करण्यात आला. १५ ऑगस्ट व २६ जानेवारी, गणेशस्तोव, नवरात्र दिवाळी सण साजरा करण्यात आला.

कै. कृष्णाताई भावे व लेले परिवार पुरस्कृत संस्थापिकाद्वय पुरस्कार कार्यक्रम या वर्षी दि. १५.११.२२ रोजी सकाळी १० वाजता पंचवटी वृद्धाश्रम येथे संपन्न झाला. कार्यक्रमाला श्री. प्रभाकरराव मारपकवार, बी.ए. एलएलबी. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. दरवर्षी होणारा १५ नोव्हेंबरचा संघाच्या संस्थापिका कै. कमलाताई होस्पेट व कै. वेणूताई नेने जयंती तसेच होते. या वर्षीचा पुरस्कार ‘लवादा बाबू केंद्र’ येथील डॉ. निरुपमा सुनील देशपांडे यांना प्रदान करण्यात आला. पुरस्काराची सर्व व्यवस्था लेले व भावे परिवाराने सांभाळली. मातृ सेवा संघाच्या अध्यक्षा, सचिव, कोषाध्यक्षा यांच्या सहकार्याने उत्तमप्रकारे कार्यक्रम पार पाडण्यात आला.

आश्रमात १९६३ साली बांधलेली विजया विलास कुटी तसेच १९८५ मध्ये ५ वृद्धांनी राहण्याकरिता बांधलेल्या निवास खोल्या जीर्ण व भिंतीला भेग्या पडलेल्या २ इमारती पाडण्यात आल्या. त्या ठिकाणी नवीन सुविधायुक्त वृद्धांना राहण्यासाठी ब्लॉक बांधायचे आहे. नवीन ब्लॉक बांधायच्या जागेचे भूमिपूजन दि. १६.०२.२०२३ रोजी अध्यक्ष डॉ.

अरुणाताई बाभुळकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष डॉ. अरुणाताई बाभुळकर, सचिव डॉ. लताताई देशमुख, कोषाध्यक्ष सौ. वृषालीताई देशपांडे व सहसचिव सौ. ममता चिंचवडकर, कार्यकारिणी सदस्या डॉ. रत्ना शेखावत उपस्थित होत्या. विधिवत भूमिपूजन, पूजा पंडित श्री. प्रसाद जोशी यांच्याकडून करण्यात आली.

आश्रमात फ्रेन्डन्डशिप डे, व्हेलनटाईन डे, वुमन्स डे, साजरा करण्यात आला. व्हेलनटाईनडेला तरुण श्रीवास्तव व त्यांचा चमुने मनोरंजनाचा कार्यक्रम घेतला ८ मार्च ला वुमन्ड डे ला हॉटेल प्राईड यांनी मनोरंजनाचा कार्यक्रम घेतला. आश्रमामध्ये रोज संध्याकाळी ४ ते ५ पर्यंत रामरक्षा, भजन, मारोती स्तोत्र होत असतात. यात आश्रमवासी सहभागी होतात.

**अहवाल वर्षात इतर झालेले कार्यक्रम प्रमुख कार्यक्रम**

२१.८.२२ मेसानिक लाजतर्फे श्री. साहू आणि चमू कडून आरोग्य तपासणी शिबीर देण्यात आले.
२२.८.२२ रोटरीक्लब तर्फे डोसा व अन्नदान
१.९.२२ श्री. अग्रवाल तर्फे सत्संग व नाश्ता
७.९.२२ 'स्वरानंद' तर्फे संगीत रजनी चा कार्यक्रम
२२.९.२२ हेल्पेज इंडिया व एच डी एफ सी तर्फे मनोरंजन कार्यक्रम व भोजन
२६.९.२२ नवरात्रोत्सवात श्री. लेंडे तर्फे ९ दिवस अन्नदान
२७.९.२२ विभावरीताई कुलकर्णी, रघुजीनगर यांचे तर्फे भजन
२.१०.२२ रोटरी क्लब तर्फे गरबाचे आयोजन
८.१०.२२ श्रीमती खडक्कार यांचा संगीत कार्यक्रम
१४.१०.२२ राजे भोसले तर्फे 'कादर' यांचा गाण्याचा कार्यक्रम घेण्यात आला.
२.११.२२ लोकमत तर्फे मनोरंजनाचा कार्यक्रम व अन्नदान
७.१.२३ श्री. विजय श्रीवास्तव व चमू तर्फे संगीत संध्या कार्यक्रम
१४.१.२३ श्री. विजय श्रीवास्तव तर्फे कोराडी ट्रीप आयोजित केली होती.
१८.२.२३ महाशिवरात्रीच्या दिवशी 'प्रहारगड' येथे शिवजींचे दर्शन जेष्ठ नागरिकांनी घेतले.
१८.२.२३ श्री.व सौ. घाटे (वाशी) निरुपम क्रिएशन तर्फे जनाबाई/मीराबाई यांच्या ओव्यावर नृत्य नाटिका सदर करण्यात आली.

यावर्षी रोख व चेकस्वरुपात आश्रमाचा १७,१४,११८/- देणग्या प्राप्त झाल्या. यात प्रामुख्याने खालील देणग्यांचा समावेश आहे.

श्रीमती किशोरीताई देशपांडे रु.१,००,०००/- श्रीमती कुसुम एम. डवले रु.१,००,०००/-
श्री. अरुण चौधरी रु. १,००,०००/- अशोक जनार्दन बिडवाई रु. ५१,०००/-

कै. कमलेश कृष्णराव हरगुडे स्मृतीप्रीत्यर्थ रु. ५०,००१/-

श्रीमती उमाताई काळे रु.५०,०००/-प्रोविन्सीअल लाइफस्टाईल रिटेल सर्विसेस२५,०००/-

याचप्रमाणे आश्रमाला धान्य रूपाचे भरपूर प्रमाणात देणग्या मिळत असतात. तसेच वस्तुरूपाने देणग्या मिळत असतात.

**वस्तुरूप देणग्या :**

यशोदाबेन दयाभाई पटेल – कुलर १

कै. सौ छाया घाटे स्मृतीप्रीत्यर्थ – गोदरेज कपाट मिडल साईज – ३

श्री. फुलझेले – गोदरेज कपाट मिडल साईज –१

श्री. मोहम्मद नसीम – १ हॉर्स पावर पाणी मशीन

एच डी एफ सी सेल्स १० प्लास्टिक खुर्च्या

बैंक ऑफ बडोदा, नंदनवन शाखा – तीन सिटर लोखंडी बेंच – २

रोटरी क्लब, मेन – ३० प्लास्टीक खुर्च्या

आशुतोष यावलकर – ३ इमरजन्सी लाईट

कै. सिंधुताई पोटले स्मृतीप्रित्यर्थ – ४ इमरजन्सी लाईट

श्री. पटवर्धन – अलुमिनियम शिडी व टाप

श्री. मंगेश पेंडके – मोठे चहा कॉफी चे कंटेनर

जय श्रीराम

गॅस सिंगल बर्नर

श्री. बन्सल गांधीबाग – स्पीकर साऊड सिस्टम

श्री. नारायणदास किसनदास झंवर – माईक सिस्टम

श्री. अनिलजी गुप्ता – व्ह्यॅकूम क्लीनर

एनोवा कंपनी – वाटर कुलर व वाटर प्यूरीफायर

श्री. चव्हान – जुना चालुस्थीतीतील टी.व्ही.

सौ. जयश्री फुके – एक्झॉस्ट पंखा

सहानी ताई – कुलर १

श्री. सुभाष भाऊ पौनीकर – कुलर २

श्री. तुषार अविनाश डांगे – १ कुलर

श्री. विश्वनाथ भोईर, आमदार कल्याण – किराणा ३५ हजार

यशोदाबेन दयाभाई पटेल – कुलर १

छाया घाटे स्मृतीप्रित्यर्थ – गोदरेज कपाट मिडल साईज – ३

फाऊंडलींग होम बंद झाल्यामुळे तेथील सीसीटीव्ही कॅमेरा व एनव्हेटर पंचवटी वृद्धाश्रमाला भेट देण्यात आले.

सोलर पॅनल लागले आहे ते एमएसीबीच्या मिटरला जोडायचे कार्य पूर्ण करण्यात आले आहे. जेणेकरून आश्रमाला वीजेचे बिल कमी प्रमाणात येईल. ड्रेनेजलाईन व पावसाळी पाणी निचरा व्यवस्थापनाचे काम सुरू आहे. श्री. राजूरकर यांच्याशी या कामाचा ठराव झालेला आहे. लवकरच काम पूर्ण होईल, सद्दस्थितीत आश्रयात येणाऱ्या समस्यामध्ये पाणी समस्या महत्त्वाची आहे. उन्हाळ्यात विहीरीच्या पाण्याची पातळी खूप खाली जात असल्याने पाणी पुरत नाही. दररोज टँकरची आवश्यकता असते. नगरसेवक श्री पिंटु झळके व इतर माननीय देणगीदार व एन. एम. सी. अधिकारी टँकर उपलब्ध करून देण्यास मदत करतात. नवीन बोअर खोदण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तसेच जकातेंच्या मागील बाजूची विहीर स्वछ करून व बाजूनी खचली आहे ती बांधून तिचा उपयोग करता येईल. सध्या त्या विहिरीचे पाणी वापरण्यायोग्य नसल्यामुळे बांधकामासाठी या पाण्याचा उपयोग करण्यात येत आहे. अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष डॉ. वृषालीताई देशपांडे, डॉ. पुष्पाताई भावे, डॉ. रत्नाताई शेखावत मधुनमधून आश्रमाला भेट देत असतात. तेथील स्वच्छता इमारतीचे नुतनीकरण व इतर आश्रमाला येणाऱ्या इतर समस्यांसाठी योग्य सल्ला व मार्गदर्शन करतात. आश्रमाला सर्वप्रकारे मदत करणाने देणगीदार सेवाभावी वृत्तीने मदत करणाऱ्या सर्व हितचिंतकांना हार्दिक शुभेच्छा. मातृ सेवा संघाचे अध्यक्षा, सचिव आणि कोषाध्यक्ष तसेच कार्यकारिणीचे सहकार्य नेहमीचे आश्रमाला असते. यांच्या मदतीनेच आश्रम सुचारूपाने वाटचाल करीत आहे. या सर्वांना शुभेच्छा.

**विभा टिकेकर, व्यवस्थापिक, पंचवटी वृद्धाश्रम, उमरेड रोड, नागपूर**

---

# मातृसेवासंघ, मातृसेवा मासिक

**स्थापना – १९६६**

आपल्या ह्या मातृसेवा मासिकाला सुरुवात होऊन ५६ वर्ष पूर्ण झालीत. आता ५७ वे वर्ष सुरू आहे. आमचे हे लहानसे मासिक आत्तापर्यंत अगदी नियमित सुरू आहे. सगळ्यांना माहितच आहे की सध्या खूपच महागाई बाढत आहे. त्यामुळे तिची झळ मासिकालाही लागली आहे. छपाईचे आणि कागदाचे दरही वाढलेले आहेत. अर्थातच त्याचा परिणाम आमच्या मासिकावरही झाला.

मी ६–७ महिन्यांपूर्वी देणग्या मिळवण्यासाठी आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद मिळालेला आहे. ज्यांनी भरघोस प्रतिसाद दिला ते – श्रीमती शीला कऱ्हाडे विक्रोळी, आशा कुलकर्णी डिट्राइट मिशिगन, वासन्ती आळशी – व्हिएन्ना, व्हर्जिनिया, डॉ. मोहन श्रीखंडे, मिशिगन, अंजली बापट पुणे असे आहेत. इतरही बऱ्याच लोकांनी लहान–मोठया प्रमाणात देणग्या दिल्या आहेत. या कारणाने आमची आर्थिक परिस्थिती थोडीशी सावरलेली आहे. पण अजूनही आम्हाला मदतीची गरज आहेच. आपल्याला माहित आहेच मी ह्या मासिकाची सहावी संपादिका आहे. मला हे काम सांभाळून आता दीड वर्ष झाली आहेत.

मासिक अगदी माफक दरात दिले जाते. आमचा प्रयत्न मासिक अधिक वैविध्यपूर्ण, मनोरंजक आणि स्त्रियांसाठी उपयोगी करण्याचा आहे. पण ज्या उद्देशाने याची निर्मिती झाली ते म्हणजे सर्व शाखांनी जास्त उत्साहाने यात सहभाग घ्यावा आणि सक्रिय रहावे; तो उद्देश सध्या सफळ झालेला दिसत नाही. तेव्हा माझी अशी सर्व शाखांना विनंती आहे की हे आपले सगळ्यांचे मासिक आहे. तेव्हा यात मनमोकळेपणाने सहभागी व्हा. तुमच्या शाखेची माहिती, कार्यक्रमाचे रिपोर्ट पाठवा.

२०२२-२३ ह्या कालावधीत आम्ही काही महत्त्वाचे अंक काढले. नोव्हेंबर २०२२ चा अंक जो कमलाताई कशा घडल्या, त्यांची पार्श्वभूमी काय होती हे सांगण्याचा प्रयत्न केलेला होता. आज मार्च २०२३ च्या अंकात नागपूरातील प्रत्येक महिला आणि काही आपल्या कर्तृत्वाने प्रसिद्धीची वाटचाल करीत असलेल्या महिलांचा थोडक्यात परिचय देण्याचा प्रयत्न केला आहे.

आपल्या सहकार्याशिवाय आम्हाला काहीच करणे शक्य नाही. तेव्हा त्याची नेहमीच अपेक्षा आहे आम्ही तुम्हाला कधीही निराश करणार नाही याची खात्री देते आणि विराम पावते.

**मासिकाची स्थायी समिती**

| | |
|---|---|
| १. डॉ. अरुणा बाभुळकर - अध्यक्ष, | २. डॉ. लता देशमुख-सचिव |
| ३. श्रीमती शीला राव - संपादिका, | ४. श्रीमती वनिता पाटील - आमंत्रक |
| ५. सौ. ममता चिंचवडकर | ६. सौ. यश:श्री वाघ |
| ७. श्रीमती सुरेखा देवघरे | ८. श्रीमती शोभा पारळकर |

**संपादिका - श्रीमती शीला राव,**
**मातृसेवा मासिक, नागपूर**

---

# मातृसेवासंघ, फाऊंडलिंग होम, मेडीकल कॉलेज व हॉस्पिटल, नागपूर

**स्थापना - १९७१**

मातृ सेवा संघ, स्त्रिया व मुलांच्या क्षेत्रात काम करणारी विदर्भातील अग्रगण्य संस्थेने शतकोत्तरी पुर्ण केलेली आहे. या निमित्ताने वर्षभर आरोग्यविषयक शिबिरे व निरनिराळे कार्यक्रम संस्थेमार्फत राबविण्यात आलेत. निरनिराळे कार्यरत प्रकल्प समाजसेवेच्या क्षेत्रात आपली सेवा देताहेत. फाउंडलिंग होम हा दत्तकसेवा प्रकल्प त्यापैकी एक. फाऊंडलिंग होमची स्थापना डॉ. सत्यबाला तायल यांच्या प्रेरणेने झाली. त्यांच्या प्रयत्नांनी मेडीकल हॉस्पीटलमध्ये फाऊंडलिंग होमला जागा मिळाली. मातृसेवासमाजकार्य विद्यालयातील तत्कालीन प्राध्यापिका श्रीमती उषा संत यांचे सहकार्य व योगदान या प्रकल्पाला लाभले. फाऊंडलिंग होमला यंदा ४१ वर्ष पूर्ण झाले आहे. या ४१ वर्षात एकूण ६७३ मुलाचे दत्तक विधान करुन त्यांचे पुनर्वसन करण्यात आले. अहवाल वर्ष २०२२-२३ मध्ये एकूण ०४ मुलाना दत्तक दिलेले आहे.

फाऊंडलिंग होमला ० से ६ वयोगटातील १० मुलांना ठेवण्याची राज्यशासनाची विशेष दत्तक संस्था म्हणून मान्यता मिळाली आहे.

**संस्थेतील उपस्थित मुलांची आकडेवारी**

**वर्ष २०२२–२०२३**

| **क्र.** | | **मुलगे** | **मुली** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| १. | मागील वर्षातील शिल्लक | ०४ | ०४ | ०८ |
| २. | ३१ मार्च २०२२ पर्यन्त फॉस्टर केअरमधे असलेली बालके | ०१ | -- | ०१ |
| ३. | बाल कल्याण समिती आदेशानुसार भरती झालेली | २ | ३ | ५ |
| | **एकूण** | **७** | **७** | **१४** |

संस्थेत उपस्थित १४ मुलांचा सांभाळ, संगोपन, उत्तमप्रकारे करण्यात आले. मुलं संस्थेत भरती झाल्यावर २४ तासाच्या आत त्याची तपासणी करून आवश्यक वाटल्यास उपचार केले जातात. मेडीकल हॉस्पीटलच्या निरनिराळ्या विभागातील डॉक्टर्सची आम्हाला खुप मदत मिळते. मेडीकल हॉस्पीटलचा बालरोग विभाग, ऑक्युप्रेशनल थेरपी, सर्जरी आर्थो, या सर्वच डॉक्टरांची विशेष मदत मिळते. तसेच संस्थेच्या बालरोग तज्ञ डॉ. सीमा पांडे आठवडयातून २ वेळा येऊन मुलांची तपासणी करतात. मुलांचे लसीकरण त्रैमासिक मुल्यमापन, या कामात त्यांची मोलाची मदत मिळते. मुलांना आहार, स्वच्छता या विषयी आयांना त्या वेळोवेळी मार्गदर्शन करतात. सस्थेतील बाल रोग विभागातील डॉक्टर्स व कर्मचारी याचीही आम्हाला खुप मदत मिळते.

कमी वजनाचे बाळ प्रकल्पात आल्यास सुरवातीला वजन वाढेपर्यन्त मातृ सेवा संघ, सीताबर्डी येथील नवजात शिशु कक्षात बाळाला ठेवले जाते. तेथील कार्यरत बाल रोग तज्ञ, संस्थेद्वारे मुलासाठी सेवा देतात. तेथील परिचारिका, आया याचीही मुलांच्या संगोपनात विशेष मदत मिळते. डॉक्टर शैलेंद्र मुंधडा अल्पदराने मुलांच्या रक्त तपासण्या करुन देतात, डॉ. विजयालक्ष्मी गुप्ता अगदी अल्प मुलांची बेरा टेस्ट करून देतात. डॉ. उदय माहुरकर अगदी अल्प दरात मुलांचा इको करून देतात.

मुलाचा सांभाळ, संगोपन, यासाठी ३ आया व ४ रोजंदारीवर आया २४ तास कार्यरत असतात. प्रकल्पातील परिचारिका, आया सर्व कर्मचारीवर्ग अनुभवी, प्रेमळ व आपल्या कामात तत्पर असल्यामुळे मुलांच्या सर्वांगीण विकासात त्याची मोलाची मदत मिळते. मुलांच्या संगोपनाबरोबरच त्यांच्या भविष्याचा विचार करून, मूल दत्तक देण्यासाठी कायदेशीररित्या मुक्त झाल्यावर दत्तकाची कारवाई केली जाते. त्याचे पुनर्वसन केले जाते.

कारा मार्गदर्शक तत्त्वानुसार दत्तकाची सर्व प्रकिया ऑनलाईन आलेली आहे. दत्तकेच्छु पालक ऑनलाईन रजिस्टर होतात. होमस्टडी रिपोर्टसाठी त्यांनी आपल्या संस्थेची

नोंद केली असल्यास, त्यांची कागदपत्राची छाननीकरून त्याच्याकडे गृहभेट देउन सर्व माहितीची पडताळणी करुन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी याच्याकडून साक्षांकीत झालेला अहवाल ऑनलाईन अपलोड केला जातो. गृहभेट केलेल्या पालकांना ऑनलाईन प्रक्रियेतून बाळ मिळाल्या नंतर, दत्तकोत्तर त्या मुलांचा दर ६ महिन्यानी असे ४ चार फॉलोअप केले जातात. एकदा व्हिझीट करून १६ होम-विझिट पूर्ण झाल्यात. ८ फॉलोअप विझिट पूर्ण झाल्यात.

संस्थेतील बाळ दत्तकासाठी मुक्त झाल्यावर, त्या बाळासंबंधीचा मेडीकल रिपोर्ट व चाईल्ड-स्टडी रिपोर्ट ऑनलाईन अपलोड केला जातो. ऑनलाईन प्रक्रियेतून पालकांनी बाळासबंधी स्वीकृती दाखविल्यास, ॲडॉप्शन कमिटीच्या मिटींगमध्ये त्या पालकांना स्वीकारले वा नाकारले जाते. दत्तकेच्छु पालक त्या बाळासाठी योग्य असल्यास, बाळ त्यांना दाखवून त्यांनी स्वीकारल्यास त्यांना फॉस्टर केअरमध्ये दिले जाते व पुढील २ महिन्यात दत्त्काची कारवाई पूर्ण करून, जन्मतारखेचा दाखला मिळतो.

**पुनर्वसन झालेल्या मुलांची सांख्यिकी माहिती**

**वर्ष २०२२ २०२३**

| अ.क्र. | | मुले | मुली | एकुण |
|---|---|---|---|---|
| १. | फॉस्टर केअरमध्ये | १ | १ | ०२ |
| २. | भारतात दत्तक | २ | ० | ०२ |
| ३. | परदेशी दत्तक | -- | २ | ०२ |
| ४. | मुळ पालकांना परत | -- | २ | ०२ |
| ५. | इतर संस्थेत स्थानांतरीत | ४ | ४ | ०८ |
| ६. | मृत्यु | -- | -- | -- |
| ७. | ३१ मार्च २०२३ रोजी प्रकल्पात उपस्थित | -- | -- | -- |
| | **एकूण** | **७** | **७** | **१४** |

यावर्षी उपस्थित एकूण १४ मुलांपैकी २ बालक देशात दत्तक दिली. २ बालीका परदेशात दत्तक दिल्या. संस्थेत सध्या २ बालिका व १ बालक असे तिघांना अनैतिक मानवी प्रतिबंध कक्ष गुन्हे शाखा नागपूर यांनी दाखल केले आहे.

**संस्थेत सध्या उपस्थित मुले**

| | | |
|---|---|---|
| १. | विशेष काळजीची गरज | ०२ |
| २. | अनैतिक मानवी प्रतिबंध कक्ष गुन्हे शाखा नागपूर | ०४ |
| ३. | नॉर्मल | ०१ |

डेव्हलपमेंटडिले असलेल्या बालकाला बाल कल्याण समिती, नागपूर यांच्या आदेशानुसार, तो ८ वर्षाचा पूर्ण झाल्यामुळे सर कस्तुरचंच जागा बालसन, बालभूत कामती

येथे स्थानांतरीत केले. विशेष काळजीची गरज असलेली बालीकेची परदेशात दत्तक प्रक्रिया पूर्ण होवुन दत्तक दिले. जन्मतः कभी वजनाचे बाळ सुरवातीला वजन वाजेपर्यंत एक महिना मेडिकलच्या ओपीडीत में दिज्ञ महिना गातू सेवा संच, सिताबडी येथील नवजात शिशु कक्षात बाळाला ठेवले होते.

४१ वर्षापासून प्रकल्प विचाअनुदान तत्वावर चालू आहे. विशेष काळजीची गरज असलेल्या ० ते ६ मुलांसाठी शासनमान्य संस्था नाही त्यामुळे अशी बालके बाल कल्याण समितीसमोर आल्यास दत्तक संस्थामध्येच त्यांना भरती केले जाते. एका मुलाला विशेष शिक्षणाची गरज असल्यामुळे त्यालाही ऑक्युपेशनल विभागातील विशेष शिक्षकांकडे नियमीत पाठवित होतो.

या सर्व कामात मातृसेवा संघ, अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष, उपाध्यक्षा, फाउंडलिंग होमच्या सल्लागार, स्थायी समितीचे सदस्य यांच्याकडून मार्गदर्शन मदत व प्रोत्साहन मिळते. संघातील ऑफीस स्टॉफ, यांचीही खूप मदत मिळते

**विशेष भेटी**

२०/०५/२०२२ तारखेस जिल्हा महिला बाल विकास अधिकारी अचानक भेट देउन प्रकल्पाच्या कामाची पाहणी केली व काम व्यवस्थित होत असल्याचे नमूद केले, जिल्हास्तरीय तपासणी समितीद्वारा १६/०९/२०२२ रोजी तपासणी करण्यात आली. तसेच दर महिन्याला जिल्हा बाल कक्षा द्वारा ३ वेळा, बाल कल्याण समितीद्वारा ३ वेळा, जेजेबी इ.च्या भेटी झाल्या.

**आर्थिक मदत व अनुदान**

**यंदाच्या वर्षात धान्यस्वरूपात व वस्तुस्वरूपात मिळालेली मदत**

यावर्षात दात्याकडून ५८ कि. तांदुळ, ३०.कि फणिक ३९ कि. तुरडाळ, २३ कि. मुगडाळ, १८ कि तेल, ९ कि.साखर, १० कि गुळ मिळाले. बेबी डायपर मिळाले. काटकर परिवार यांच्याकडून सप्टेंबर महिन्यात तांदूळ, डाळ या व्यतिरीक्त खजूर, जाड पोहे, रवा, राजगिरा लाडू, सत्तू, बिस्किट, तूप या वस्तुही मिळाल्या. कुणाल चिंचखेडेने शेगदाणा चिक्की, राजगिरा लाडू, बिस्किट, चॉकलेट, पेंडखजुर या वस्तुः दिल्या. प्रतिक्षा मेश्राम यांच्याकडून मुलांसाठी पैसे रूपात मदत मिळाली. पंचवटी वृद्धाश्रमाकडून वेळोवेळी धान्याची मदत मिळते. डॉ. शेखावत मॅडमकडून खुर्ची, २ वॉकर, १ फिडींग खुर्ची, गुडगुडी, १ टेन्ट व छोटी-छोटी मुलांना खेळण्यायोग्य खेळणी मिळालीत.

लॉयन्स क्लब ऑफ नागपूर लिजंटने प्रकल्पाला एक मोठा कुलर व मुलांसाठी औषधे दिलीत. रोटरी क्लब ऑफ नागपूर नॉर्थ कडून किराणा सामान मिळाले. जॉयंट ग्रीन सिटी यांच्याकडून जमा निधी ११,००० रू प्रकल्पाला दिला.

आर्थिक मदत मिळविण्यासाठी अध्यक्ष व सचिव सतत प्रयत्न करीत असतात. वस्तूरूपातील मदतीपेक्षा पैशाच्या स्वरूपातील मदतीची जास्त आवश्यकता प्रकल्प चालवण्यासाठी आहे.

**विशेष बाब**

बुधवार दि. ९ नोव्हेंबर २०२२ रोजी दुपारी ३ वाजता मातृ सेवा संघ कार्यकारणीची तातडीची सभा घेण्यात आली. सभेत मातृ सेवा संघाद्वारे चालविण्यात येणारी फाउंडलिंग होम (शिशुगृह) प्रवृत्ती बंद करण्याविषयी निर्णय घेण्यात आला.

मा. सचिवांनी सभेपुढे विषय ठेवला. तसेच (शिशुगृह) फाउडलिंग होम च्या दि. ७.११.२०२२ रोजी झालेल्या स्थायी समितीत झालेली चर्चा सभेपुढे मांडली.

१९८२ सालापासुन मातृ सेवा संघ फाउडलिंग होम ही प्रवृत्ती कायम विना अनुदानित तत्वावर चालत आहे. ही प्रवृत्ती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील वॉर्ड नं. ३३ व ३४ जवळ कार्यरत आहे. सुरुवातीपासुन या प्रवृत्तीला देशात व परेदशात बाळाला दत्तक देण्याचा परवाना आहे.

काळाची गरज बघता त्यावेळेच्या अधिष्ठातांनी माता व बालकांच्या सेवेला समर्पित मातृ सेवा संघासारख्या संस्थेला जागा दिली होती. म्हणजे फाउडलिंग होमच्या जागेची मालकी मातृ सेवा संघाची नाही.

आजतागायत मातृ सेवा संघाने या प्रवृत्तीला यशस्वीरीत्या ४१ वर्षे चालविले. सद्य परिस्थितीत फाउंडलिंग होम मध्ये १० मुले आहेत. त्यापैकी २ मुलांची दत्तक प्रक्रिया सुरू आहे. काळजी व संरक्षणासाठी असलेली मुले बरेचदा संस्थेत मोठी होतात. अश्या वेळेस त्यांची संपूर्ण जबाबदारी संस्थेची असते. त्यांचा शारिरीक, मानसिक विकास व मूलभूत गरजा म्हणजेच आरोग्य, शिक्षण, आहार, सांभाळ इ. पूर्ण करतो. दिवसेंदिवस संस्थेला आर्थिक अडचणींना समोर जावे लागत आहे.

त्याविषयी कार्यकारीणीत विस्तृत चर्चा झाली. त्यात खालील गंभीर मुद्दे समोर आलेत.

१. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामार्फत सतत जागेबद्दल विचारणा होत असते. कारण ती जागा मातृ सेवा संघाची नाही. २. मानधनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्याच्या ही समस्या उद्भवतात.

करिता ही प्रवृत्ती लवकरात लवकर म्हणजेच ३१ मार्च २०२३ पर्यंत बंद करण्याचा निर्णय सर्वानुमते सभेत घेण्यात आला.

वरील बाबींचा विचार करता सचिवानी तातडीने केंद्रिय दत्तक ग्रहण संसाधन प्राधिकरण दिल्ली, जिल्हा महिला बालविकास आयुक्तालय पुणे, जिल्हा महिला बालविकास अधिकारी नागपूर, बाल कल्याण समिती नागपूर ह्यांना कळविले.

वरील ठरावास सर्व कार्यकारिणी सदस्यानी मंजूरी दिली.

प्रकल्प बंद करीत असल्यासंबंधी सर्व संबंधीत शासकीय कार्यालयांना पत्राद्वारे यापूर्वीच कळविले आहे. त्यानुसार प्रकल्पातील उपस्थित ७ मुलांना फेब्रुवारी महिन्यात बाल कल्याण समिती, नागपूर यांच्या आर्देशानुसार इतर दत्तक संस्थामध्ये स्थानातरीत करण्यात आले आहे.

# स्थानांतरीत केलेल्या लाभार्थींच्या नावाची यादी

| अ. क्र. | लाभार्थींची नावे | जन्म तारीख | दाखल तारीख/ दाखल आदेश क्र. | दत्तक मुक्त तारीख | काळजी व संरक्षणासाठी | वैद्यकीय निदान | स्थानांतरीत केलेली संस्था/नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शौर्य | २९/१२/१८ (४ वर्ष) | १३/५/१९ आदेश क्र. ४९०/१८-१९ | दत्तकमुक्त १२/८/२१ | -- | अस्थमा | वरदान दत्तक संस्था, पटवर्धन वाडा, साहित्य प्रसार केंद्राच्या मागे, सीताबर्डी |
| २ | अविका | ४/८/१९ (३ वर्ष) | ५/१०/२१ आदेश क्र. ४९७/१९-२० | दत्तकमुक्त २०/९/२१ | विशेष काळजी साठी | फोकल एपीलेप्सी | न्यू एनर्जी बहुउद्देशिय संस्था द्वारा संचलित राष्ट्रीय दत्तक ग्रहण शिशुगृह १७६, पंचवटी नगर इटाभट्टी चौक, नागपूर |
| ३ | दक्ष | २२/९/१९ (३ वर्ष) | १४/५/२२ आदेश क्र. ७६/२२-२३ | काळजी व संरक्षणासाठी | -- | नॉर्मल | न्यू एनर्जी बहुउद्देशीय संस्था द्वारा संचलित राष्ट्रीय दत्तक ग्रहण शिशुगृह १७६, पंचवटी नगर इटाभट्टी चौक, नागपूर |
| ४ | विराज | १२/७/२२ (४ महिने) | २५/७/२२ आदेश क्र २४९/२२-२३ | दत्तक मुक्तसाठी अर्ज केलेला कळजी व संरक्षणासाठी | -- | प्रीमॅचुअर बेबी, जन्मत: कमी वजन | न्यू एनर्जी बहुउद्देशीय संस्था द्वारा संचलित राष्ट्रीय दत्तक ग्रहण शिशुगृह १७६, पंचवटी नगर इटाभट्टी चौक, नागपूर |
| ५ | पुर्वा | २५/५/२२ (६ महिने) | ३०/५/२२ आदेश क्र. | काळजी व | -- | नॉर्मल | बालआश्रय, वर्ल्ड चिल्ड्रेन |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ७५/२२-२३ | संरक्षणासाठी | | | वेलफेअर ट्रस्ट इंडिया, बुद्धपार्क जवळ इंदोरा, नागपूर |
| ६ | चिकितल्ली | ३१/१/२२ (१० महिने) | १७/३/२२ आदेश क्र. ८०५/२१-२२ | काळजी व संरक्षणासाठी | -- | नॉर्मल | बालआश्रय, वर्ल्ड चिल्ड्रेन वेलफेअर ट्रस्ट इंडिया, बुद्धपार्क जवळ इंदोरा, नागपूर |
| ७ | अनामिका | १६/१२/२२ (११ महिने) | १७/४/२२ आदेश क्र. ६६/२२-२३ | काळजी व संरक्षणासाठी | -- | नॉर्मल | बालआश्रय, वर्ल्ड चिल्ड्रेन वेलफेअर ट्रस्ट इंडिया, बुद्धपार्क जवळ इंदोरा, नागपूर |

३१ मार्च २०२३ ला ही प्रवृत्ती बंद करण्यात आली. प्रकल्प बंद करीत असल्यासंबंधी सर्व संबंधीत शासकीय कार्यालयांना पत्राद्वारे यापूर्वीच कळविले आहे. त्यानंतर फाउंडलिंग होममधील मुलांचा सर्व रेकॉर्ड व इतर सामान संस्थेच्या सीताबर्डी येथील कार्यालयात हलविण्यात आले आहे व फाउंडलिंग होम पूर्णपणे रिकामे व स्वच्छ केले आहे.

प्रकल्प बंद झाल्यामुळे आमच्या ताब्यात असलेल्या फाउंडलिंग होमच्या जागेचे हस्तातंरण दि. १९/०४/ २०२३ ला केले. जागा सोडल्याचे पत्र व किल्ल्या शासकीय मेडीकल हॉस्पिटलच्या अधिकाऱ्यांच्या सुपुर्द केले.

**सौ. पुष्पा गायधने, समाजसेविका, मातृसेवासंघ. फाऊंडलिंग होम, नागपूर**

---

# मातृ सेवा संघ, कर्मचारी महिला वसतीगृह, बजाजनगर, नागपूर

**स्थापना -१९८०**

आजच्या आधुनिक काळात उच्च शिक्षणाकरिता, तसेच नोकरी करिता मुलींना स्वतःच्या शहरातून, गावातून दुसऱ्या शहरात वास्तव्य करावे लागत आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या वास्तव्याच्या जेवण्याच्या आणि सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सन १९७७ साली डॉ. सत्यबाला तायल यांनी कर्मचारी महिला वसतीगृह बजाजनगरची स्थापन केली.

नागपूर शहरातील निसर्गरम्य परिसरात मध्यवर्ती वसलेले एकमेव उत्कृष्ट, सुसज्ज, सुरक्षित वसतीगृह ४६ वर्षापासून निरतंर सेवा देत आहे.

अहवाल वर्षी एकूण ७८ मुली वास्तव्याला होत्या. त्यात ६० विद्यार्थिनी, १५ कर्मचारी व ३ विद्यार्थिनी डॉरमेटरीला होत्या.

वसतीगृह सुरळीत चालविण्याकरिता स्थायी समिती पुढीलप्रमाणे आहे.

**अध्यक्ष** – डॉ. अरुणा बाभुळकर, **सचिव** – डॉ. लता देशमुख,
**कोषाध्यक्ष** – डॉ. वृषाली देशपांडे, **सदस्य** – डॉ. स्नेहा देशपांडे,
**सल्लागार** – श्रीमती रूपा जुनघरे, **आमंत्रक** – श्रीमती कल्पना भुते.

वसतीगृहाच्या मुलींच्या सर्वांगीण विकासाकरिता विविध सांस्कृतीक, शैक्षणिक, मानसिक व शारीरिक स्वास्थ्या करिता कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

दि. ८ एप्रिल २०२२ 'सरल ध्यान योग साधना' यात आध्यात्मिक ध्यान, साधनेच्या प्रात्यक्षिकाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यात डॉ. मीनाक्षी वानखेडे, सौ. तनुजा वर्मा, सौ. सुषमा बनसोड यांनी प्रात्यक्षिकाद्वारे विद्यार्थीनींना सकारात्मक दृष्टीकोनाचे महत्त्व सांगितले. व त्यामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य कसे जपता येईल, तसेच त्यामुळे अभ्यासात न नोकरीत एकाग्रता वाढीस येऊन याचा उपयोग भविष्य उज्चल करण्यास होईल याबाबत सांगीतले.

दि. १८ सप्टेंबर २०२२ रोजी 'फ्रेशर डे' कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यात विविध स्पर्धात्मक, सांस्कृतीक कार्यक्रम घेण्यात आले. यात प्रमांशी जवादे या विद्यार्थिनीला 'मिस फ्रेशर' हा किताब देण्यात आला. याच कार्यक्रमात विद्यार्थीनी व कर्मचारी महिलांचे प्रतिनीधी निवडून देण्यात आले व त्यांना त्यांची कामे वाटून देण्यात आली. या कार्यक्रमाकरिता समाजकार्य संस्थेच्या प्राध्यापिका डॉ. वनिता तुमसरे प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या.

दि. २५ सप्टेंबर २०२२ रोजी वसतीगृहातील सर्व कर्मचारी महिला व विद्यार्थीनीची आरोप तपासणी डॉ. सीमा देशमुख व सहकारी यांच्याकडून करून घेण्यात आली.

दि. ३ फेब्रुवारी २०२३ रोजी 'योग विद्या प्राणिक हीलींग उपचार प्रशिक्षण' यावर कार्यकम आयोजित करण्यात आला. यात चीनी स्पर्श व औषधोपचार पद्धतीने मानसिक व शारिरीक स्वास्थ्य आरोग्यदायी कसे करता येईल यावर तीन दिवसांचा प्रात्यक्षिक कार्यक्रम घेण्यात आला. डॉ. प्रीती गोटीकर, श्रीमती मधुमिता पेंढारकर, श्रीमती श्वेता धुवाधापर यांच्याद्वारे प्रात्यक्षिक घेण्यात आले.

दि. १८ मार्च २०२३ रोजी मातृ सेवा संघ, कौटुंबिक सल्ला केंद्र, बजाजनगर यांच्या तर्फे 'जीवन कौशल्य शिक्षण' या विषयावर कार्यकम घेण्यात आला. श्रीमती मीरा कडबे, संचालिक, तरुणभारत यांनी या कार्यक्रमात विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. वसतीगृहात विविध स्वप्न घेऊन येणाऱ्या विद्यार्थिनी तसेच कर्मचारी यांना उत्तम संस्कार मिळावे, त्या सुसंस्कृत व्हाव्या, त्यांचा भविष्याचा मार्ग प्रशस्त व्हावा याकरिता विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत त्यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाकरिता कौटुंबिक सल्ला केंद्राच्या समुपदेशक सुनिता कोडापाल उपस्थित होत्या.

अहवाल वर्षी वृक्षारोपण, गोकुळाष्टमी, गणेशोत्सव, नवरात्री, कोजागिरी, दिवाळी, नववर्ष असे पारंपारिक उत्सव मोठया उत्साहाने साजरे करण्यात आले.

वसतीगृहाचा कारभार सुरळीत चालविण्याकरिता १ मेट्रन, २ चपराशी, १ सफाई कामगार व एक सुरक्षा गार्ड यांची सोय करण्यात आली आहे.

अहवाल वर्षी नवीन टी.व्ही. घेण्यात आला. नवीन गडर लाईन बसविण्याचे काम सुरू करण्यात आले. तसेच वसतीगृहाच्या डागडुजीचे काम करण्यात आले. आगामी योजने अंतर्गत डागडुजीची कामे, बाथरूम व प्रसाधन गृहाचे दरवाजे नवीन लावण्याचे काम आहे.

अहवाल वर्षी स्थायी समितीच्या ४ सभा घेण्यात आल्या. मार्च २०२३ मध्ये वर्ष २०२३-२४ चे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले.

या सर्व कार्यात स्थायी समितीचे अध्यक्ष डॉ. अरुणा बाभुळकर, सचिव डॉ. लता देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. वृषाली देशपांडे व सल्लागार श्रीमती रूपा जुनघरे तसेच लेखापाल कु. चित्रा नायर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. धन्यवाद!

**श्रीमती कल्पना भुते, मेट्रन,**
**कर्मचारी महिला वसतीगृह, बजाजनगर नागपूर**

---

# मातृसेवासंघ, 'स्नेहांगण' दिव्यांग मुलांची शाळा, सीताबर्डी, नागपूर

**स्थापना -१९८१**

चैत्रशुद्ध प्रतिपदा गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर ५ एप्रिल १९८१ रोजी आंतरराष्ट्रीय अपंग वर्षाचे महत्त्व साधून सामाजिक कार्यकर्त्या स्व. श्रीमती उषाताई संत आणि अस्थिशल्य चिकित्सक पद्मश्री डॉ. विक्रम मारवाह या द्वयींच्या प्रयत्नाने विकलांग बालविकास केंद्र आणि ऑर्थो हॉस्पीटल या जोड प्रकल्पाची स्थापना झाली. विकलांग बालविकास केंद्राचे नाव विकलांग मुलांचे पुनर्वसन प्रकल्प असे कालांतराने ठेवण्यात आले. १९९४ मध्ये राज्य शासनाकडे अनुदान मिळविण्यासाठी अर्ज करावयाचा असल्यामुळे विकलांग मुलांचे पुनर्वसन प्रकल्प (निवासी शाळा) असे नाव ठेवण्यात आले. त्यानंतर याच प्रकल्पाचे २००७ सालापासून स्नेहांगण अपंग (दिव्यांग) मुलांची शाळा, मातृसेवासंघ सीताबर्डी नागपूर असे नामकरण करण्यात आले. या शाळेने या वर्षी ४२ वर्षे पूर्ण केली.

स्नेहांगण दिव्यांग मुलांची शाळा, मातृसेवासंघ या शाळेत १८ वर्षापर्यतच्या अस्थिव्यंग मुलामुलींना प्रवेश देण्यात येतो. शाळेत इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतचा अभ्यासक्रम शिकविला जातो. वर्ग ९ ते १० वीच्या विद्यार्थ्यांना बाहेर नॉर्मल शाळेत शिकण्याकरिता पाठविण्यात येते. नामांकित अस्थिशल्य चिकित्सक डॉ. सुश्रुत बाभुळकर यांचे मार्फत शाळेतील अस्थिव्यंग मुला-मुलींचे तपासणी करून ऑपरेशन आणि त्यानंतर त्यांना व्यायामोपचार व भौतिकोपचार साधने देण्यात येतात. याशिवाय अपंग विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा या दृष्टीने विविध कलाही विद्यार्थ्यांना शिकविण्यात येतात. अशा प्रकारे शाळेत अपंग विद्यार्थ्याचे शारीरिक, शैक्षणिक पुनर्वसन करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतो. एप्रिल १९९५ पासून शाळेला राज्य शासन समाजकल्याण विभागाकडून ५० निवासी दिव्यांग मुला-मुलींसाठी अनुदान तत्त्वावर तसेच सत्र २००६ ते २००७ पासून १५ अनिवासी दिव्यांग मुला-मुलींसाठी विना अनुदान तत्त्वावर मान्यता प्राप्त झाली.

**शाळेत दिव्यांग विद्यार्थ्यांना खालील सुविधा पुरविण्यात येतात.**

१. वय १८ वर्षांपर्यंतच्या अस्थिव्यंग मुला-मुलींसाठी सर्व सुविधांनी युक्त अशी स्वतंत्र निवासाची व्यवस्था.

२. अस्थिशल्य चिकित्सकांद्वारे वैद्यकीय आरोग्य तपासणी, शस्त्रक्रिया इ. विनामूल्य.

३. आवश्यक व्यायामाचे उपकरणांनी युक्त असे स्वतंत्र व्यायाम कक्ष.

४. विविध भौतिकपोचार साधने जसे- कॅलिपर, क्रचेस, वॉकर, व्हीलचेअर इत्यादी गरजेनुसार उपलब्ध करून देण्यात येतात.

५. विद्यार्थ्यांसाठी वाचनालयाची सुविधा.

६. विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी, दूरदर्शन संच, कंम्प्यूटर, विविध प्रकारचे इनडोअर गेमस् इ. ची विनामूल्य उपलब्ध आहेत.

७. विनामूल्य सकस आहार- दुध, नाश्ता, चौरस जेवण, फळे, विविध सणांना खारे गोड पदार्थ इ. देण्यात येतात.

८. वर्षभर शालेय शैक्षणिक साहित्य, पाठ्यपुस्तके, गणवेश, वह्या इ. चा विनामूल्य वर्षभर पुरवठा केला जातो.

यावर्षी शाळेतील वर्गानुसार प्रवेशित निवासी विद्यार्थ्यांची यादी

| **अ.क्र.** | **इयत्ता** | **मुले** | **मुली** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| १. | १ ला | २ | २ | ४ |
| २. | २ रा | १ | १ | २ |
| ३. | ३ रा | ३ | १ | ४ |
| ४. | ४ था | १ | ० | १ |
| ५. | ५ वा | २ | १ | ३ |
| ६. | ६ वा | १ | १ | २ |
| ७. | ७ वा | ३ | ३ | ६ |
| ८. | ८ वा | ८ | ५ | १३ |
| ९. | ९ वा | ३ | ३ | ६ |
| १०. | १० वा | ३ | ६ | ९ |
| **एकूण** | | **२७** | **२३** | **५०** |

**शारीरिक पुनर्वसन**

| **उपचार पद्धती** | **विद्यार्थी** |
|---|---|
| कॅलीपर | ०१ |
| व्हीलचेअर | ०२ |

**हस्तकला पुनर्वसन**

| **हस्तकला प्रकार** | **विद्यार्थी** |
|---|---|
| कुंदन आर्ट | १५ |
| पेपर क्राफ्ट | २५ |
| ३डी ग्रिटींग कार्ड | २० |

**इयत्ता १ ली ते ८ वी चा वार्षिक निकाल**

| इयत्ता | एकूण विद्यार्थी | उत्तीर्ण श्रेणी | | | | | | | | | एकूण उत्तीर्ण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ १ | अ २ | ब१ | ब२ | क१ | क२ | ड | ई१ | ई२ | |
| १ ली | ०४ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०३ | ०० | ०० | ०० | ०४ |
| २ री | ०२ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०२ |
| ३ री | ०४ | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०४ |
| ४ थी | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| ५ वी | ०३ | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०३ |
| ६ वी | ०२ | ०० | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ |
| ७ वी | ०६ | ०० | ०० | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०५ |
| ८ वी | १३ | ०० | ०० | ०६ | ०२ | ०१ | ०३ | ०० | ०० | ०० | १२ |

**इयत्ता १० वी चा बोर्डाचा निकाल**

| अ.क्र. | नाव | टक्के |
|---|---|---|
| १. | इमांशु युवराज पटले | ७७.६०% |
| २. | अंकित ध्रुव नंदेश्वर | ८५% |
| ३. | चक्रधर गणेश काकडे | ७९.२०% |
| ४. | कु. श्रुती शाम मेश्राम | ७९.६०% |
| ५. | कु. कामिनी नरेश शाहू | ८१.४०% |
| ६. | कु. आरती महेंद्र नंदेश्वर | ७३.२०% |
| ७. | कु. समृद्धी रवी पांडे | ७१.८०% |
| ८. | कु. संचिता राजविलास गोंडाणे | ७६.००% |
| ९. | कु. पायल गणेश मेश्राम | ८३% |

शाळेतील १० वी ची परीक्षा दिलेले सर्व विद्यार्थी १००% उत्तीर्ण झाले.

**शाळेत वर्षभर साजरे करण्यात आलेले कार्यक्रम / उपक्रम**

दि. २२/०७/२०२२ सी.आर.सी.यशवंत स्टेडियम नागपूर तर्फे स्क्रीनिंग आणि असेसमेंट कॅम्प घेण्यात आला. श्रीमती कविता व श्रीमती श्रद्धा ह्यांनी विद्यार्थ्यांची बौद्धिक व शारीरिक अपंगत्वाची तपासणी केली. विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार लर्निंग मटेरियल व भौतिकोपचाराची साधने शासनाकडून उपलब्ध करून देणार असे सांगितले.

दि. २२/०७/२०२२ रोजी शाळेतील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. अस्थिरोग तज्ञ डॉ. सुश्रुत बाभुळकर व त्यांचे सहकारी डॉक्टर्स यांच्या हस्ते प्रत्येक विद्यार्थ्यांची तपासणी केली. १४ विद्यार्थ्यांना ऑपरेशन, ०४ विद्यार्थ्यांना एक्स-रे व २२ विद्यार्थ्यांना व्यायाम सांगितले १४ विद्यार्थ्यांचे ऑपरेशन व उपचार नि:शुल्क करून देऊ असे आश्वासन डॉ.सुश्रुत बाभुळकर ह्यांनी केले.

दि. ०६/०८/२०२२ स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव एक भारत श्रेष्ठ भारत कार्यक्रमाअंतर्गत राखी मेकिंग उपक्रम शाळेत राबविण्यात आला. या मध्ये विद्यार्थ्यांना राखीचा इतिहास व त्याचे महत्व सांगण्यात आले. रक्षाबंधनाच्या दिवशी स्वतः बनविलेली राखी बांधून रक्षाबंधन साजरा करण्यात आला डॉ. सुनीत सूद (सफल हॉस्पिटल) व त्यांचे सहकारी डॉक्टर्स यांनी विद्यार्थ्यांसोबत रक्षाबंधन साजरा केला. शाळेतील विद्यार्थ्यांनी मातृसेवासंघाचे डॉक्टर्स, परिचारिका यांना राखी बांधून रक्षाबंधन साजरा केला.

दि. ०८/०८/२०२२ नेत्ररोग तपासणी शिबीर घेण्यात आले नेत्ररोग तज्ञ डॉ. माधुरी पाटील ह्यांनी सर्व विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी केली १७ विद्यार्थ्यांचे डोळे नॉर्मल असल्याचे सांगितले. १२ विद्यार्थ्यांना तपासणीचा सल्ला दिला.

वर्षभरात अनेक वेगवेगळ्या स्पर्धा झाल्या त्यात विद्यार्थ्यांनी भाग घेतला व अपूर्व यश संपादन करून पारितोषिके मिळविली.

दि. १७/०८/२०२२ अपंग महिला बालविकास संस्था तर्फे शाळेत आरोग्य तपासणी कॅम्प आयोजित करण्यात आला. डॉ. नूतन देव, डॉ. माला गवाले, डॉ. निवेदिता कुलकर्णी ह्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली यावेळी अपंग महीला बालविकास संस्थेच्या अध्यक्षा डॉ. प्रतिमा शास्त्री ह्यांनी स्व. उषाताई संत ह्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १,००,०००/- (एक लाख रुपये) देणगी दिली.

जन्माष्टमी, गणेशोत्सव आणि महत्त्वाच्या जयंत्या आणि पुण्यतिथी साजऱ्या करण्यात आल्या. त्यात सगळ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

दि. २५/०९/२०२२ रोटरी क्लब ऑफ नागपूर व्हिजन तर्फे मुला-मुलींच्या निवासी खोल्यांना रंग-रंगोटी करून पडदे लावून नवीन रूप देण्यात आले व Happy School Snehangan चे रोटरी क्लब ऑफ नागपूर व्हिजनचे अध्यक्ष आणि पदाधिकारी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. (Happy School Snehangan)

तसेच वेळोवेळी मनोरंजनाचे कार्यक्रम विद्यार्थ्यांनी केले आणि जादूची कला, नेमबाजी, टॅटू इत्यादी मनोरंजक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

दि. १९/१०/२०२२ शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आधार कार्ड कॅम्प आयोजित करण्यात आले.

दि. १९/१०/२०२२ एल.ए.डी कॉलेज तर्फे शाळेत पपेट शो चे आयोजन करण्यात आले.

दि. १४/११/२०२२ इनर व्हील क्लब ऑफ नागपूर ऑरेंज सीटी तर्फे बालक दिन साजरा करण्यात आला.

दि. २४/११/२०२२ शाळेतील २४ विद्यार्थ्यांना अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मुंबई तर्फे होणाऱ्या गायनाच्या प्रारंभिक परीक्षेला बसविण्यात आले. यातील सर्व विद्यार्थी विशेष योग्यता आणि प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले.

दि. २६/११/२०२२ शाळेत संविधान दिवस साजरा करण्यात आला. यात

संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. नागरिकांचे मुलभूत कर्तव्ये कोणती याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

दि. ०३/१२/२०२२ जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जिल्हा समाज कल्याण विभागातर्फे भव्य रॅली आणि दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन शिक्षक सहकारी बँक, गांधीसागर, नागपूर येथे करण्यात आले होते. यात स्नेहांगण शाळेतील विद्यार्थ्यांनी रॅलीत सहभागी झाले तसेच सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट असे नृत्य सादर केले. मा. जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्री किशोर भोयर यांनी विद्यार्थ्यांचे त्यांच्या सादरीकरणा बद्दल विशेष कौतुक केले. 'कोमल' लघुपटही दाखविण्यात आला.

दि. २६/१२/२०२२ शाळेत सिकलसेल आजार तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले सर्व विद्यार्थ्यांचे व कर्मचाऱ्यांचे रक्त तपासून सिकलसेल आजाराची चाचणी करण्यात आली. यावेळी डॉ. अनुराधा श्रीखंडे, डॉ. पुष्पा भावे, डॉ. ऋषी लोडाया ह्यांनी मार्गदर्शन केले. कु. आरती व कु. संजना पात्रीकर हे विद्यार्थी पॉजिटिव्ह निघाले. डॉ. ऋषी लोढाया यांचे उपचार सुरु करण्यात आले.

दि. १८/०१/२०२३ व १९/०१/२०२३ जिल्हा समाज कल्याण व जिल्हा परिषद तर्फे जिल्हा परिषद स्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन लक्ष्मीनगर येथील पोलीस प्रशिक्षण केंद्र येथे करण्यात आले. अस्थिव्यंग गटातून कु. श्वेतापिल्लेवान, कु. आरती नंदेश्वर, कु. रागिनी सलामे  ह्यांचा १०० मी व ५० मी धावणी स्पर्धेत प्रथम क्रमांक आला गौरव साटोने ह्याचा व्हीलचेअर रेस मध्ये प्रथम क्रमांक आला.

दि. २१/०१/२०२३ खासदार क्रीडा महोत्सव स्पर्धा ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथे झाला यात कु. आरती नंदेश्वर पावर लिफ्टिंग व १०० मी. धावणीत प्रथम, कु. श्वेता पिल्लेवान  १०० मी. धावणीत प्रथम, करण धुर्वे  गोळा फेक मध्ये प्रथम, कु. श्वेता कॅरम स्पर्धेत द्वितीय, कु. रागिनी सलामे  १०० मी. धावणी द्वितीय, कु. समृद्धी पांडे कॅरम द्वितीय क्रमांक पटकाविला ४ सुवर्ण पदक, ४ रजत पदक, १८८००/- रु. रोख रक्कम आणि प्रमाणपत्रे मिळाली केंद्रीय मंत्री मा. श्री नितीनजी गडकरी ह्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले.

दि. १४/०२/२०२३ रोटरी क्लब ऑफ नागपूर द्वारा दरवर्षी नागपूर मधील दिव्यांग प्रवर्गातील शाळेच्या मुला-मुलींसाठी क्रीडा स्पर्धा  व मनोरंजनाचा उडान कार्यक्रम मानकापूर येथे आयोजित करण्यात येते. यात दिव्यांग विद्यार्थ्यांना टी शर्ट नाश्ता, भोजन व विजयी विद्यार्थ्यांना बक्षिसे वितरीत करण्यात येतात. यावर्षी शाळेतील १५ मुलांना उडान कार्यक्रमासाठी नेण्यात आले. भरभर चालणे, बादलीत बॉल टाकणे इ. स्पर्धा झाल्या. भरभर चालणे या स्पर्धेत आदर्श तांबे या विद्यार्थ्याचा प्रथम क्रमांक आला.

दि. २०/०२/२०२३ नागपूर सुधार प्रन्यास द्वारा नागपूर शहरातील दिव्यांगांकरिता अनुभूती इनक्लूसीव्ह पार्कच्या कामाचे भूमिपूजन केंद्रीय मंत्री श्री नितीनजी गडकरी ह्यांच्या हस्ते लता मंगेशकर गार्डन जवळील सूर्यनगर येथे करण्यात आले, या कार्यक्रमात दिव्यांग

विद्यार्थ्यांना सहाय्यक उपकरणांचे वाटप करण्यात आले शाळेतील ०३ विद्यार्थ्यांना व्हीलचेअर्स व एका विद्यार्थ्याला वॉकर (लहान रोलेटर ) मिळाले. तसेच राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक आलेल्या कु. आरती व कु. श्वेता ह्यांचा सत्कार जिल्हा समाज कल्याण अधिकारी मा. श्री किशोर भोयर साहेब ह्यांच्या हस्ते गोल्ड मेडल व प्रमाणपत्र देवून करण्यात आला.

दि. २१/०२/२०२३ रोजी शाळेत दंत आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. इनर व्हील क्लब ऑरेंज सीटी नागपूरच्या वतीने या तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ. सचिन काटोल यांनी सर्व विद्यार्थ्यांची तपासणी केली आणि योग्य ती उपचार पद्धती अवलंब करण्याविषयी मार्गदर्शन केले यावेळी इनर व्हील क्लबच्या अध्यक्षा श्रीमती कोमल अकबरी सदस्या कु. प्राजक्ता देवघरे उपस्थित होत्या.

**शाळेत साजरे करण्यात आलेले महापुरुषांची जयंती व पुण्यतिथी कार्यक्रम**

१. दिनांक २६/०६/२०२२ छत्रपती शाहू महाराज जयंती.

२. दिनांक १८/०७/२०२२ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मृतिदिन

३. दि. ०१/०८/२०२२ लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती

४. दि. १५/०८/२०२२ स्वातंत्र्य दिन

५. दि. ०५/०९/२०२२ डॉ. सर्वपल्लीराधाकृष्ण जयंती (शिक्षक दिन)

६. दि. ०२/१०/२०२२ राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती आणि लालबहादूर शास्त्री जयंती.

७. दि. १४/१०/२०२२ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी

८. दि. १४/११/२०२२ पंडित जवाहरलाल जयंती (बालकदिन)

९. दि. २८/११/२०२२ समाज सुधारक महात्मा जोतीबा फुले पुण्यतिथी

१०.दि. ०६/१२/२०२२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरीनिर्वाण दिन

११. दि. २०/१२/२०२२ संत गाडगेबाबा पुण्यतिथी

१२.दि .०३/०१/२०२३ सावित्रीबाई फुले जयंती

१३. दि. १२/०१/२०२३ स्वामी विवेकानंद जयंती

१४. दि. २३/०१/२०२३ नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती

१५. दि. २६/०१/२०२३ गणराज्य दिन

१६. दि. ३०/०१/२०२३ महात्मा गांधी पुण्यतिथी

१७. दि. १९/०२/२०२३ छत्रपती शिवाजी महाराज जयंती

१८. दि. २७/०२/२०२३ मराठी राज भाषा दिन

१९. दि. ०४/०३/२०२३ राष्ट्रीय सुरक्षा दिन

२०. दि. १०/०३/२०२३ सावित्रीबाई फुले सुरक्षा दिन

२१. दि. ०४/०३/२०२३ राष्ट्रीय सुरक्षा दिन

२२. दि. १४/०४/२०२३ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

१. दि. २६/०६/२०२२ थोर समाजसुधारक राजश्री शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिवस शाळेत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा उपस्थित मा. शाळा प्रमुखांच्या हस्ते शाहू महाराज ह्यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

२. दि. ०१/०८/२०२२ लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे ह्यांची जयंती शाळेत साजरी करण्यात आली मा. शाळा प्रमुखांच्या हस्ते लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे ह्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले कु.अन्वेषा झंझाळ व अर्जुन काळे या विद्यार्थ्यांनी दोन्ही महापुरुषांची माहिती सादर केली. मा. शाळा प्रमुखांनी मार्गदर्शन केले.

३. दि. ०५/०९/२०२२ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण ह्यांची जयंती म्हणजेच शिक्षक दिन विद्यार्थ्यांनी साजरा केला. विद्यार्थ्यांनी स्वयंशासन राबविले. डॉ. राधाकृष्ण ह्यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून सर्वांनी अभिवादन केले. कु. प्रिन्सि, अर्जुन ह्यांनी कविता सादर केली कु. अन्वेषा हिने माहिती सादर केली. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी स्वतः च्या हाताने फुल बनवून सर्व शिक्षकांना देवून त्यांचा सन्मान केला. मा. शाळा प्रमुखांनी मार्गदर्शन केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्र संचलन कु. आरती नंदेश्वर या विद्यार्थिनीने केले.

४. दि. ०२/१०/२०२२ राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री ह्यांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून मा. शाळा प्रमुखांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कुणाल, कु. आरती, पियुष ह्यांनी माहिती सादर केली. सुनलो बापू ये पैगाम या गीताचे सामुहिक गायन करण्यात आले. इरा इंटरनॅशनल शाळेच्या विद्यार्थ्यांनीही कार्यक्रमात सहभाग घेतला. कु. अंजली लोखंडे हिने कथ्थक नृत्य सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

५. दिनांक २६/०१/२०२३ मातृ सेवा संघ व स्नेहांगण शाळाच्या विद्यमानाने ७४ वा गणतंत्र दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी मा. डॉ. नंदिता सन्याल ह्यांच्या हस्ते कै. कमलाताई होस्पेट ह्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून राष्ट्रध्वज फडकविण्यात आला व राष्ट्रगीत सादर करण्यात आले.

**भावपूर्ण श्रद्धांजली**

* शाळेतील इयत्ता ०९ वीचा हुशार विद्यार्थी पियुष महादेव कांबळे ह्याचे दुख:द निधन झाले.
* सर्व विद्यार्थी व कर्मचार्यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

## सन २०२२-२०२३ वस्तू रूप देणगी

| अ.क्र. | दिनांक | नाव | वस्तू |
|---|---|---|---|
| १. | ११/०६/२०२२ | श्रीमती लतिका खांडेकर | ०४ लहान कपाट, ०२ मोठे कपाट |
| १. | ०४/०७/२०२२ | | ५० रजिस्टर, ९० वह्या, ०५ डब्बे स्केल, ०३ डब्बे पेन्सिल, ५० नपकिन, ०३ डब्बे पेन |
| २. | ०४/०८/२०२२ | श्रीमती अर्चना गोतमारे | इयत्ता ९ वी पाठ्यपुस्तके संच |
| ३. | ०८/०८/२०२२ | श्रीमती ममोल जैन | स्कूल बग ५०, रिबीन, हेअर बड, रबर बड, टीपटोप क्लिप |
| ४. | ३०/०८/२०२२ | श्रीमती सुजाता सन्याल | इयत्ता १० वी इंग्रजी टेक्स व वर्क बुक, इयत्ता ८ वी पाठ्यपुस्तक संच |
| ५. | १७/०९/२०२२ | Apllombe corporation | इयत्ता ५,६,७,८,९,१० वर्क बुक्स |
| ६. | २१/०९/२०२२ | श्री केशव साठ्ले | ड्रॉइंग, कार्यानुभव बुक, नकाशे |
| ७. | ०७/१०/२०२२ | डऊ कॉलेज | वॉटर प्युरीफायर |
| ८. | ०३/१२/२०२२ | इनर व्हील क्लब नागपूर | लाल टी शर्ट व लोअर ५० |
| ९. | १०/१२/२०२२ | जि.एस.कॉलेज | कंपास पेटी ५०, पाण्याची बॉटल ५०, मोजे ५० |
| १०. | १२/१२/२०२२ | अंजुमन इंजीनियर कॉलेज | वह्या, पेन डस्टर, सॉक्सग्लोब, स्टीकर्स, चार्ट, नकाशे |
| ११. | १६/१२/२०२२ | श्रीमती आशा सेलोकर | ५० स्वेटर्स (शिक्षण विस्तार शिक्षणाधिकारी पंचायत समिती उमरेड) |
| १२. | १९/१२/२०२२ | इस्कोन धार्मिक संस्था | भगवद्गीता पुस्तके २५ |
| १३. | २४/१२/२०२२ | लेवरेज ग्रुप | विद्यार्थ्यांच्या नावाचे कप ५० |
| १४. | ३०/१२/२०२२ | श्रीमती शारदा दीक्षित | शूज ५० |
| १५. | ०९/०१/२०२३ | श्री केतन राठी | दैनंदिन वापराच्या वस्तू ५० |
| १६. | १०/०१/२०२३ | इनर व्हील क्लब ऑफ इस्ट | पोस्टर, व्याक्स, स्केच पेन ५० |
| १७. | १७/०१/२०२३ | अखिल भारतीय मारवाडी महिला संच | ४० चादरी रंगीत |
| १८. | २८/०१/२०२३ | श्री पेनुरकर (सत्य साई सेवा समिती) | ब्ल्यूटूथ स्पीकर माईक रिमोट |
| १९. | ०१/०२/२०२३ | गुरु भक्त सेवा समिती | ०४ गंज झाकण्या सह |
| २०. | ०४/०२/२०२३ | श्री कदम | वह्या ड्रॉइंग कॉपी कलर बॉक्स पेन प्रत्येकी ६० |
| २१. | ०४/०२/२०२३ | श्री टिकू | ३४ स्वेटर्स |

| | | | |
|---|---|---|---|
| २२. | ०५/०२/२०२३ | श्री केतन राठी | ईपसोन प्रिंटर विथ स्कॅनर, व्हाईट बोर्ड |
| २३. | ०५/०२/२०२३ | कु. वसुश्री इंगळे | ०४ ग्रीन बोर्ड |
| २४. | १७/०२/२०२३ | कु. दिव्यानि ठाकरे | वॉटर कलर, ग्लीटर, क्विलिंग पट्ट्या,क्रेऑन, आईसक्रीम स्टिक. |
| २५. | १७/०२/२०२३ | श्रीमती प्रिया | ५० गुडीबग (चादर, दैनंदिन वापराच्या वस्तू) |
| २६. | २०/०२/२०२३ | श्रीमती कायरा पालेवार | ०१ व्हीलचेअर |
| २८. | ०३/०१/२०२३ | श्रीमती अश्फाक शेख | मसल स्टीम्युलेटर मशीन ०१, एक्सटेन्शनवायर व जेल बॉटल ०१ |
| २९. | २४/११/२०२२ | इशरत अंजुम | मिनी मसल स्टीम्युलेटर मशीन ०१ |
| ३०. | २४/११/२०२२ | नसरीन अंजुम | मिनी मसल स्टीम्युलेटर मशीन ०१ |
| ३१. | २४/११/२०२२ | रेश्मा तस्नीम | प्रीकॉशन मसाज गन ०१ |
| ३२. | २४/११/२०२२ | वर्षा इंगळे | प्रीकॉशन मसाज गन ०१ |
| ३३. | १७/०७/२०२२ | श्रीमती सुजाता सन्याल | वुडन एज्यूकेशनल सेट- १३, पार्टेशन |
| ३४. | ०८/१०/२०२२ | श्रीमती मीनाक्षी कुलकर्णी | वॉटर कुलर ०१ |
| ३५. | ०५/०२/२०२२ | कर्म कल्याणकारी संस्था | ४० गणवेश |
| ३६. | | श्री अर्नब नंदी | मुलांच्या व मुलींच्या वसतिगृहात जाळी लावले. |
| ३७. | ०३/०३/२०२३ | श्री ललीतजि अग्रवाल | वॉशिंग मशीन ०१ |

**स्नेहांगण शाळा व्यवस्थापन समिती**

शाळेचा कार्यभार सुचारू रीतीने व्हावा याकरिता शाळा व्यवस्थापन समिती गठीत करण्यात आली.

१. डॉ. अरुणाताई बाभुळकर :- अध्यक्षा, मातृ सेवा संघ
२. डॉ. लता देशमुख :- सचिव, मातृसेवा संघ
३. डॉ. वृषाली देशपांडे :- कोषाध्यक्षा, मातृसेवा संघ
४. डॉ. स्नेहा देशपांडे :- सदस्य
५. डॉ. पुष्पा भावे :- सदस्य
६. श्रीमती मृणाली देशमुख :- शाळा प्रमुख
७. श्री कुणाल ढोके :- शिक्षकेत्तर कर्मचारी
८. श्रीमती शीला बारापात्रे :- पालक प्रतिनिधी

वरील मान्यवरांचा समावेश आहे. यातील सभासद वेळोवेळी शाळेला भेट देवून योग्य ते मार्गदर्शन व सल्ला देतात याचा शाळेला खूप उपयोग होतो.

**शाळेला येणाऱ्या अडचणी**

स्नेहांगण शाळेत १ ली ते ८ वी पर्यंतचे शिक्षण देण्यात येते. शाळेला आवश्यक असलेली पदे मुख्याध्यापक, वॉर्डन, फ़िजिओथेरापीस्ट, विशेष शिक्षक, स्वयंपाकी नियमाप्रमाणे मंजूर विद्यार्थी संख्येनुसार प्राप्त झाले नाही. शासनाकडे याबाबत वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येतो. शासनाचे कर्मचारी कमी पडत असल्यामुळे संस्थेतर्फे मानधनावर कर्मचारी ठेवण्यात येतात.

**विशेष आभार**

सर्व आदरणीय देणगीदार, हितचिंतक, मानसेवी कार्यकर्ते, मातृ सेवा संघाच्या अध्यक्षा डॉ. अरुणाताई बाभुळकर, सचिव डॉ. लता देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. वृषाली देशपांडे, मातृसेवा संघाच्या कार्यकारिणी मंडळातील सर्व सदस्य व सल्लागार या सर्व मान्यवरांच्या सहकार्यात सन २०२२-२०२३ या वर्षात स्नेहांगण दिव्यांग मुलांची शाळा यशस्वीरित्या वाटचाल करीत आहे. या सर्वांचे आम्ही मन:पूर्वक आभारी आहोत.

**श्रीमती मृणाली देशमुख, शाळाप्रमुख**
**स्नेहांगण–मातृसेवासंघ, सीताबर्डी, नागपूर.**

---

# विकलांग मुलांचे पुनर्वसन प्रकल्प, सीताबर्डी
## स्थापना २००३

जागतिक अपंग वर्षात गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर मातृसेवासंघाने एक जोडप्रकल्प सुरू केला. "**चिल्ड्रन्स ऑर्थोपेडीक हॉस्पीटल व विकलांग मुलांचे पुनर्वसन प्रकल्प**".

मातृसेवासंघाच्या एका छत्राखाली विकलांग/अस्थिव्यंग मुलांना आवश्यक असलेल्या सेवा सुविधा पुरविणारा हा प्रकल्प. विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण निवासी शाळेत देण्यात येते पण फक्त शालेय शिक्षणाने विकलांग मुलांचे पुनर्वसन होऊ शकत नाही. विद्यार्थ्यांचा जीवनाबाबतचा दृष्टिकोन सकारात्मक बनावा, मनोबल वाढावे म्हणून निवासी शाळेतील शालेय शिक्षणासोबतच त्यांना व्यवसाय पूर्व प्रशिक्षण देऊन छोटेमोठे हस्तकला व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यास २००२-०३ पासून सुरुवात केली.

अपंगत्वाचा स्वस्थ मनाने स्विकार करून उरलेल्या अपंगत्वासह, मानाने जीवन जगण्याकरीता करावी लागणारी धडपड मनात रूजल्यास, जिद्द, महत्वाकांक्षा संक्रमित झाल्यास विद्यार्थी संधीचे सोने करतील असा पूर्ण विश्वास आहे.

विद्यार्थ्यांना नोकरी मिळण्याकरता आवश्यक अर्हता अर्थाजनांकरिता आवश्यक असलेले कौशल्य मिळावे म्हणून

**व्यवसाय प्रशिक्षणा अंतर्गत –**

**इंग्रजी टायपिंग –**

१८ विद्यार्थ्यांनी ३० वर्डस् पर मिनीट टायपिंगचे प्रशिक्षण घेतले. एका विद्यार्थ्यांनी

३० वर्डस् पर मिनीट टायपिंगची परीक्षा दिली. ३ विद्यार्थी  इंग्रजी ४० वर्डस् पर मिनिटचे प्रशिक्षण घेत आहेत.

**मराठी टायपिंग –**

३ विद्यार्थी  मराठी टायपिंग ३० वर्डस् पर मिनिटचे शिक्षण घेत  आहेत. टायपिंग प्रशिक्षणार्थींमध्ये अस्थिव्यंगाशिवाय १ मूकबधिर विद्यार्थ्याने प्रशिक्षण घेतले.

**कॉम्प्युटर प्रशिक्षणा अंतर्गत –**

८ विद्यार्थी सीसीसी चे प्रशिक्षण घेतले व २ विद्यार्थ्यी कॉम्प्यूटरचा सराव करीत आहेत. स्नेहांगण शाळेच्या ७ विद्यार्थ्यांना कॉम्प्यूटर प्रशिक्षण दिले.

रोटरी क्लब ऑफ डाऊ न टाऊ न नागपूर कडून सूचित केल्यानुसार फॅमिली कोर्टातील ७ महिलांना सीसीसी चे प्रशिक्षण स्वयंसिद्धा उपक्रमाअंतर्गत देण्यात आले.

मातृसेवासंघाच्या ५ नर्सेस सीसीसी चे प्रशिक्षण घेत आहेत.

**शिलाई प्रशिक्षणाअंतर्गत –**

नवजात बाळाचे कपडे, फ्रॉक, ब्लाऊज, सलवार सूट,  आदि शिकविण्यात येते. उत्तम कॉटनचे बाळाचे कपडे प्रकल्पात विक्रीकरता नेहमी तयार असतात. सध्या एक विद्यार्थीनी शिलाई प्रशिक्षण घेत आहे.

**स्पर्धा परीक्षा –**

एक विद्यार्थीनी लाभ घेत आहे.

विद्यार्थी आत्मनिर्भर  होण्याच्या दृष्टिने व जोडधंदा करता यावा म्हणून व्यवसाय प्रशिक्षणाच्या अंतर्गत गोडा मसाला–२ विद्यार्थी, काळा मसाला–२ विद्यार्थी, तिळगूळ–३ विद्यार्थी, हळद पावडर–२ विद्यार्थी, धणे पावडर–२ विद्यार्थी, जिरे पावडर –२ विद्यार्थी, बनविणे शिकविल्या जाते. अहवाल वर्षात ५० विद्यार्थींनी व ६ पालकांनी समुपदेशनाचा लाभ घेतला.

**अहवाल वर्षातील वस्तूरूपातील महत्त्वाच्या देणग्या :–**

२  नवीन कॉम्प्यूटर्स – नागफेम चॅरीटेबल ट्रस्ट कडून

१ लॅपटॉप (जुने) – रोटरी क्लब ऑफ नागपूर डाऊन टाऊन कडून मिळाले

४ कॉम्प्यूटर्स (जुने) –रोटरी क्लब ऑफ नागपूर डाऊन टाऊन कडून मिळाले

**अहवाल वर्षातील महत्त्वाच्या देणग्या :–**

श्री हेमंत रमेश जोशी (ऑस्ट्रेलिय)–१,००,०००/–, श्री. प्रकाश मंगळगीरी – १०,०००/–, श्री ए.पी.सोवनी ८,०००/–, श्री अशोक खळदकर ५,१००/–, श्री विघ्नेश श्रीकांत पाध्ये–५,०००/–, अनुराधा जोशी ५,०००/– श्री मंगेश शास्त्री २,०००/–
पुनर्वसन प्रकल्पाला मिळालेल्या एकूण देणग्या–एकूण जमा १,६३,४३९/–

एकूण खर्च        ६२,४७५/–

अहवाल वर्षात खालील विद्यार्थ्यांना प्रकल्पात प्रशिक्षण घेतल्या नंतर नोकरी मिळविण्यास यश मिळाले.

१. सचिन पांडे – हिरा स्वीटस् मध्ये अकाउंटंटचे काम

२. सीमा वाहाणे चव्हाण – निरामय संस्थेत, रामाश्रय केअर सेंटर, संजीवनी सर्वांगीण विकास, माईंड पार्क फाउंडेशन मध्ये कॉम्प्यूटर ऑपरेटरचे काम करते.

३. राकेश काकडे – हेग्झावेअर टेक्नॉलॉजी लिमिटेड सुपरवायझरचे काम करतो.

४. रवीन्द्र राउत – जिल्हा अपंग पुनर्वसन केन्द्र, मेडीकल कॉलेज नागपूर येथे.

५. परमेश्वर चव्हाण – स्विकार संस्थेत पार्टटाईम जॉब करतो.

मातृसेवासंघाचे परिसरात सेवा चालू असल्याने जोडलेले हितचिंतक व मार्गदर्शक यांचा लाभ प्रकल्पाला मिळतो. प्रकल्पाला आर्थिक देणगी देणाऱ्यांचे आभारी आहोत.

**श्रीमती चित्रा तत्त्ववादी,**
**प्रकल्प प्रमुख**
**विकलांग मुलांचे पुनर्वसन प्रकल्प, सीताबर्डी, नागपूर**

---

## मातृसेवासंघ, कौटुंबिक सल्ला सेवा केंद्र, बजाजनगर, नागपूर

**स्थापना –१९८७**

भारतीय समाजात कुटुंबसंस्थेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पण बदलत्या काळानुसार कुटुंब संस्थेतही अनेक बदल होत आहेत. त्याचा परिणाम कौटुंबिक सौख्यावर होत असून विविध कौटुंबिक समस्यांचे प्रमाण सतत वाढत चालले आहे. त्यामुळे कुटुंब विघटीत होत आहेत, याचा अतिशय वाईट परिणाम कुटुंबातील प्रत्येक घटकावर होताना आढळत आहे. हे सर्व टाळण्यासाठीच कौटुंबिक सल्ला केन्द्र कार्यरत आहे.

कौटुंबिक सल्ला केन्द्राची स्थापना मातृसेवासंघ समाजकार्य संस्थेच्या संस्थापिका प्राचार्य डॉ. सत्यबाला तायल व उषाताई संत यांच्याद्वारे दि. १६ नोव्हेंबर १९८७ रोजी करण्यात आली. समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना क्षेत्रकार्य करताना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळावा, कुटुंब व्यवस्थेचे ढासळणे थांबवून स्त्रिया व बालकांवरील अत्याचारास प्रतिबंध करता यावा हा महत्त्वाचा उदात्त हेतू या स्थापनेमागे डॉ. सत्यबाला तायल यांचा होता.

स्थापनेपासून आजतागायत विविध प्रकारच्या कौटुंबिक समस्या हाताळून कुटुंबाचे विघटन होऊ न देता त्यांना सावरून त्यांचे हरविलेले सुख परत आणण्यात केंद्र यशस्वी ठरले.

केंद्रात दोन प्रशिक्षित समुपदेशक कार्यरत असून मदतीसाठी येणाऱ्या समस्याग्रस्त व्यक्तींमध्ये कुठलाही भेदभाव न करता आवश्यक व योग्य ती मदत त्या करीत असतात. जसे समुपदेशन (वैयक्तिक, विवाहपूर्व, वैवाहिक) कायदेविषयक मार्गदर्शन, पुनर्वसनाच्या दृष्टीने

निराधार स्त्रीला अल्पावधी निवासगृह, मानसोपचार तज्ज्ञांची मदत, व्यसनमुक्ती केंद्राची मदत इत्यादी.

केन्द्राला केन्द्रीय समाजकल्याण बोर्ड, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र समाजकल्याण बोर्ड, मुंबई यांचे कडून अनुदान प्राप्त होते. यात ९०% अनुदान बोर्डाकडून प्राप्त होत असून १०% योगदान संस्थेला द्यावे लागते.

केन्द्रीय समाजकल्याण नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार दि. १८ फेब्रुवारी २०१९ पासून भरोसा सेल, सुभाषनगर, नागपूर येथे सुद्धा केन्द्राचे कार्य सुरू करण्यात आले असून बजाजनगर येथील केन्द्रही सुरूच आहे. दोन्ही समुपदेशक एक दिवसाआड या पद्धतीने रोज दोन्ही केन्द्र सांभाळतात.

मागील २०२१-२२ या वर्षी केन्द्रात ४२३ केसेसची नोंदणी करण्यात आली होती. अहवाल साली (२०२२-२३) केन्द्रात ४२२ नवीन केसेस नोंदविण्यात आल्या. त्याचे वर्गीकरण पुढील प्रमाणे आहे.

| **नोंदविलेल्या केसेस** | **लाभार्थी** |
|---|---|
| केन्द्रात नोंदविलेल्या एकूण नवीन केसेस | - ४२२ |
| त्यापैकी पती/पत्नी यांनी नोंदविलेल्या केसेस | - ४०४ |
| अन्य केसेस | - १८ |

**केसेसचे समस्यानुरूप वर्गीकरण**

| **क्र.** | **केसेसचे प्रकार/समस्या** | **संख्या** | **क्र.** | **केसेसचे प्रकार/समस्या** | **संख्या** |
|---|---|---|---|---|---|
| १ | हुंडा | ०९ | २ | पारिवारिक हिंसा | ३८ |
| ३ | शारीरिक मानसिक छळ | १०१ | ४ | व्यक्तिमत्त्व भिन्नता | १७ |
| ५ | इतरांचा हस्तक्षेप | ४४ | ६ | विवाहबाह्य संबंध | ६७ |
| ७ | आर्थिक समस्या | ०४ | ८ | व्यसनाधिनता | ११३ |
| ९ | मानसिक समस्या डिप्रेशन | ०७ | १० | पती समलैंगिक | ०१ |
| ११ | अंधश्रद्धा | ०१ | १२ | लैंगिक छळ | ०२ |
| १३ | करिअर कौन्सेलिंग/मार्गदर्शन | ०१ | १४ | किशोरवयीन मुलांच्या समस्या | ०२ |
| १५ | ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या | ०१ | १६ | विवाहपूर्व मार्गदर्शन | ०५ |
| १७ | लिव्ह इन रिलेशनशिप | ०४ | १८ | अन्य (इतर नातेवाईकांच्या समस्या) | ०५ |
| | **एकूण केसेस** | | | | **४२२** |

नवीन नोंदविलेल्या ४२२ केसेस सोबतच जुन्या ३४ केसेस संदर्भातही कार्यवाही केली गेली. अशाप्रकारे ४५६ केसेस वर्षभरात हाताळण्यात आल्या. त्यापैकी ४१८ केसेस सोडवून बंद करण्यात आल्या. त्यात ३८४ नवीन व ३४ जुन्या केसेसचा समावेश आहे.

बंद केसेस - कार्यवाही व निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

## बंद केसेस – कार्यवाही व निष्कर्ष

| अ.क्र. | वर्गीकरण | नवीन | जुन्या | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | समझोता | १३७ | २१ | १५८ |
| २ | विभक्त | १६ | – | १६ |
| ३ | कायदेविषयक मार्गदर्शन/कोर्टाकडे | ८० | ०४ | ८४ |
| ४ | पोलीस स्टेशनकडे | २६ | – | २६ |
| ५ | जिल्हा विधी सेवा समितीकडे | ४६ | ०६ | ५२ |
| ६ | समुपदेशन | १७ | ०१ | १८ |
| ७ | अन्य एफसीसी कडे | ०२ | – | ०२ |
| ८ | अल्पावधी निवास गृहाकडे | ०१ | – | ०१ |
| ९ | मानसोपचार तज्ञांकडे | ०९ | – | ०९ |
| १० | संरक्षण अधिकाऱ्याकडे | २१ | -- | २१ |
| ११ | करीअर कौन्सिलिंग | ०१ | – | ०१ |
| १२ | विवाहपूर्व मार्गदर्शन | ०५ | – | ०५ |
| १३ | प्रतिसाद नाही | २३ | ०२ | २५ |
| | **एकूण बंद केसेस** | **३८४** | **३४** | **४१८** |

४२२ नवीन केसेसपैकी ३८ केसेस मध्ये प्रक्रिया सुरू आहे.

केन्द्रातील केसेस सोडविण्यासाठी ॲड. प्रणिता चौबे, डॉ. स्वाती धर्माधिकारी, श्रीमती सुनीला थेरगांवकर, भरोसा सेलच्या पोलीस निरीक्षक श्रीमती सीमा सुर्वे यांचे सहकार्य लाभले.

केन्द्राच्या सल्लागार श्रीमती सुनीला थेरगांवकर यांचेशी समुपदेशक नेहमीच केसेसच्या मानसिक व इतर समस्यांबाबत चर्चा करित असतात. केसेसच्या कार्याचा आढावाही घेतला जातो. त्यांचे मार्गदर्शन नेहमीच केन्द्राला उपयुक्त ठरते.

अहवाल साली केन्द्राच्या स्थायी समीतीच्या ४ बैठका घेण्यात आल्या.

**इतर उपक्रम / प्रशिक्षण:–**

१) दि. ३.४.२०२२ रोजी मातृ सेवा संघाने आयोजित केलेल्या 'माहिती अधिकार अधिनियम २००५' या विषयावरील कार्यशाळेत दोनही समुपदेशक सहभागी झाले होते.

२) दि. ३०.५.२०२२ रोजी महानगरपालिका, नागपूर द्वारे 'हत्तीपाय आजार व उपचार' यावरील प्रबोधनात्मक कार्यक्रमात समुपदेशक सहभागी झाले होते.

३) दि. १४.७.२२ पोलीस आयुक्त, नागपूर यांनी आयोजित केलेल्या 'Side effect of consuming acidic substance' या विषयावरील ऑनलाईन कार्यक्रमात समुपदेशक सहभागी झाले होते.

४) दि. २३.७.२२ - भरोसा सेल द्वारे आयोजित 'आर्ट ऑफ लिव्हींग' या कार्यक्रमात समुपदेशक सहभागी झाले होते .

५) दि. ११.८.२२ ते १५.८०२२ या कालावधीत पोलीस आयुक्तालयाने आयोजित केलेल्या 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' या प्रदर्शनीत समुपदेशक सहभागी होते.

६) दि. २२.८.२२ - राष्ट्रीय महिला आयोगाने नवी दिल्ली येथे संपूर्ण भारतातील कौटुंबिक सल्ला केंद्रांची बैठक आयोजित केली होती. त्यात समुपदेशक सहभागी झाल्या होत्या.

७) दि. ८.३.२३ नागपूर महिला मंच व सर्वोदय आश्रम, नागपूर यांच्या द्वारे आयोजित 'स्त्री : विवाहपूर्व व विवाहोत्तर' या विषयावरील परीसंवादात दोन ही समुपदेशक उपस्थित होत्या.

केन्द्रात येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी केन्द्र नेहमीच कार्यरत असते. परंतु त्या समस्या निर्माण होऊ नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून वर्षभर विभिन्न वयोगटासाठी भिन्न भिन्न स्तरावर व विषयांवर जाणीव जागृती कार्यक्रमाचे आयोजन केन्द्राद्वारे करण्यात येत असते.

अहवालसाली एकूण १२ कार्यक्रम घेण्यात आले. यात केन्द्राची व संस्थेची कौटुंबिक समस्या व कौटुंबिक केंद्राची उपयुक्तता, डोळस मातृत्व, वैयक्तिक व सामाजिक स्वच्छता, गुड टच-बॅड टच, प्रेम-मैत्री-आकर्षण, व्यसनमुक्ती, महिला सक्षमीकरण, जीवन कौशल्य शिक्षण असे विषय हाताळण्यात आले.

हे कार्यक्रम राजीवनगर, वानाडोंगरी, स्नेहांगण दिव्यांग मुलांची शाळा, मातृ सेवा संघ, गायत्री विद्यालय, पितळे शास्त्री विद्यालय, सरस्वती शिशुमंदिर माध्यमिक विद्यालय, रिमांड होम, मातृ सेवा संघ कर्मचारी महिला वसतीगृह, बजाजनगर, सुरेन्द्रगढ़ अशा विविध स्थळी घेण्यात आले.

## जाणिव जागृती कार्यक्रमाचा विस्तृत अहवाल

| अ.क्र. | दिनांक | विषय | स्थळ | वक्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ९/५/२२ | कौटुंबिक समस्या व त्यांची सोडवणूक करताना कौटुंबिक सल्ला केंद्राची उपयुक्तता | राजीव नगर, हिंगणा रोड नागपूर | छाया ठोकळ श्रीमती ज्योती शिवणकर |
| २ | ११/५/२२ | डोळस मातृत्व | वानाडोंगरी हिंगणा रोड नागपूर | छाया ठोकळ श्रीमती ज्योती मेश्राम |
| ३ | २१/७/२२ | आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त कार्यक्रमात सहभाग | मॅमोग्राफी हॉल मातृसेवासंघ सीताबर्डी | डॉ. पुष्पा भावे श्री. भावे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | २६/११/२१ | आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त कार्यक्रमात सहभाग | मातृसेवासंघ समाजकार्य | श्री प्रिन्स कुमार डॉ.केशव वाळके |
| ५ | ७/९/२२ | स्नेहांगण दिव्यांग मुलांची शाळा मातृसेवासंघ नागपूर | वैयक्तिक स्वच्छता गुडटच,बॅड टच | छाया ठोकळ श्रीमती मृणाली देशमुख |
| ६ | २१/१२/२२ | प्रेम-मैत्री आकर्षण | गायत्रीविद्यालय गायत्री नगर | छाया ठोकळ |
| ७ | ९/१/२३ | प्रेम-मैत्री आकर्षण | पितळे शास्त्री विद्यालय लक्ष्मीनगर | डॉ.स्नेहा दामले श्री अनंत नानोटी |
| ८ | २८/१/२३ | प्रेम-मैत्री आकर्षण | सरस्वती शिशुमंदिर माध्यमिक विद्यालय प्रसादनगर जयताळा | छाया ठोकळ श्रीमती मृदुला भुते |
| ९ | ८/३/२३ | जागतिक महिला दिन,पद्मश्री कमलाताई होस्पेट, पू.वेणूताई नेने, झांसीची राणी लक्ष्मीबाई यांच्या पुतळ्याला माल्यार्पण व महिलांची रॅली यात सहभाग | मातृसेवासंघ सीताबर्डी, नागपूर | |
| १० | १६/३/२३ | महिला सक्षमीकरण | टि.व्ही.टॉवर सुरेन्द्रगढ | श्रीमती सोनल चौधरी |
| ११ | १८/३/२३ | जीवन कौशल्य शिक्षण | मातृसेवासंघ कर्मचारी महिला वसतीगृह, बजाजनगर | श्रीमती मीरा कडबे |
| १२ | २७/३/२३ | व्यसनमुक्ती मार्गदर्शन व पथनाट्य | मुलांचे निरीक्षण गृह, पाटणकर चौक, नागपूर | श्री रवी पाध्ये श्री तुषार नातू आणि चमू |

केन्द्राच्या कार्यात मातृ सेवा संघाच्या अध्यक्षा डॉ. अरुणा बाभुळकर, सचिव डॉ. लता देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. वृषाली देशपांडे, केन्द्र सल्लागार श्रीमती सुनीला थेरगांवकर आणि स्थायी समितीच्या सदस्यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत.

**छाया ठोकळ - सुनीता कोडापाल**

**समुपदेशक, कौटुंबिक सल्ला केन्द्र, बजाजनगर नागपूर.**

---

# मातृ सेवा संघ, कुसुमविहार

**स्थापना – २०१४**

जेष्ठ नागरिकांकरिता अल्पनिवासगृह 'कुसुमविहार' हा अतिशय वेगळा प्रकल्प संस्थेच्या आजीव सेविका व माजी अध्यक्षा कै.डॉ. कुसुमताई वांकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ तसेच त्यांच्या इच्छेप्रमाणे व त्यांच्याच आर्थिक मदतीने मातृ सेवा संघ परिसरात दि. २७ डिसेंबर २०१४ रोजी सुरू करण्यात आला.

बऱ्याच कुटुंबांना काही दिवस बाहेरगावी किंवा परदेशात जावयाचे असते. अशा वेळी घरातील वृद्धांना घेऊन जाणे शारीरिकदृष्ट्या शक्य नसते. त्यांची अडचण लक्षात घेऊन या प्रकल्पात सेवा देण्यात येते. जेणेकरून त्यांचे कुटुंबीय निश्चिंतपणे बाहेर जाऊ शकतील किंवा आपले काम करू शकतील.

कुसुमविहारच्या तळमाळ्यावर जेष्ठ नागरिकांकरीता 'अल्प काल निवासाची सोय' व पहिल्या माळ्यावर रहिवासी डॉक्टरांकरिता गाळे (फ्लॅट) बांधण्यात आले आहे. अहवालसाली या प्रकल्पाला ८ वर्ष पूर्ण होत आहेत.

येथे उत्तम निवास, भोजन, सुश्रूषा व आधुनिक सोयी उपलब्ध आहेत. वैद्यकीय उपचाराकरिता डॉक्टर्स ही आहेत. गरजेनुसार ज्येष्ठ नागरिक 'कुसुमविहार'मध्ये येऊन राहतात व उपलब्ध सोयीचा लाभ घेतात.

कुसुमविहारचे काम सुरळीत चालविण्यासाठी स्थायी समिती खालील प्रमाणे–

१. डॉ. अरुणा बाभुळकर–अध्यक्ष २. सौ. रश्मी भावे – उपाध्यक्ष

३. डॉ. लता देशमुख– सचिव ४. डॉ. वृषाली देशपांडे –सदस्य

५. डॉ. रत्ना शेखावत – सदस्य ५. डॉ. पुष्पा भावे–आमंत्रक

६. श्रीमती शीली भद्र–सदस्य ७. सौ. संध्या वाघाडे – वॉर्डन

या निवासस्थानामध्ये नोकरी करणाऱ्या महिला, शिक्षण घेणाऱ्या मुली, वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या महिला डॉक्टर यांचे सुद्धा वास्तव्य असते.

**निवासी वैद्यकीय अधिकारी –**

३, सी.जी.ओ. प्रशिक्षणार्थी–१३,

इतर – ५

**डॉ. पुष्पा भावे, प्रवृत्ती प्रमुख, कुसुम विहार**

**मातृसेवासंघ, सीताबर्डी, नागपूर**